आवृत्ती – अहिल्यानगर । पुणे । छत्रपती संभाजीनगर । बीड । धाराशिव । नाशिक येथून दररोज प्रसिध्द

दैनिक
# राष्ट्र सह्याद्री

संपादक : काकासाहेब नवले । RNI No. MAHMAR/2019/82605 । वर्ष ७ वे । पाने ८ । मुल्य रू. ४.०० । अंक १२६ । सोमवार १६ फेब्रुवारी २०२६
। पोस्टल परवाना : G-2/Rashtra Shyadri/RNP/2025-26 8282 । www.rashtrasahyadri.com

## जमिनीच्या तुकड्याला मिळणार आधार कार्ड!

नवी दिल्ली : दिल्ली सरकारने राजधानीतील प्रत्येक जमिनीच्या तुकड्याला एक वेगळी ओळख देण्याचा निर्णय घेतला आहे. आता, दिल्लीतील प्रत्येक जमिनीच्या तुकड्याला आधार कार्ड दिले जाईल. प्रत्येक जमिनीच्या भूखंडाला एक १४-अंकी ओळख क्रमांक दिला जाईल, ज्याला युनिक लँड पार्सल आयडेंटिफिकेशन नंबर म्हणतात. यामुळे डिजिटल सुरक्षा आणि जमिनीच्या नोंदींचे आयोजन सुनिश्चित होईल.

## महत्त्वाचे..

### फडणवीस हे अपयशी गृहमंत्री : अंधारे

मुंबई : रोहिंगे व बेकायदेशीर बांगलादेशींना मुंबईतून हटवणे हेच आमचे उद्दीष्ट्य असेल अशी घोषणा करणाऱ्या महापौर रितू तावडे यांना शिवसेना (ठाकरे) पक्षाच्या नेत्या सुषमा अंधारे यांनी टोला लगावला आहे. देवेंद्र फडणवीस किती अपयशी गृहमंत्री आहेत की बांग्लादेशी घुसखोरांवर कारवाई करू शकत नाहीत हे आपल्यामुळे महाराष्ट्राला ठळकपणे कळत आहे अशी टीका अंधारे यांनी केली आहे.

मुंबईत विविध ठिकाणी पदपथांवर अनधिकृतरित्या अतिक्रमण केलेल्या बांग्लादेशींचे जात प्रमाणपत्र आणि बोगस आधारकार्ड शोधून त्यावर त्वरित कारवाई करून त्यांना पोलिसांच्या हवाली करण्यात येईल अशी घोषणा महापौर रितू तावडे यांनी पदभार स्वीकारल्यानंतर केलेल्या भाषणात केली होती. बांगलादेशी फेरीवाल्यांना हटवण्याला त्यांनी प्राधान्य दिले असून प्रशासनाबरोबर पहिली सभा याच विषयावर घेतली. रोहिंग्या व बेकायदेशीर बांगलादेशींना मुंबईतून हटवणे हेच भाजप, शिवसेना आणि आरपीआयचे उद्दिष्ट असेल. त्याकरता आम्ही डिजिटल सिस्टीम आणि एआय चा वापर करु. पदपथांवर अनधिकृत रित्या अतिक्रमण केलेल्या बांगलादेशींचे जात प्रमाणपत्र व बोगस आधार कार्ड शोधून त्यावर त्वरित कारवाई करून त्यांना पोलिसांच्या हवाली करण्यात येईल, अशी घोषणा महापौरांनी केली होती. त्यांच्या या घोषणेवर अंधारे यांनी टीका केली आहे.

# पाकिस्तानला पून्हा लोळवले!

## ६१ धावांनी भारताचा विजय; ईशान किशनच्या स्फोटक खेळापुढे पाकचे लोटांगण

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**कोलंबो :** कोलंबोतील आर प्रेमदासा स्टेडियममध्ये पार पडलेल्या आयसीसी टी-२० वर्ल्डकप सामन्यात भारतीय संघाचा बोलबाला पाहायला मिळाला आहे. या सामन्यात पाकिस्तानने नाणेफेक जिंकून भारतीय संघाला प्रथम फलंदाजी करण्याचे आमंत्रण दिले होते. प्रथम फलंदाजी करताना भारतीय संघाने ७ गडी बाद १७५ धावा केल्या. या धावांचा पाठलाग करताना पाकिस्तानचा संघ संघर्ष करताना दिसून आला. भारतीय संघाने हा सामना ६१ धावांनी आपल्या नावावर केला.

या सामन्यात भारतीय संघाने पाकिस्तानसमोर विजयासाठी १७६ धावांचे आव्हान ठेवले होते. या आव्हानाचा पाठलाग करताना पाकिस्तानचा डाव ११४ धावांवर आटोपला.

सामन्याच्या सुरुवातीपासूनच ईशान किशन अत्यंत आक्रमक मूडमध्ये दिसत होता. त्याने मैदानाचा कोणताही कोपरा सोडला नाही. अवघ्या ४० चेंडूत ७७ धावांची स्फोटक खेळी करत त्याने प्रतिस्पर्धी संघाचे कंबरडे मोडले होते. या खेळीत त्याने १० खणखणीत चौकार आणि ३ उत्तुंग षटकार खेचत प्रेक्षकांचा पैसा वसूल केला. पाकिस्तानविरुद्ध ईशान किशनने प्रभावी कामगिरी केली आहे. त्याने फक्त २७ चेंडूत त्याचे अर्धशतक पूर्ण केले. भारताला सामन्याच्या सुरुवातीलाच मोठा धक्का बसला. भारताचा पहिला बळी कर्णधार सलमान आगा याने घेतला. त्याने पहिल्याच षटकाच्या अखेरच्या चेंडूवर अभिषेक शर्माला झेल बाद केले.

तर हार्दिक पांड्या आणि बुमराह जोडीने पाकिस्तानच्या फलंदाजीचे अक्षरशः कंबरडे मोडले. अवघ्या १२ चेंडूच्या खेळात पाकिस्तानचा कर्णधार आणि टॉप ऑर्डर तंबूत परतले. हार्दिक पांड्याने डावाच्या पहिल्याच षटकात पाकिस्तानला पहिला आणि मोठा धक्का दिला. सलामीवीर साहिबजादा फरहान याला खातेही उघडता आले नाही.

बुमराहने डावाच्या दुसऱ्या षटकात सॅम अयुबला (६ धावा) पायचीत ( एल बी डब्ल्यू) करत पाकिस्तानला दुसरा धक्का दिला. बुमराह इथेच थांबला नाही. त्याने आपल्या धारदार गोलंदाजीने पाकिस्तानचा कर्णधार सलमान अली आघाला (४ धावा) आऊट केले. फक्त १३ धावांवर ३ महत्त्वाचे गडी गमावल्यामुळे पाकिस्तानचा संघ पूर्णपणे बॅकफूटवर गेला.




**ईशान किशनच्या अर्धशतकाच्या मदतीने भारताने पाकिस्तानसमोर १७६ धावांचे लक्ष्य ठेवले. ईशान किशनने ४० चेंडूत १० चौकार आणि ३ षटकारांसह ७७ धावा करत भारताच्या डावाचे नेतृत्व केले. शिवम दुबेनेही १७ चेंडूत २७ धावा केल्या. पाकिस्तानकडून उस्मान तारिकने ४ षटकांत २४ धावा देत १ विकेट घेतला. टी-२० विश्वचषकात पाकिस्तानविरुद्ध भारताची ही सर्वोच्च धावसंख्या आहे.**

### टिपू सुलतान प्रकरण पेटले...

## भाजपकडून काँग्रेस भावनावर दगडफेक

**कार्यकर्ते, पोलीस जखमी :** भाजप शहराध्यक्ष धीरज घाटे, महापौर मंजुषा नागापुरे यांना अटक करण्याची मागणी



प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**पुणे :** काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी केलेल्या वक्तव्याच्या विरोधात भाजपचे पुण्यात तीव्र आंदोलन केले. काँग्रेस भवन बाहेर भाजपच आणि काँग्रेसच्या कार्यकर्त्यांमध्ये मोठा राडा झाला. काँग्रेसभवन बाहेर पोलीस बंदोबस्त तैनात असताना भाजपच्या कार्यकर्त्यांकडून यावेळी दगडफेक करण्यात आली आहे. यावेळी दगडफेकीमध्ये काही कारच्या काचा फुटल्या आहेत, तर एका काँग्रेसच्या कार्यकर्त्यांला तो दगड लागल्याने रक्तस्त्राव तो रक्तबंबाळ झाला आहे. तर भाजपच्या कार्यकर्त्यांनी दोन्ही बाजूंनी दगडफेक झाल्याचा दावा केला. काँग्रेस कार्यकर्त्यांनीच दगड मारून घेतला असावा असेही भाजपच्या आंदोलनकर्त्यांनी म्हटले आहे. यावेळी पोलिसांना देखील दगड लागले. काँग्रेसकडून भाजपचे शहराध्यक्ष धीरज घाटेंना अटक करण्याची मागणी करण्यात आली.

पुण्यातील काँग्रेस भवन परिसरात हा मोठा राडा झाला आहे. हर्षवर्धन सपकाळांविरोधात भाजपच्या कार्यकर्त्यांनी जवळपास दीड ते दोन तास आंदोलन केले.

> निश्चितच हा प्रकार पुण्याला साजेसा नाही. परंतु काँग्रेसच्या प्रदेशाध्यक्षांनी ज्या प्रकारचा वक्तव्य केलं ते राज्यातील राजकारण पेटवणारे आहे, कुठल्या पक्षाचा कार्यकर्ता, पदाधिकारी ही गोष्ट अलिप्त आहे, सर्वप्रथम आम्ही छत्रपती शिवरायांचे मावळे आहोत आणि शिवरायांची इतर कोणाशी तुलना हे कुठल्याही महाराष्ट्रातील शिवप्रेमीला न पटणारी आहे, त्यामुळे शिवप्रेमींची ही प्रतिक्रिया आहे, त्यातून जे घडलं ते निश्चितपणे प्रथा आणि परंपरेला साजेसं नाही, त्याची दुरुस्ती व्हावी लागेल, परंतु काँग्रेसच्या प्रदेशाध्यक्षांनी अशा प्रकारचा वक्तव्य करणे हे म्हणजे म हाराष्ट्राला आग लावण्यासारखा आहे, असं माझं मत आहे,
>
> **– गणेश बिडकर, भाजप नेते**

आंदोलकांकडून यावेळी घोषणा बाजी आणि दगडफेक झाली. यावेळी काँग्रेसचे देखील कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते, त्यातील एका कार्यकर्त्यांना दगड लागल्याने मोठ्या **(पान ४ वर)**

## घरकुलांना सौर योजनेचा ‘लखलखाट’

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**अहिल्यानगर:** पंतप्रधान आवास योजनेला (ग्रामीण टप्पा-२) मंजुरी देतानाच राज्य सरकारने या घरकूल योजनेच्या अनुदानातही ५० हजार रुपयांची वाढ करण्याचा निर्णय घेतला आहे. वाढीव अनुदानातील ३५ हजार रु.घरकुलाच्या बांधकामासाठी व १५ हजार रु. पंतप्रधान सुर्यघर योजनेंतर्गत सौरऊर्जा यंत्रणेसाठी दिले जाणार आहेत. याशिवाय केंद्र सरकारने सौर ऊर्जेसाठी आणखी ३० हजार रू. उपलब्ध होणार आहेत. यामुळे घरकुल योजनेत सौर ऊर्जा योजनेसाठी सरकारकडून एकूण ४५ हजार रु. तर लाभार्थीचा स्वहिस्सा ५ हजार रू. भरावा लागेल. मात्र यातून सरकारी घरकुलांना सौर ऊर्जेचा झगमगाट लाभणार आहे.

जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेकडून ही माहिती उपलब्ध झाली. यापूर्वी राज्यात पंतप्रधान आवासचा ग्रामीण टप्पा-१ योजना सन २०१६-१७ ते २०२१-२२ या कालावधीत राबवला होता. त्यावेळी योजनेत सपाट भागांसाठी प्रति घरकूल १ लाख २० हजार रु. तर डोंगराळ- कठीण भागांसाठी १ लाख ३० हजार रु. इतकी अनुदान लाभार्थ्याला देण्यात आले होते. आता राज्य सरकारने ग्रामीण टप्पा-२ सन २०२४-२५ ते २०२८-२९ राबवताना लाभार्थ्यांच्या अनुदानात **(पान ४ वर)**

### आधी काम नंतर अनुदान!

**घरकुलाचे अनुदान लाभार्थ्यांच्या खात्यावर जमा होणार आहे. यामुळे सौर ऊर्जा प्रकल्पाचे कामे करणार्या खासगी संस्थांना सौर प्रकल्पाचे काम पूर्ण केल्यानंतरच, लाभार्थ्यांच्या खात्यावर अनुदान जमा झाल्यानंतर मिळणार आहे. आधी काम नंतर पैसे, असे स्वरूप आहे. सौर ऊर्जेचे काम करणाऱ्या संस्थांना आधी काम पूर्ण केल्यानंतरच लाभार्थ्यांकडून पैसे वसूलीचे काम करावे लागणार आहेत. हाच या योजनेतील अडथळा ठरण्याची शक्यता आहे.**

## जनसेवेत रुजू ‘सेवा तीर्थ’ अपघात जखमींना १.५ लाखांपर्यंत कॅशलेस उपचार

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**नवी दिल्ली :** पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी शुक्रवारी नव्या पंतप्रधान कार्यालयाचे अर्थात ‘सेवा तीर्थ’ या अत्याधुनिक प्रशासकीय संकुलाचे उद्घाटन केले. या नव्या कार्यालयातून कामकाजाचा श्रीगणेशा करताना पंतप्रधानांनी चार महत्त्वपूर्ण निर्णयांवर स्वाक्षरी केली.



यामध्ये रस्ते अपघातांतील जखमींना वेळीच उपचार मिळावेत, यासाठी १.५ लाख रुपयांपर्यंत कॅशलेस उपचारांचा दिलासा देणारी पंतप्रधान साह्य योजना मंजूर करण्यात आली आहे. या निर्णयामुळे देशभरात अपघातग्रस्तांना तात्काळ वैद्यकीय मदत मिळण्यास मोठी मदत होणार आहे.

महिलांच्या आर्थिक सक्षमीकरणाच्या दिशेने सरकारने महत्त्वाचे पाऊल उचलले आहे. ‘लखपती दीदी’ योजनेअंतर्गत ३ कोटी महिलांचे उद्दिष्ट एक वर्ष आधीच पूर्ण झाल्यानंतर आता मार्च २०२९ पर्यंत हा आकडा ६ कोटींपर्यंत वाढवण्याचे नवीन लक्ष्य पंतप्रधानांनी निश्चित केले आहे. कृषी क्षेत्राला बळकटी देण्यासाठी ‘कृषी पायाभूत सुविधा निधी’ दोन लाख कोटी रुपयांपर्यंत वाढवण्यात आला आहे. यामुळे साठवणूक, प्रक्रिया सुविधा आणि कृषी मूल्य साखळी अधिक सक्षम होणार आहे. नवोपक्रम ाला चालना देण्यासाठी ‘स्टार्टअप इंडिया फंड ऑफ फंड्स २.०’ला १०,००० कोटी रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला असून डीप टेक, प्रगत उत्पादन आणि सुरुवातीच्या टप्प्यातील नवकल्पनांना प्रोत्साहन दिले जाणार आहे.

देशाच्या प्रशासकीय इतिहासातील म हत्त्वाचा टप्पा मानल्या जाणाऱ्या ‘सेवा तीर्थ’ इमारतीत पंतप्रधान कार्यालय, राष्ट्रीय सुरक्षा परिषद सचिवालय आणि मंत्रिमंडळ सचिवालय आहे. पंतप्रधानांनी गणेशपूजन व फलकाचे अनावरण करून कामकाजास सुरुवात केली. इमारतीवरील ताम्रपट्टिकेवर ‘सेवा तीर्थ’ आणि ‘नागरिक देवो भव’ हे ब्रीदवाक्य कोरले आहे.

या कार्यक्रमास पीएमओचे राज्यमंत्री जितेंद्र सिंह, गृहनिर्माण व नगरविकासमंत्री म नोहरलाल खट्टर आणि राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार अजित डोवाल उपस्थित होते. कर्तव्यपथावरील कर्तव्य भवन क्रमांक १ व २ चेही उद्घाटन यावेळी झाले.

### आधुनिक व एकात्मिक प्रशासन

**नव्या सेंट्रल व्हिस्टा प्रकल्पातील या इमारतींमध्ये डिजिटली एकात्मिक कार्यालये, केंद्रीकृत स्वागत व्यवस्था, स्मार्ट सुरक्षा प्रणाली, अक्षय ऊर्जा, जलसंवर्धन व कचरा व्यवस्थापन उपायांचा समावेश आहे. यामुळे आंतरमंत्रालय समन्वय, कार्यक्षमता आणि सुशासन अधिक मजबूत होईल, असा विश्वास सरकारने व्यक्त केला आहे.**

## राज्यात गावगाड्यांचा कारभार होणार ठप्प !

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**पुणे** : राज्यातील ग्रामपंचायत स्तरावरील विविध प्रलंबित मागण्यांकडे सरकारचे लक्ष वेधण्यासाठी अखिल भारतीय सरपंच परिषद यांच्यावतीने २० फ ेब्रुवारी रोजी राज्यव्यापी आंदोलन छेडण्याचा इशारा देण्यात आला आहे. या आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर त्या दिवशी राज्यभरातील सर्व ग्रामपंचायती बंद ठेवण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

ग्रामपंचायत कार्यालयांचे कामकाज पूर्णतः ठप्प राहणार असून नागरिकांना विविध शासकीय सेवांसाठी अडचणींचा सामना करावा लागू शकतो.

सरपंच परिषदेने दिलेल्या माहितीनुसार, शासनाने मागण्यांकडे गांभीर्याने लक्ष न दिल्यास उपोषणासारखे तीव्र आंदोलन करण्याचा इशाराही देण्यात आला आहे. ग्रामपंचायतींच्या कारभाराशी संबंधित महत्त्वाच्या प्रश्नांवर शासनाने तातडीने निर्णय घ्यावा, यासाठी हे आंदोलन करण्यात येत असल्याचे परिषदेच्या पदाधिकाऱ्यांनी स्पष्ट केले आहे.

या आंदोलनातील प्रमुख मागण्यांमध्ये ज्या ग्राम पंचायतींचा कार्यकाळ संपला आहे, त्या ठिकाणी तातडीने निवडणुका घेण्यात याव्यात किंवा तोपर्यंत प्रशासक म्हणून सरपंचांची नियुक्ती करण्यात यावी, ही प्रमुख मागणी आहे. सध्या अनेक ठिकाणी प्रशासक म्हणून शासकीय अधिकाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली असून त्यामुळे स्थानिक स्वराज्य संस्थांचा लोकशाही कारभार दुर्लक्षित होत **(पान ४ वर)**

## नाशिक-पालघर प्रवासाला मिळणार वेग !

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**नवी दिल्ली :** पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या केंद्रीय मंत्रिमंडळाच्या समितीच्या बैठकीत महाराष्ट्रातील रस्ते पायाभूत सुविधांच्या विस्तारासाठी महत्त्वाचा निर्णय घेण्यात आला आहे. राष्ट्रीय महामार्ग-१६०ए (एनएच-१६०ए) च्या घोटी-त्र्यंबक (मोखाडा)-जव्हार-मानोर-पालघर या एकूण १५४.६३५ किलोमीटर लांबीच्या मार्गाच्या पुनर्वसन व चौपदरीकरणास अधिकृत मंजुरी देण्यात आली आहे.

या महत्त्वाकांक्षी प्रकल्पासाठी सुमारे ३,३२०.३८ कोटी रुपयांचा भांडवली खर्च अपेक्षित असून, प्रकल्प पूर्ण झाल्यानंतर उत्तर महाराष्ट्र आणि कोकण किनारपट्टीमधील दळणवळण अधिक वेगवान व सुरक्षित होणार आहे. विशेषतः आदिवासी व दुर्गम भागांना मोठा दिलासा मिळणार असून, पर्यटन, व्यापार आणि औद्योगिक विकासाला चालना मि ळेल, असा विश्वास व्यक्त करण्यात येत आहे. घोटी, त्र्यंबक, जव्हार, मानोर व पालघर या भागांना जोडणारा हा मार्ग सुधारित झाल्यास प्रवासाचा वेळ कमी होऊन अपघातांचे प्रमाण घटण्यास मदत होणार आहे. तसेच शेतमाल वाहतूक, रोजगाराच्या संधी आणि स्थानिक अर्थव्यवस्थेला बळकटी मिळणार आहे.हा प्रकल्प ‘पीएम गतीशक्ती’ तत्त्वावर आधारित असून, याद्वारे महाराष्ट्रातील ६ आर्थिक नोड्स, ७ सामाजिक नोड्स आणि ८ लॉजिस्टिक नोड्स जोडले जाणार आहेत. यात प्रामुख्याने तारापूर आणि बोईसर येथील सेझ (डएन), मोखाडा औद्योगिक उद्यान आणि वाडा येथील औद्योगिक वसाहतींचा समावेश आहे. तसेच त्र्यंबकेश्वर, जव्हार राजवाडा, वैतरणा नदी आणि अर्नाळा किल्ला यासारख्या पर्यटन स्थळांनाही या महामार्गाचा मोठा लाभ मिळेल. पालघर जिल्ह्यातील आदिवासी भागातील पायाभूत सुविधा सुधारल्यामुळे या क्षेत्राच्या सामाजिक आणि आर्थिक विकासाला मोठी गती मिळणार आहे. प्रकल्प पूर्ण झाल्यानंतर प्रवासाचा वेळ आणि वाहनांच्या देखभालीचा खर्च लक्षणीयरीत्या कमी होईल. तसेच या प्रकल्पामुळे प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्ष स्वरूपात सुमारे ४४ लाखांहून अधिक व्यक्ती-दिवसांचा रोजगार निर्माण होणार आहे. हा महामार्ग पुढे दिल्ली-मुंबई एक्सप्रेसवे (छए-४) आणि वाढवण बंदरासारख्या महत्त्वाच्या केंद्रांशी जोडला जाणार असल्याने राज्याच्या लॉजिस्टिक कामगिरीत मोठी सुधारणा होण्याची अपेक्षा आहे.

### महामार्गाच्या ३३२० कोटींच्या प्रकल्पास केंद्रीय मंजुरी

**■ नाशिकच्या पश्चिम भागातील अंबड आणि सातपूर सारख्या औद्योगिक क्षेत्रातील वाढत्या मालवाहतुकीमुळे सध्या नाशिक शहरावर वाहतुकीचा मोठा ताण येत आहे. सध्याची ही वाहतूक एनएच-८४८ मार्गे शहरातून जात असल्याने नागरी रस्ते कोंडीचा सामना करत आहेत. या नवीन प्रकल्पामुळे त्र्यंबक मार्गे औद्योगिक क्षेत्रांना एक सक्षम पर्यायी मार्ग उपलब्ध होणार आहे, ज्यामुळे शहरातील वाहतुकीचा ओघ कमी होईल. विशेषतः मुंबई आणि दक्षिणेकडून येणारी वाहतूक इगतपुरी इंटरचेंजद्वारे समृद्धी महामार्ग आणि पुढे एनएच-१६० ए चा वापर करून त्र्यंबक व नाशिककडे जलद गतीने पोहोचू शकेल. २०२८ पर्यंत या मार्गावरील वाहतूक प्रति दिन १०,००० वाहनांच्या पुढे जाण्याचा अंदाज असल्याने या चौपदरीकरणाचा निर्णय घेण्यात आला आहे.**

# संपादकीय

## बांगलादेशात लोकशाहीच्या पारड्यात मत

लोकशाहीस अपेक्षित असा मध्यममार्गी नेमस्तपणा तारिक रहमान यांनी बांगलादेश निवडणुकीच्या प्रचारात तरी दाखवलेला असल्याने त्यांचा विजय आशादायी आहे.

बांगलादेशात तब्बल सात वर्षांनंतर तारिक रहमान यांच्या नेतृत्वाखाली खर्या अर्थाने लोकनिर्वाचित सरकार अस्तित्वात आले ही बाब त्या देशासाठीच नव्हे, तर भरतखंडासाठीही स्थैर्यजनक आणि उपकारक.सात वर्षांनंतर अशासाठी, कारण सन २०२४ मध्ये झालेली निवडणूक ही तत्कालीन पंतप्रधान शेख हसीना वाजेद यांच्या एकाधिकारशाहीमुळे आणि त्यातून संतप्त झालेल्या विरोधकांच्या बहिष्कारामुळे शुद्ध फार्स ठरली. या बेबंदशाहीची शिक्षा शेख हसीना यांना मिळालीच. कारण नंतर पुढच्याच वर्षी जुलै महिन्यात विद्यार्थी आणि बेरोजगारांच्या संतापाचा विस्फोट झाला. पोलीस आणि प्रशासनही हसीनांना साथ देईनासे झाले. आंदोलन सुरू झाल्यानंतर अवघ्या काही आठवड्यांत देश सोडून भारतात पळून जाण्याची वेळ बेगम हसीनांवर आली. नंतरच्या काळात विद्यार्थी नेते आणि मोजक्या सुजाणांनी एकत्र येऊन हंगामी सरकार स्थापले नि फेब्रुवारी २०२६ पर्यंत निवडणुका घेऊन नवीन लोकनिर्वाचित सरकार स्थापण्याचा वादा त्या हंगामी सरकारचे प्रमुख सल्लागार, नोबेल पारितोषिक विजेते अर्थतज्ज्ञ मोहम्मद युनूस यांनी केला. काही त्रुटींचा अपवाद वगळता हे आश्वासन हंगामी सरकारने पाळून दाखवले याबद्दल ते अभिनंदनपात्र ठरतात. हसीनांच्या सत्तांधळेपणाचा फटका अवामी लीग या त्यांच्या पक्षास बसला आणि गतवर्षी त्याची मान्यताच रद्द झाली. परिणामी बांगलादेशच्या राजकारणातील एक प्रमुख विचारप्रवाह असलेल्या या पक्षास यंदाच्या निवडणुकीपासून वंचित राहावे लागले. त्यामुळे मतदारांचा कौल खर्या अर्थाने प्रातिनिधिक समजावा का, मतदारांना पुरेसे पर्याय उपलब्ध होते का असे प्रश्न उपस्थित होऊ शकतात. त्यांची उत्तरे शोधण्याची ही वेळ नव्हे. युवा विद्यार्थ्यांचा नॅशनल सिटिझन्स पार्टी (एनसीपी) हा नवथर पक्ष, बांगलादेशच्या निर्मितीसच विरोध असलेला जमाते इस्लामी हा रूढीवादी पक्ष आणि त्यातल्या त्यात मध्यममार्गी म्हणता येईल असा बांगलादेश नॅशनलिस्ट पार्टी (बीएनपी) हा पक्ष असे तीन प्रमुख पर्याय मतदारांसमोर होते. मतदारांनी तिसरा पर्याय निवडून विद्यमान विस्कळीत परिस्थितीत स्थैर्य आणि अनुभवाला पसंती दिली. तारिक रहमान हे बांगलादेशच्या पहिल्या महिला पंतप्रधान खालेदा झिया यांचे चिरंजीव. गेल्या डिसेंबर महिन्यात खालेदा मृत्युशय्येवर होत्या त्या वेळी तारिक बांगलादेशात परतले. त्यानंतर काही दिवसांतच खालेदा यांचा मृत्यू झाला, मात्र त्यापूर्वीच बीएनपीने तारिक रहमान यांना खालेदांचा वारसदार मानून पक्षाची सूत्रे त्यांच्या हाती सोपवली. त्यांनी केलेल्या सुरुवातीच्या भाषणांमध्येच बीएनपीने मध्यममार्गाला पसंती दिल्याचे स्पष्ट झाले. प्रत्येक आईच्या स्वप्नातला बांगलादेश आम्ही बनवू, अशी भावनिक साद त्यांनी मतदारांना घातली. निवडणुकांच्या वातावरणात हे अपरिहार्यच. तरीही तारिक रहमान यांची प्रचारकाळातील दोन विधाने त्यांची राजकीय परिपक्वता दर्शवतात. डोंगराळ भागातील, मैदानी प्रदेशातील मुस्लीम, हिंदू, बौद्ध, ख्रिस्ती मतदारांनी आपल्याला सुरक्षित आणि सर्वसमावेशक बांगलादेश घडवण्यासाठी साथ द्यावी, हे आवाहन विशेषत: तेथील हिंदू अल्पसंख्याकांसाठी आश्वासक ठरले. त्याचबरोबर, 'आमचे धोरण बांगलादेशकेंद्री असेल. दिल्ली आणि रावळपिंडीधार्जिणे नसेल' ही घोषणा मांडलिकत्वाच्या राजकारणाविषयी तिटकारा व्यक्त करणारी ठरली. याचीही नोंद मतदारांनी घेतलेली दिसते.

हे दुसरे विधान अत्यंत महत्त्वाचे. कारण बांगलादेशाच्या अस्तित्वानंतर साडेपाच दशके उलटल्यानंतरही हा देश भारत आणि पाकिस्तान यांच्या सावलीबाहेर पडण्यासाठी धडपडत आहे. भारताविषयी उपकृत भावना जशी शाबूत आहे, तशीच (पूर्व) पाकिस्तानी अस्मिताही जागृत आहे. या दोन्ही चौकटींबाहेर स्वतंत्र बांगला अस्मिता चिरंतन ठेवण्याचा प्रयत्न नेतृत्वाकडून पुरेसा झालाच नाही. बेगम खालेदा झिया आणि शेख हसीना यांच्या अनुक्रमे बीएनपी आणि अवामी लीग या पक्षांनी या देशावर गेली ३५ वर्षे आलटून पालटून राज्य केले. त्यांच्या धोरणाला कधी भारतवादाची तर कधी पाकिस्तानधार्जिणेपणाची किनार राहिली. खालेदांच्या बीएनपीने याआधी दोन वेळा सत्तेवर असताना, म्हणजे १९९१-९६ आणि २००१-०६ या काळात सत्तास्थापनेसाठी जमाते इस्लामीची मदत घेतली. जमातने कधीही बांगलादेशाच्या निर्मितीला नि:संदिग्ध पाठिंबा दिला नाही आणि हा पक्ष नेहमीच पाकिस्तानशी निष्ठावान राहिला. खालेदांच्या विरोधक शेख हसीना यांनी या धोरणावर उतारा म्हणून भारताला पसंती दिली. त्या २००९ ते २०२४ असा प्रदीर्घ काळ सत्तेवर होत्या. त्याआधीही १९९६-२००१ या काळात त्या पंतप्रधान होत्या. याचाच अर्थ हे दोन्ही पक्ष आपापल्या राजकारणाचा भाग म्हणून भारत आणि पाकिस्तानशी मैत्रीचा जुगार खेळत राहिले. तो कधी फळला, कधी त्याने मातेरे केले. बांगलादेशी राजकारणाचा हा पोत बदलण्याची संधी तारिक रहमान यांना चालून आली आहे. 'जातीय संसद' या कायदेमंडळात त्यांच्याकडे घसघशीत बहुमत आहे. जनतेचा कौल आहे. बांगलादेशाच्या राजकारणाचा अविभाज्य घटक बनलेल्या दोन्ही बेगमांपैकी एक हयात नाही, एक परागंदा झाली आहे. यामुळे निर्माण झालेला अवकाश तारिक रहमान यांच्यासाठी तारक ठरू शकतो, तसाच मारकही. लोकशाही संवर्धनाच्या बाबतीत या देशाने पाकिस्तानपेक्षा अधिक सुजाणपणा दाखवलेला असला, तरी राजकीय विरोधकांना जिवे संपवण्याचा रक्तलांच्छित इतिहास पाकिस्तानसारखाच याही देशाचा आहे. बांगलादेशाच्या निर्मितीमध्ये महत्त्वाची भूमिका बजावणारे शेख मुजीबुर रहमान असोत किंवा झिया उर रहमान असोत, यांना नैसर्गिक मृत्यू लाभला नाही. कारण लोकशाही पद्धतीने निवडणुका लढवल्या नि त्या जिंकल्या याचा अर्थ लोकशाही शहाणपण रुजले असा होत नाही. लोकशाही ही व्यवस्थांच्या नि:पक्षपातीपणातून दिसून येते, धर्मनिरपेक्ष आणि वंशनिरपेक्ष धोरणांतून प्रकटते, अल्पसंख्याकांच्या उत्थानातून साजरी होते. तारिक रहमान यांनी लोकशाहीस अपेक्षित असा मध्यममार्गी नेमस्तपणा दाखवलेला आहे. त्यामुळे त्यांचा विजय तूर्त आशादायी वाटतो.

बांगलादेशातील बदलत्या वार्यांची नोंद भारताने काहीशा उशिराने घेतलेली आहे, ते योग्यच. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी रहमान यांच्याशी दु:खद आणि सुखद अशा दोन्ही प्रसंगी संवाद साधला आणि नवीन राजकीय व्यवस्थेशी जुळवून घेण्यात पुढाकार घेतला. पण हे जुळवून घेणे शेख हसीना या एका व्यक्तीभोवती केंद्रित असेल. हसीनांना सोपवावे ही मागणी तारिक रहमान यांनी भारताकडे अनेकदा केलेली आहे. आजवर मोहम्मद युनूस यांच्या सरकारच्या अशाच मागणीकडे ते 'हंगामी' सरकार असल्याचे मानून दुर्लक्ष करता आले. ती सोय आता राहिलेली नाही. किंबहुना, तारिक रहमान यांच्या सरकारशी संबंध प्रस्थापित करायचे असतील, तर शेख हसीनांविषयी काहीतरी ठोस निर्णय भारत सरकारला घ्यावाच लागेल. हे होत नाही तोवर हजारो बांगलादेशींच्या मनात भारताविषयीचा राग एखाद्या गळूसारखा ठसठसत राहील. या दुखर्या अवस्थेचा फायदा घेण्यासाठी पाकिस्तान आणि चीन टपून बसले आहेतच. 'हंगामी' असूनही युनूस यांच्या सरकारने पाकिस्तानशी संबंध प्रस्थापित करण्यासाठी धोरणात्मक निर्णय घेतले. आता तर अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्या व्यापारयुद्धात आपल्यासाठी बांगलादेश हा डोईजड ठरू शकेल असा प्रतिस्पर्धी बनला आहे. हे सगळे सुरू असताना, बांगलादेशाशी संवाद, सौहार्द वाढवायचे असेल तर तेथील सरकारच्या नि लवकरच कायदेमंडळाच्या प्रमुख मागणीकडे दुर्लक्ष करणे मैत्रीच्या शक्यतांमध्ये माती कालवण्यासारखे ठरेल. दोन बेगमांच्या बेबंदशाहीनंतर निर्माण झालेल्या पोकळीत बांगला मतदारांनी लोकशाहीच्या पारड्यात कौल दिला आहे. त्या स्थैर्याचा उचित लाभ भावी काळात मिळवण्यासाठीची बेगमी भारतानेही आतापासून करणे बरे.

## ब्रह्मा कुमारी विद्यालयात शिवध्वजारोहण

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**सोनगाव :** महाशिवरात्रीच्या पावन पर्वानिमित्त आज रविवारी (दि.१५ फेब्रुवारी २०२६) सात्रळ-सोनगाव येथील प्रजापिता ब्रह्मा कुमारी ईश्वरीय विश्व विद्यालय सेवाकेंद्रात विविध आध्यात्मिक कार्यक्रम उत्साहात पार पडले. शिवध्वजारोहण, रुद्र शांती यज्ञ, विशेष ध्यानधारणा आणि ईश्वरीय ज्ञानपर परिचय अशा कार्यक्रमांनी परिसर भक्तिमय व शांतिमय झाला होता. पंचक्रोशीतील भाविकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून कार्यक्रमात सहभाग घेतला.



कार्यक्रमाची सुरुवात परमात्मा शिवाच्या स्मरणार्थ ध्वजारोहणाने झाली. 'शिवध्वज' हे पवित्रता, शांती आणि शक्तीचे प्रतीक असल्याचे सांगत उपस्थितांनी ध्वजाला अभिवादन केले. त्यानंतर स्वकल्याण तसेच विश्वकल्याणासाठी शिवध्वजाखाली सामूहिक प्रतिज्ञा करण्यात आली. मनातील विकार, दुर्गुण आणि कमजोरी यांवर विजय मिळवून सद्गुणी जीवन जगण्याचा संकल्प भाविकांनी व्यक्त केला.

यानंतर रुद्र शांती यज्ञ संपन्न झाला. यावेळी ब्रह्मकुमारी निकिता बहिण व ब्रह्मकुमारी अर्चना बहिण यांनी ईश्वरीय ज्ञानाची ओळख करून देत परमात्मा परिचय व 'प्राप्ती' म्हणजे काय, हे सोप्या भाषेत समजावून सांगितले. आत्मा-परमात्मा संबंध, कर्मसिद्धांत आणि सात्विक जीवनशैली यावर त्यांनी मार्गदर्शन केले. कार्यक्रमाची सांगता प्रसाद वितरणाने झाली.

महाशिवरात्रीनिमित्त 'शिव महात्म्य' या विषयावर उद्यापासून पाच दिवस तपोवन, सात्रळ-सोनगाव येथे दुपारी ४.३० ते ५.३० या वेळेत प्रवचनमालेचे आयोजन करण्यात आल्याची माहिती आयोजकांनी दिली. कार्यक्रमाला बाळकृष्ण चोरमुंगे पा., मंगलताई चोरमुंगे, मनीषाताई जोर्वेकर, राधाताई जोर्वेकर, डॉ. सुनील जोर्वेकर, प्रकाश वालझाडे, राजू बोऱ्हाडे, अनिता वालझाडे, वैशाली वालझाडे, निर्मला सजन, नामदेव डुक्रे, मेघना डुक्रे, डहाळे सर, सुभाष शेजवळ सर, रंगनाथ भाऊ पांडे, हिरानंदानी, उषाताई कडू, संगीता सोनवणे, आनेराव ताई यांच्यासह कोल्हार सेवाकेंद्राचे राजयोगी शिवाजी भाईजी, स्वाती दीदी, सविता बहेनजी, संजय शिंगवी, मोतीलाल मुंदडा, चांगदेव शिंदे, भगवान वालझाडे, श्वेता सोनवणे, लोढा भाभी तसेच हनुमंतगाव येथील भागवत पा., पंकज दिघे आणि दुर्गापूर येथील दिलीप गुळवे आदी मान्यवर उपस्थित होते.

## लोकशाहीच्या सशक्तीकरणासाठी युवकांनी मतदान करावे : प्रा. कुंभकर्ण

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**लोणी :** आडगाव येथे प्रवरा ग्रामीण अभियांत्रिकी महाविद्यालय, लोणी व सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या राष्ट्रीय सेवा योजना यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित विशेष श्रमसंस्कार शिबिरात लोकशाहीतील सहभाग व मतदार जनजागृती या विषयावर व्याख्याते प्रा.साईप्रसाद कुंभकर्ण यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

आपल्या भाषणात त्यांनी लोकशाही व्यवस्थेत प्रत्येक नागरिकाचा सक्रिय सहभाग अत्यंत महत्त्वाचा असल्याचे सांगितले. मतदान हा प्रत्येकाचा मूलभूत हक्क असून तो बजावणे ही नागरिकांची जबाबदारी आहे, असे त्यांनी स्पष्ट केले. युवकांनी मतदान प्रक्रियेत सक्रिय सहभाग घेऊन समाजात जागरूकता निर्माण करावी, लोकशाहीच्या सशक्तीकरणासाठी युवकांनी मतदान करावे असे आवाहनही त्यांनी केले.

या कार्यक्रमास महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.संजय गुल्हाणे ,राष्ट्रीय सेवा योजना अधिकारी प्रा.सचिन अनाप, प्रा.संदीप तूरकणे इतर प्राध्यापकवर्ग व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन राष्ट्रीय सेवा योजनेच्या विद्यार्थ्यांनी केले.



## रिक्षा संघटनेच्या सतर्कतेमुळे चैन स्नॅचर महिला पकडली

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**नेवासा :** शहरात घडलेल्या चैन स्नॅचिंगच्या प्रकारात नेवासा तालुका ऑटो रिक्षा संघटना यांच्या पदाधिकारी व चालकांच्या सतर्कतेमुळे एका संशयित महिलेला पकडण्यात यश आले असून, वृद्ध महिलेचे गळ्यातील सोनेरी गंठण सुरक्षित परत मिळाले आहे.मिळालेल्या माहितीनुसार, एका वृद्ध महिलेच्या गळ्यातील सोनेरी गंठण अचानक गायब झाल्याचे त्यांच्या लक्षात आले. घाबरलेल्या अवस्थेत त्यांनी तात्काळ रिक्षा संघटनेच्या पदाधिकाऱ्यांना व चालकांना याबाबत माहिती दिली व मदत मागितली.

घटनेचे गांभीर्य लक्षात घेऊन रिक्षा संघटनेच्या सदस्यांनी तत्परता दाखवत परिसरात संशयित महिलेचा शोध घेतला. संवाद साधून तिची चौकशी केली असता, संबंधित महिलेच्या पिशवीतून वृद्ध महिलेचे सोनेरी गंठण हस्तगत करण्यात आले. त्यानंतर पुढील कारवाईसाठी संबंधित महिलेला पोलिसांच्या ताब्यात देण्यात आले. रिक्षा संघटनेच्या या सतर्क व धाडसी कृतीचे नागरिकांकडून कौतुक करण्यात येत आहे. त्यांच्या वेळेवर केलेल्या प्रयत्नांमुळे एक मोठा गुन्हा उघडकीस आला आणि वृद्ध महिलेला तिचे दागिने सुरक्षित परत मिळाले. नेवासा तालुका ऑटो रिक्षा संघटनेने समाजहितासाठी सदैव तत्पर राहण्याचा निर्धार व्यक्त केला आहे.

## योगीराजांच्या समाधीचे दर्शन घेण्यासाठी पुणतांबा येथे भाविकांची गर्दी

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**पुणतांबा :** महाशिवरात्री निमित्त श्री क्षेत्र पुणतांबा येथे योगीराज चांगदेव महाराज यांच्या समाधीचे दर्शन घेण्यासाठी काल भाविकांनी गर्दी केली होती. अंदाजे पंचवीस हजारापेक्षा जास्त भाविकांनी हजेरी लावली योगीराज चांगदेव महाराज देवस्थानच्या वतीने पहाटे पाच वाजता योगीराज चांगदेव महाराज यांच्या समाधीवर विधीवत अभिषेक व महापूजा करण्यात आली. काल सकाळपासूनच भाविकांनी गोदावरी नदीत गंगास्नान करून दर्शनासाठी रांगा लावल्या होत्या.

११ वाजेनंतर भाविकांची गर्दी वाढल्यामुळे मंदिराजवळ असलेल्या सभागृहापर्यंत भाविक रांगेत उभे होते भाविकांना व्यवस्थित दर्शन घेता यावे म्हणून देवस्थानच्या वतीने दर्शन बारीची व्यवस्था केली होती. १३ तारखेपासून मंदिरात भजन किर्तनसह इतर धार्मिक कार्यक्रम सुरू होते. कालही दिवसभर कार्यक्रम सुरु होते. मंदिर परिसरातील श्री दत्त मंदिर महादेव मंदिर काशी विश्वेश्वर मंदिरात ही दर्शनासाठी भाविकांची रिघ होती येथील मुक्ताई आश्रमात महाशिवरात्रीनिमित दुपारी १२ वाजता मंहत रामानंदगिरी महाराज यांचे किर्तन झाले. किर्तनानंतर भाविकांसाठी प्रसादाचे वाटप करण्यात आले दुपारी तीन वाजेच्या दरम्यान प्रसिद्ध शिवपुराणकथाकार दिपक शर्मा यांनी योगीराज चांगदेव महाराजांच्या समाधीचे दर्शन घेतले देवस्थानचे विश्वस्त महेश मुरुदगण यांनी त्यांचे स्वागत केले. महाशिवरात्रीनिमितभरलेल्या यात्रेत विविध प्रकारची दुकाने थाटण्यात आली होती काल उशिरापर्यंत भाविकांची दर्शनासाठी रिघ सुरू होती.

## लोकवर्गणीतून साकारतेय महादेव मंदिर, शिवरात्रीच्या मुहूर्तावर तरुणांचे श्रमदान

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**कोपरगाव :** तालुक्यातील डाऊच बुद्रुक येथे भव्य महादेव मंदिराचे बांधकाम सुरू असून मे महिन्यात हे काम पूर्ण होणार असल्याचे मंदिर बांधकाम कृती समितीच्या वतीने सांगण्यात आले. महादेव मंदिराबरोबरच हनुमान मंदिराच्या बाजूला ज्ञानेश्वर माऊली, तुकाराम महाराज, शनि चौथरा या मंदिराचे देखील बांधकाम गावात सुरू आहे. लोकवर्गणीतून डाऊच बुद्रुक ग्रामस्थांनी मंदिर बांधकामासाठी देणगी गोळा केली आहे. जवळपास ४० लाख रुपये या मंदिरांचा खर्च असून गावातील प्रत्येक शेतकऱ्यांनी तीन ते चार हजार एकरी रुपयापर्यंत मंदिरात देणगी दिली आहे. शिवरात्रीचा महोत्सव चांगल्या पद्धतीने साजरा करण्यासाठी गावातील सर्व तरुणांनी एकत्र येत मंदिर परिसरात श्रमदान केले. पवित्र गोदावरी तीरावर या मंदिराचे बांधकाम होत असून भाविकांसाठी लवकरच खुले करण्याचा मानस ग्रामस्थांनी बोलून दाखवला.गावातील मंदिरांचे पवित्र राखल्यास गावात सुख शांती नांदते, घराची कळा अंगण सांगते तर गावाची कळा गावातील मंदिरे सांगतात याप्रमाणे ग्रामस्थ मंदिरांच्या बांधकामासाठी एकवटलेली आहे. तीस लाख रुपये खर्च हा मंदिरासाठी आतापर्यंत झाला असून अजून दहा लाख रुपये चा खर्च अपेक्षित आहे. मंदिर बांधकामासाठी देणगी देण्याचे आवाहन देखील कृती समितीने केले आहे.



## शहराच्या विकासाला खऱ्या अर्थाने नवी दिशा : रेणुका कोल्हे

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**कोपरगाव :** कोपरगाव शहराच्या सर्वांगीण विकासाच्या दृष्टीने एक महत्त्वाचे पाऊल टाकण्यात आले असून सुखशांती नगर येथील ओपन स्पेस संरक्षण भिंतीच्या बांधकामाचा शुभारंभ उत्साहात पार पडला. कोपरगाव नगरपरिषद अंतर्गत महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोथान जिल्हास्तरीय योजनेतून प्रभाग क्रमांक २ मधील या कामासाठी सुमारे २२ लाख ८ हजार २५४ रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला आहे. या कामाचे भूमिपूजन रेणुका कोल्हे यांच्या शुभहस्ते, नगराध्यक्ष पराग संधान यांच्या अध्यक्षतेखाली पार पडले.

यावेळी उपनगराध्यक्ष जितेंद्र रणशुर, गटनेते प्रसाद आढाव, बांधकाम सभापती निलोफर पठाण यांच्यासह नगरसेवक, पदाधिकारी व प्रभागातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. भूमिपूजनप्रसंगी बोलताना रेणुका कोल्हे म्हणाल्या की, अशा विकासकामांतूनच कोपरगाव शहराच्या प्रगतीची खरी गती दिसून येत आहे. सर्व नागरिकांच्या सहभागातून सुरू झालेली ही कामे वेळेत व दर्जेदार पूर्ण होण्यासाठी सर्वांचे सहकार्य आवश्यक आहे. युवा नेते विवेकभैय्या कोल्हे यांच्या नेतृत्वात नगराध्यक्ष व नगरसेवकांकडून कृतीयुक्त विकासाची घोडदौड सुरू असून, शहरात स्वच्छता व पाणीपुरवठ्यासारख्या मूलभूत सुविधांमध्ये सकारात्मक बदल जाणवत आहेत, असेही त्या म्हणाल्या. या संरक्षण भिंतीमुळे ओपन स्पेस सुरक्षित राहून भविष्यात सामाजिक, सांस्कृतिक व सार्वजनिक उपक्रमांसाठी नागरिकांना संरक्षित सुविधा उपलब्ध होणार आहेत. नियोजनबद्ध विकासाच्या दृष्टीने हे काम महत्त्वाचे ठरणार असल्याची भावना यावेळी व्यक्त करण्यात आली.



## विद्यापीठच्या स्टार्टअप बूट कॅम्पमुळे विद्यार्थ्यांना उद्योजकतेची प्रेरणा

### टीसी कॉलेज मध्ये स्टार्टअप बूट कॅम्प चे आयोजन

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**बारामती :** सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठच्या इनोव्हेशन, इन्क्युबेशन अँड लिंकेजेस विभागामार्फत आयोजित स्टार्टअप बूट कॅम्पमुळे विद्यार्थ्यांना विविध अभिनव कल्पनांची निर्मिती, व्यवसाय आराखडा तयार करणे आणि तो यशस्वीपणे राबविण्याबाबत मार्गदर्शन मिळते. नोकरी शोधण्यापेक्षा उद्योजक बनण्याची प्रेरणा विद्यार्थ्यांनी घ्यावी, असे प्रतिपादन विभागाचे संचालक डॉ. देविदास गोल्हार यांनी केले. विद्यापीठ व वाधवाणी फाऊंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने तुळजाराम चतुरचंद महाविद्यालय, बारामती येथे दि. १२ व १३ फेब्रुवारी रोजी 'एसपीपीयू स्टार्टअप बूट कॅम्प - २०२६' चे आयोजन करण्यात आले होते. गुरुवारी (दि. १२) डॉ. गोल्हार यांच्या हस्ते बूट कॅम्पचे उद्घाटन झाले.

यावेळी बोलताना डॉ. गोल्हार यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधत स्टार्टअप संकल्पना, नाविन्यपूर्ण विचारसरणी आणि उद्योग उभारणीतील संधी याबाबत मार्गदर्शन केले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अविनाश जगताप होते. तसेच उपप्राचार्य डॉ. योगिनी मुळे, वाधवाणी फाऊंडेशनचे प्रशिक्षक श्री. ऋषभ गिल, महाविद्यालय समन्वयक प्रा. महेश फुले आदी मान्यवर उपस्थित होते. या बूट कॅम्पमध्ये विद्यापीठाशी संलग्न विविध महाविद्यालयांतील ९६ विद्यार्थी सहभागी झाले होते. प्राचार्य डॉ. अविनाश जगताप म्हणाले की, स्टार्टअप बूट कॅम्पसाठी टीसी कॉलेजची निवड केल्याबद्दल विद्यापीठ प्रशासनाचे आम्ही आभारी आहोत. विद्यार्थ्यांनी बिझनेस स्टार्टअप आणि इनोव्हेशन क्षेत्रात पुढाकार घ्यावा. महाविद्यालयाकडून त्यांना सर्वोतोपरी सहकार्य व पाठिंबा दिला जाईल, असे त्यांनी नमूद केले.

## महाशिवरात्री निमित्त त्रिवेणीश्वरला दोन लाख भाविकांची गर्दी

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**नेवासा :** महाशिवरात्री उत्सवाच्या निमित्ताने नेवासा तालुक्यातील सुरेशनगर-हंडीनिमगावच्या मध्यावर असलेल्या स्वयंभू त्रिवेणीश्वर महादेव संस्थान येथे ''हर हर महादेव''चा गजर करत विविध धार्मिक कार्यक्रमांनी महाशिवरात्रीचा उत्सव साजरा करण्यात आला. त्रिवेणीश्वर देवस्थानचे महंत स्वामी रमेशानंदगिरी महाराज यांच्या मार्गदर्शनाखाली झालेल्या महाशिवरात्री उत्सवाच्या निमित्ताने दिवसभरात सुमारे दोन लाख भाविकांनी स्वयंभू त्रिवेणीश्वर महादेवाचे दर्शन घेतले.महाशिवरात्रीच्या निमित्ताने ब्रम्हलिन भक्त प्रल्हाद महाराज यांच्या कृपा आशीर्वादाने व देवगडचे महंत गुरुवर्य भास्करगिरी महाराज यांच्या प्रेरणेने त्रिवेणीश्वर देवस्थानचे महंत रमेशानंदगिरी महाराज यांच्या नेतृत्वाखाली येथे महाशिवरात्री उत्सवाच्या निमित्ताने पंचदिनात्मक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.महाशिवरात्रीला पहाटेच्या सुमारास वेदमंत्राच्या जयघोषात त्रिवेणीश्वर शिवलिंगास महंत स्वामी रमेशानंदगिरी महाराज यांच्या हस्ते रुद्राभिषेक, दुग्धाभिषेक घालण्यात आला.



सायंकाळी निघालेल्या पालखी मिरवणुकीचे तोफांची सलामी देत उत्स्फूर्त स्वागत करण्यात आलेफोटो ओळी- (छाया-सुधीर चव्हाण नेवासा)

यावेळी दर्शनासाठी आलेल्या मान्यवरांचा व भक्त परिवारातील सदस्यांचा महंत रमेशानंदगिरीजी महाराज यांच्या हस्ते सन्मान करण्यात आला. त्रिवेणीश्वर भक्त मंडळाचे सर्व सेवेकरी हे तनमन धनाने याठिकाणी सेवा देऊन स्वयंसेवकाची भूमिका बजवतांना दिसत होते.

भाविकांना रांगेत दर्शन घेता यावे म्हणून मंदिराच्या सभामंडपात दर्शन बारी तयार करण्यात आली होती.

दर्शन बारी रांगेत सर्व भक्त हे शिस्तीचे पालन करत दर्शन घेतांना दिसत होते. दर्शन नियोजन व प्रसाद वाटप नियोजनासाठी हंडीनिमगाव व सुरेशनगर येथील तरुण मंडळांच्या सदस्यांनी व भक्त मंडळातील युवकांनी स्वयंसेवक म्हणून भूमिका बजावली.महाशिवरात्री निमित्ताने आलेल्या भाविकांचे महंत रमेशानंदगिरीजी महाराजांनी हसतमुखाने स्वागत केले. त्रिवेणीश्वर मंदिर प्रांगणात असलेल्या महान तपस्वी ब्रम्हलिन भक्त प्रल्हाद महाराजांचे समाधी मंदिर,हनुमान मंदिर,अन्नपूर्णा माता मंदिर येथे ही भाविकांनी दर्शन घेतले. त्यानंतर सर्व भाविकांना शाबुदाना खिचडीचे वाटप करण्यात आले. महाशिवरात्री उत्सवाचे औचित्य साधून त्रिवेणीश्वर देवस्थानच्या सभामंडपात सकाळी ९ ते १२ शिवशाहीर नानासाहेब कोलते सर व सहकारी यांचा पोवाड्याचा कार्यक्रम झाला,दुपारी १२ ते २ यावेळेत जिल्हा परिषद शाळा व विद्यालयाच्या विद्यार्थ्यांचे विविध सांस्कृतिक कार्यक्रम उत्साहपूर्ण वातावरणात पार पडले. दुपारी ३ ते ५ यावेळेत सदगुरू कीर्तनकार उद्धव महाराज मंडलिक यांचे शिव महिमा यावर हरिकीर्तन झाले या किर्तनाला भाविकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. महाशिवरात्री निमित्त त्रिवेणीश्वर मंदिर प्रांगणात मुख्य प्रवेशद्वारावर करण्यात आलेली विद्युत रोषणाई व गणेश मूर्तीजवळ उभारण्यात आलेला कारंजा आरास देखावा सर्वांचे लक्ष वेधून घेत होता.

## चंद्र दिसल्यास रमजान महिन्यास १९ पासून प्रारंभ ३६ वर्षानंतर प्रथमच फेब्रुवारी महिन्यात रोजे

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**श्रीरामपूर-** रमजान महिन्याची तयारी जवळ जवळ पूर्ण झाली आहे. या महिन्याचे स्वागत करण्यासाठी आबालवृद्ध, बालक, महिला, मुस्लिम धर्मगुरू सज्ज झाले आहेत. रोजा सुरू होण्याची ते मोठ्या आतुरतेणे वाट पाहत आहेत. दरम्यान फेब्रुवारी महिन्यात रमजानचे रोजे छत्तीस वर्षानंतर प्रथमच आले आहेत असे काही जाणकार सांगत आहेत.

मुस्लिम धर्मात अतिशय पवीत्र समजला जाणारा रमजान महिना दोन - तीन दिवसांवर येवून ठेपला आहे. गुरुवार (दि. १८ फेब्रुवारी) चंद्रदर्शन झाल्यास लगेच नमाज - ए - तरावीह ला सुरुवात करण्यात येणार आहे. शुक्रवार (दि. १९ फेब्रुवारी ) पासून रोजास प्रारंभ होणार आहे. याबाबतची घोषणा मात्र धर्मगुरू करतील.

गेल्या काही दशकानंतर प्रथमच हे रोजे अल्हाददायक अशा वातावरणात आले आहेत. सुमारे १४ ते १५ तासांचा हा रोजा निर्जळी राहतो. या महिन्या निमित्ताने शहर आणि तालुक्यात सर्व त्या मशिदीत साफ सफाई, पाण्यासंदर्भातील उपाययोजना, ठिकठिकाणी नळांच्या तोटया, नवीन चटाया, गालिचे अशा अनेक बाबींची देखभाल करण्यात आली आहे. कुराण पठन करण्यासाठी हाफेज, आलीम, कारी, मौलाना यांची सर्व त्या मशिदीत नियुक्ती करण्यात आली आहे. शहरातील जामा मशीद, रहेमत- ए - आलम, ख्वाजा गरीब नवाज मशिदीत हाफेज जहुरअली, बेलापुर, वळदगाव येथे ही तराविह नमाजचे परिपूर्ण असे नियोजन करण्यात आले आहे. या निमित्ताने घराघरातही स्वच्छता मोहिम हाती घेण्यात आली आहे. या महिन्यात नमाज - ए - तरावीह, रोजा, कुराण पठन अशा वेगवेगळ्या पद्धतीच्या ईबादतला खास करून प्राधान्य देण्यात येते. रोजा सोडण्यासाठी आवश्यक असणार्या नामांकित खजूर, रूहब्जा, तसेच फळ व्यापार्यांनी टरबूज, खरबूज, पायनापल मागवीले आहेत.

हे पत्र **मालक, मुद्रक, प्रकाशक काकासाहेब बाबासाहेब नवले** यांनी त्यांच्या साईवेद प्रकाशन प्रायव्हेट लिमिटेड करिता, प्लॉट नं. २० ए, इंदिरानगर, शिरसगाव, श्रीरामपुर, जि. अहिल्यानगर (महाराष्ट्र) ४१३ ७०९ इंडिया येथे छापून साईवेद प्रकाशन प्रायव्हेट लिमिटेड, दै. राष्ट्र सह्याद्री कार्यालय, मिनी स्टेडियम कॉम्प्लेक्स, पहिला मजला, नवीन कोर्टाशेजारी, श्रीरामपूर, जि.अहिल्यानगर, पिन नं. ४१३७०९, जिल्हा कार्यालय -कोहिनूर प्लाझा, दूसरा मजला, पत्रकार चौक, नगर-मनमाड रोड, अहिल्यानगर, महाराष्ट्र, इंडिया येथे प्रकाशित केले, संपादक : करण बाबासाहेब नवले RNI No. MAHMAR/2019/82605 www.rashtrasahyadri.com
owner "publisher & Printer **Kakasaheb Babasaheb Nawale** To be Printed At Saved Prakashan Private Limited 2d, plot n. 20 A, Indiranagar, Shirasgaon, Shrirampur, Dist. Ahilyanagar, 413709 (Maharashtra) India & published At Saived Prakashan Private Limited Daily Rashtra Sahyadri Office, Mini Stedium Complex, First Floor. Near New Court, Shrirampur. Dist. Ahilyanagar, Maharashtra 413 709, India Editor: **Karan Babasaheb Nawale**" RNI No MAHMAR/2014/82605 www.rashtrasahyadri.com, EmalID- rashtrasahyadri@gmail.com. Mo. 7774001818 (पोस्टल परवाना No:G-2/Rashtra Shyadri / RNP/2025-26 )

## द • ख • ल

### प्रवरा फार्मसीतील आठ विद्यार्थ्यांची नोकरीसाठी निवड

**लोणी** : लोकनेते पद्मभूषण डॉ. बाळासाहेब विखे पाटील प्रवरा ग्रामीण शिक्षण संस्थेच्या कॉलेज ऑफ फार्मसी, (डी व बी फार्म) चिंचोली- मोहू, सिन्नर नाशिक येथील बी. फार्मसी अंतिम वर्षातील आठ विद्यार्थ्यांची नामांकित मॅकलॉईड्स फार्मास्युटिकल्स लिमिटेड, दमण या आंतरराष्ट्रीय स्तरावरील प्रसिद्ध औषधनिर्माण कंपनीत निवड झाली अशी माहिती प्राचार्य डॉ. विजय तांबे यांनी दिली. संस्थेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. सुस्मिता विखे पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली महाविद्यालयात विद्यार्थ्यांना उच्च दर्जाचे शिक्षण, आधुनिक प्रयोगशाळा सुविधा, उद्योगाभिमुख प्रशिक्षण आणि प्रभावी प्लेसमेंट संधी दिल्या जातात. याच सातत्यपूर्ण प्रयत्नांमुळे विद्यार्थ्यांना हे यश मिळाल्याचे प्राचार्य डॉ. विजय तांबे यांनी सांगितले. कंपनीच्या निवड प्रक्रियेत विद्यार्थ्यांनी दाखवलेली उत्तम शैक्षणिक तयारी, तांत्रिक ज्ञान, आत्मविश्वास आणि संवादकौशल्य, तसेच कॉलेज मधील ट्रेनिंग अँड प्लेसमेंट विभाग प्रमुख प्रा. योगेश ठोंबरे यांनी विद्यार्थ्यांना वेळोवेळी केलेले विशेष मार्गदर्शन यामुळे त्यांची निवड निश्चित झाली. निवड झालेल्या विद्यार्थ्यामध्ये वैभव नवले, महेश गीते, हर्ष वाघ, अथर्व वाघ, सुजल शिरसाठ, रोहित नवले, उदय कोकाटे, आणि रविंद्र दळवी यांचा समावेश आहे.

### सहाय्यक पोलीस निरीक्षक विजय माळी निलंबित

**राहुरी** : राहुरी पोलीस ठाण्यात नव्यानेच हजर झालेले सहाय्यक पोलीस निरीक्षक विजय माळी यांना खात्यांतर्गत चौकशी सुरू करून निलंबित करण्यात आले आहे. सोमनाथ घार्गे, जिल्हा पोलीस प्रमुख, अहिल्यानगर यांनी दि. १४ फेब्रुवारी २०२६ रोजी या संदर्भात आदेश जारी केले.सहाय्यक पोलीस निरीक्षक विजय माळी हे यापूर्वी सोनई पोलीस ठाण्यात कार्यरत होते. मागील सहा महिन्यांच्या कालावधीत सोनई पोलीस ठाणे हद्दीतील गंभीर स्वरूपाच्या गुन्ह्यांवर प्रभावी प्रतिबंधात्मक कारवाई करण्याबाबत त्यांना वेळोवेळी स्पष्ट सूचना देण्यात आल्या होत्या. मात्र त्या सूचनांचे पालन न झाल्याचे आदेशात नमूद करण्यात आले आहे. सोनई पोलीस ठाणे हद्दीत अग्नीशस्त्रासह खून, खुनाचा प्रयत्न यांसारखे गंभीर गुन्हे घडल्याने कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण झाला. या पार्श्वभूमीवर विजय माळी यांच्याविरोधात खात्यांतर्गत चौकशी सुरू करण्यात आली आहे. चौकशीवर विपरीत परिणाम होऊ नये, यासाठी त्यांना शासन सेवेतून निलंबित करण्यात आले आहे. दरम्यान, विजय माळी यांची नुकतीच राहुरी पोलीस ठाण्यात बदली झाली होती. दोन-तीन दिवसांपूर्वीच त्यांनी येथे हजेरी लावली होती. सध्या अहिल्यानगर येथे सुरू असलेल्या पोलिस भरती प्रक्रियेसाठी त्यांच्यावर बंदोबस्ताची जबाबदारी देण्यात आली होती.या कारवाईमुळे पोलीस प्रशासनात मोठी खळबळ उडाली असून पुढील चौकशीकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

### सुजाता स्कूलचे एव्हरेस्ट अबॅकस परीक्षेत यश



**सोनई** : विद्यार्थ्यांचे गणितीय कौशल्य वाढण्यासाठी 'एव्हरेस्ट अकॅडमी' अंतर्गत अबॅकस क्लासचे सुजाता माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात घेण्यात आलेल्या एव्हरेस्ट अकॅडमी चे शिक्षिका प्रगती संदीप भासार यांच्या मार्गदर्शनखाली परीक्षेत प्रथम श्रेणित उत्तीर्ण होऊन विद्यार्थिनीनी यश संपादन करून विद्यालयाचे नवलौकिक वाढवले त्यांचा सन्मान संस्थेचे अध्यक्ष किरण सोनवणे व प्राचार्य ज्योती सोनवणे यांनी विद्यार्थ्यांचा सन्मान केला. यशस्वी झालेल्या सर्व विद्यार्थ्यांचे मनःपूर्वक अभिनंदन.

### काकडी येथे दहावीचा निरोप समारंभ उत्साहात

**कोळपेवाडी** : कर्मवीर शंकरराव काळे एज्युकेशन सोसायटी संचलित, न्यू इंग्लिश स्कूल काकडी येथे इयत्ता दहावीच्या विद्यार्थ्यांचा निरोप व शुभेच्छा समारंभ नुकताच उत्साहात संपन्न झाला. कार्यक्रमाची सुरुवात मान्यवरांच्या हस्ते दीपप्रज्वलन आणि सरस्वती पूजनाने करण्यात आली. अभ्यासातील सातत्य, स्वतःवर असलेला दृढ आत्मविश्वास, कठोर परिश्रम आणि शिस्त हीच यशाची खरी सूत्रे आहेत. दहावीची परीक्षा ही जीवनातील पहिली मोठी पायरी असून, विद्यार्थ्यांनी या संधीचे सोने करून आपल्या भविष्याची भक्कम पायाभरणी करावी असे प्रतिपादन मुख्याध्यापक गुडघे यांनी केले. या प्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून सहाय्यक प्रादेशिक परिवहन अधिकारी संदीप निमसे आणि आरटीओ ऑफिसर लीना परदेशी उपस्थित होते. कार्यक्रमाचे अध्यक्ष व संस्थेचे निरीक्षक प्रा. नारायण बारे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना सांगितले की भविष्याचा वेध घेण्यासाठी आणि यश संपादन करण्यासाठी १० वी नंतर योग्य क्षेत्राची निवड करणे अत्यंत गरजेचे असते. योग्य वेळी घेतलेला योग्य निर्णयच प्रगतीचा मार्ग सुकर करतो. यावेळी काकडी गावच्या सरपंच पूर्वा गुंजाळ, प्रभाकर गुंजाळ, कानिफनाथ गुंजाळ, पोलीस पाटील मधुकरराव गुंजाळ, न्यू इंग्लिश स्कूल देर्डे चांदवडचे मुख्याध्यापक प्रकाश देशमुख, हिंगे, शिक्षकवृंद, कर्मचारी, विद्यार्थी आणि पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते. इतर मान्यवरांनीही आपल्या मनोगतातून विद्यार्थ्यांच्या उज्ज्वल भविष्यासाठी सदिच्छा व्यक्त केल्या.

# पालकमंत्री ना.विखे यांच्या आदेशाची पायमल्ली

## अधिकारी ठेकेदार यांच्या बेफिकिरीमुळे ट्रान्सफॉर्मरचे काम अर्धवट

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**माळवाडगांव** : श्रीरामपूर तालुक्यातील पुर्व भागातील भोकर व हरेगांव सबस्टेशन खालील गावांना कमी दाबाने वीजपुरवठा होत असल्याने उच्च दाबाने वीजपुरवठा मिळावा म्हणून शेतकरी व कार्यकर्त्यांनी पालकमंत्री ना. राधाकृष्ण विखे पाटील यांच्याकडे मागणी केली. त्यानुसार पालकमंत्र्यांनी तातडीने दोन्ही सबस्टेशनवर ५ ए एम व्ही दाबाचे दोन ट्रान्सफॉर्मरला मंजुरी देऊन प्रत्यक्षात सहा महिन्यांतपूर्वी कामास सुरुवात होऊनही महावितरण व ठेकेदार यांच्या हलगर्जीपणाने काम अपुर्णावस्थेत असल्याने ऐन रब्बी हंगामात काही रोहित्रे बंद ठेवून शेतकऱ्यांना वीजपुरवठा केला जातो.

त्यामुळे मुठेवाडगांव व माळवाडगांव परिसरातील शेतकरी त्रस्त झाले आहेत. मुठेवाडगांव - माळवाडगांव सर्कलसाठी हरिगांव व भोकर सबस्टेशनमधून नव्याने उभारण्यात येणाऱ्या फिडरची स्वतंत्र लाईनचे कामही अपुर्णावस्थेत आहे. दोन्ही सबसटेशनवर बसविण्यात येणाऱ्या ट्रान्सफॉर्मरचीही अवस्थाही ठेकेदाराचे मनमानी कारभारामुळे अर्धवट पडुन आहे. या रब्बी हंगामात पाणी पातळी समाधानकारक असतांना वीज पुरवठा सुरळीत नसल्याने शेतकरी त्रस्त झाले आहेत. भोकर सबस्टेशनमधून येणाऱ्या फिडरवर खोकरफाटा, ते मुठेवाडगांव माळवाडगांव पर्यंत भागवार दररोज काही रोहित्र बंद ठेवून उच्च दाबाने शेतीसाठी वीजपुरवठा होत आहे.



रोटेशन पध्दतीने रोहित्रे बंद असल्याने दिवसा बरोबरच रात्रीच्या वेळेत शेतीला पाणी द्यावे लागते आहे. बिबट्याची दहशत संपलेली नसुन रानडुकरांचा रात्री सर्रास वावर असताना शेतकरी रात्रपाळीत शेतपिकास जीव मुठीत धरून पाणी देत आहे. सरकारकडून दिवसा वीज देण्याची घोषणा कागदावरच असल्याचा अनुभव परिसरातील शेतकऱ्यांना जाणवत आहे. या संदर्भात भोकर व हरेगांव सबस्टेशनशी संपर्क साधला असता लवकरात लवकर महिनाभरात नवीन ट्रान्सफॉर्मर बसविण्यात येईल.५ ए एम व्ही स्वतंत्र ट्रान्सफॉर्मर न बसवता भोकर सबस्टेशनमध्ये १० ए एम व्ही चा एकच नव्याने ट्रान्सफॉर्मरची उभारणी सुरू असल्याचे सांगण्यात आले.

नव्याने ट्रान्सफॉर्मर उभारणी होईपर्यंत रब्बी हंगाम आटोपून उन्हाळा सुरू होईल हे नक्की. मात्र या रब्बी हंगामात महावितरण अधिकारी व ठेकेदार यांच्या बेफिकीर कारभारामुळे या रब्बी हंगामात मनस्ताप सहन करावा लागतो आहे हे मात्र त्रिवार सत्य होय.

### रोहित्रे व दुरूस्ती कामाने शेतकऱ्यांचे जखमेवर मीठ

शेतकऱ्यांना समाधानकारक दाबाने वीजपुरवठा सुरळीत मिळतं नाही म्हणून रोटेशन पध्दतीने रोहित्रे भागवार बंद ठेवली जातात.त्यामुळे शेतकऱ्यांना शेताला पाणी देण्यासाठीचा कालावधी कमी पडतो. त्यातच महावितरणला रोहीत्रे अथवा अन्य तांत्रिक दुरूस्ती करायची असेल तर लोडशेडिंगचे वेळेत करणे गरजेचे असताना. वीज पुरवठा सुरू असताना परमिट घेऊन दुरूस्ती करणे म्हणजे त्रस्त शेतकऱ्यांचे जखमेवर मीठ चोळणे होय म्हणून हा प्रकार थांबायला हवा.

## सखी सावित्रीच्या लेकींना प्रत्येक क्षेत्रात सक्षम बनण्याची संधी : डॉ. प्रसाद उंबरकर

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री



**प्रवरानगर** : चूल आणि मूल ही संकल्पना आजच्या समाजातून लयास जात असून स्त्री शिक्षणाला समाजसुधारकांनी दिलेल्या पाठबळामुळेच महिला प्रत्येक क्षेत्रात सक्षम बनत आहेत, असे प्रतिपादन संगमनेर येथील डॉ. प्रसाद उंबरकर यांनी केले. प्रवरानगर येथील महात्मा गांधी संकुलच्या कन्या विभागात एस.एस.सी. परीक्षा देणाऱ्या विद्यार्थिनींसाठी आयोजित 'शुभेच्छा चिंतन' कार्यक्रमात ते मार्गदर्शन करत होते. कार्यक्रमाच्या प्रारंभी रयत शिक्षण संस्थाचे संस्थापक कर्मवीर भाऊराव पाटील आणि रयत माऊली लक्ष्मीबाई पाटील यांच्या प्रतिमांना पुष्पांजली अर्पण करण्यात आली.

यावेळी संकुलाचे प्राचार्य विनायक मेथवडे, उपमुख्याध्यापक दिलीप डहाळे, उपप्राचार्य संजय डुबे, पर्यवेक्षिका संगीता सांगळे, डॉ. शरद दुधाट, बाबासाहेब अंत्रे आदी उपस्थित होते. विद्यार्थिनींना मार्गदर्शन करताना डॉ. उंबरकर म्हणाले, शिक्षक हे आपल्या आयुष्यातील संस्कारांची खरी शिदोरी आहेत. त्यांच्या ज्ञानदानामुळेच आपल्या जीवनाची जडणघडण घडते. शिक्षक केवळ शिक्षण देत नाहीत, तर आपल्या भविष्याची दिशा निश्चित करतात. त्यामुळे विद्यार्थिनींनी या संधीचा पुरेपूर लाभ घेत जीवनात मोठे यश संपादन करावे. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कन्या विभागाच्या मुख्याध्यापिका नलिनी जाधव यांनी विद्यार्थिनींशी संवाद साधत सकारात्मक विचारसरणी जोपासण्याचा सल्ला दिला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन नववीतील निशा चेचरे, बुशरा शेख व भाग्यश्री काळे यांनी केले, तर आभार माधुरी वडघुले यांनी मानले.

## महाशिवरात्रीनिमित्त श्री केदारेश्वर अखंड हरिनाम सप्ताहास उत्स्फूर्त प्रतिसाद

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री



**म्हैसगाव** : राहुरी तालुक्यातील म्हैसगाव येथील श्री स्वयंभू केदारेश्वर देवस्थान येथे महाशिवरात्रीनिमित्त अखंड हरिनाम सप्ताह भक्तिभावाने सुरू असून संपूर्ण गाव परिसरात अध्यात्मिक वातावरण निर्माण झाले आहे. या सप्ताहास परिसरातील तसेच तालुक्यातील भाविकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभत आहे.

अखंड सप्ताहादरम्यान महाशिवरात्रीनिमित्त सकाळी दहा वाजता जाहिरात कीर्तन पार पडले. त्यानंतर भाविकांसाठी महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले. दररोज पहाटे चार ते सहा काकडा आरती, सकाळी सहा ते सात श्री केदारेश्वरांचा अभिषेक, सकाळी सात ते अकरा संत जगद्गुरू तुकाराम महाराज यांच्या गाथेचे पारायण, सायंकाळी पाच ते सहा हरिपाठ, सायंकाळी सात ते नऊ हरिकीर्तन व त्यानंतर महाप्रसादाचे वितरण करण्यात येत आहे. या सप्ताहात ह.भ.प. प्रकाश दास, आदिनाथ दुशिंग, दिगंबर नरवडे, राजेश्वरानंद शास्त्रीजी, महंत गिरीजी, विजय गुंजाळ, अर्जुन तनपुरे आदी नामवंत कीर्तनकारांनी आपली कीर्तनरूपी सेवा अर्पण केली आहे. सोमवार, दि. १६ फेब्रुवारी २०२६ रोजी सकाळी ९ ते १२ या वेळेत ह.भ.प. लक्ष्मण महाराज पांचाळ (केदारेश्वर मंदिर परिसरातील निवासी) यांचे काल्याचे कीर्तन होणार आहे. रविवार, दि. १५ फेब्रुवारी २०२६ रोजी दुपारी तीन वाजता संत तुकाराम महाराज गाथा व कलश मिरवणूक काढण्यात आली. ह.भ.प. शिवाजी डौले व ह.भ.प. लक्ष्मण महाराज पांचाळ यांच्या हस्ते दीपप्रज्वलन करण्यात आले. या मिरवणुकीत महिलांचा कलश मिरवणुकीत मोठ्या प्रमाणावर सहभाग, तर पुरुषांचा पायी दिंडी सोहळ्यात उत्साहपूर्ण सहभाग दिसून आला.

ताहाराबाद, गाडकवाडी, कोळेवाडी, मायराणी, बेलकरवाडी, दरडगाव, थडी आदी परिसरातील गावांमधून भाविक मोठ्या संख्येने उपस्थित राहून दर्शन व अन्नदानाचा लाभ घेत आहेत. या अखंड हरिनाम सप्ताहाचे नियोजन ह.भ.प. लक्ष्मण महाराज पांचाळ व ह.भ.प. भगवान महाराज यमगर यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले असून देवस्थानचे सेवेकरी, महिला व ग्रामस्थांनी सहकार्य केले आहे.

## औरंगपूर येथील शेतकऱ्यांना ६३ एचपी ट्रान्सफॉर्मर मंजूर



प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

झरेकाठी : संगमनेर तालुक्यातील औरंगपूर येथील डोळे वस्ती, चोपडे वस्ती, जोंधळे वस्ती व जाधव वस्ती येथील शेतकऱ्यांनी ट्रान्सफॉर्मर मिळावा, यासाठी अहिल्यानगर जिल्ह्याचे पालकमंत्री तथा जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे आणि पद्मश्री कारखान्याचे अध्यक्ष डॉ. सुजय विखे यांच्याकडे मागणी केली होती.

या मागणीची दखल घेत मंत्री विखे व युवा नेते सुजय विखे यांनी तत्काळ ट्रान्सफॉर्मर मंजूर केला. यानुसार औरंगपूर येथील शेतकरी गीताराम डोळे यांच्या वस्तीवर ६३ एचपी क्षमतेचा ट्रान्सफॉर्मर नुकताच बसवण्यात आला. यामुळे परिसरातील शेतकऱ्यांना दिलासा मिळाला असून शेतीसाठी आवश्यक वीजपुरवठा सुरळीत होण्यास मदत होणार आहे. ट्रान्सफॉर्मर बसवण्याच्या प्रसंगी विद्युत वितरण कंपनीचे कार्यकारी अभियंता महाले, श्री. चोथे यांच्यासह महावितरणचे अधिकारी, मनोज मेहर, जनसेवा मंडळाचे अध्यक्ष विजयराव डेंगळे, सरपंच लक्ष्मीबाई वाकचौरे, उपसरपंच मीनाक्षी वदक, औरंगपूर सेवा सोसायटीचे अध्यक्ष ज्ञानेश्वर तांबे, लक्ष्मण चोपडे, ज्ञानदेव वदक, सामाजिक कार्यकर्ते राजेंद्र आरगडे तसेच जनसेवा मंडळाचे कार्यकर्ते उपस्थित होते.

ट्रान्सफॉर्मर मंजूर झाल्याबद्दल औरंगपूर परिसरातील शेतकऱ्यांनी ना. विखे व युवा नेते सुजय विखे यांचे आभार मानले.

## जि प शाळेत कुसुमाग्रज वाचनालयाचे उद्घाटन

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री



**राहुरी** : कुसुमाग्रज वाचन अभियानांतर्गत जिल्हा परिषद शाळा वांबोरी स्टेशन येथे कुसुमाग्रज वाचनालयाचे उद्घाटन अहिल्यानगर जिल्हा परिषदेचे शिक्षणाधिकारी भास्कर पाटील व वांबोरी बीटच्या विस्तार अधिकारी जयश्री कार्ले यांच्या हस्ते करण्यात आले. विद्यार्थ्यांमध्ये व शिक्षकांमध्ये वाचनाची गोडी लागावी , विद्यार्थी संस्कारक्षम व्हावेत यासाठी जिल्हा परिषद अहिल्याअंतर्गत कुसुमाग्रज वाचन अभियान १४ फेब्रुवारी २०२६ पासून सुरू झालेले आहे. वांबोरी स्टेशन शाळेतील ग्रंथालयात विद्यार्थी व शिक्षकांसाठी आठशे पुस्तके असून शाळा व्यवस्थापन समिती मार्फत अजून शंभर पुस्तके विद्यार्थ्यांना भेट देण्यात आले. याप्रसंगी गावातून ग्रंथदिंडी काढण्यात आली. शाळेच्या लेझीम पथकाने केलेल्या संचलनाने सर्वांचे लक्ष वेधून घेतले. वांबोरी स्टेशन माजी विद्यार्थी संघ उपाध्यक्ष तसेच सिद्धी क्वा आर ओ वॉटर प्युरिफायरचे नवनाथ खळेकर यांनी दिलेल्या ५१००० रुपये किंमतीच्या आरो सिस्टीम -शुद्ध पिण्याचे पाणी यंत्राचे उद्घाटन शिक्षणाधिकारी भास्कर पाटील यांच्या हस्ते करण्यात आले. शाळेतील आरोग्यदायी परसबाग, गांडूळ खत प्रकल्प , जिल्हास्तरीय क्रीडा स्पर्धेतील विद्यार्थ्यांची प्रगती , राहुरी तालुका गणित विज्ञान प्रदर्शनातील विद्यार्थ्यांची प्रगती पाहून समाधान व्यक्त केले. कार्यक्रम यशस्वीतेसाठी शाळेच्या मुख्याध्यापिका उषा पवार ,चारुशीला रायकर ,कानिफनाथ बनकर व राहुल लोंढे यांनी परिश्रम घेतले. याप्रसंगी खडांबे गावचे उपसरपंच मोहन खळेकर, भानुदास कल्हापुरे, अर्जुनराव खळेकर ,राहुल कल्हापुरे , नवनाथ खळेकर ,प्रसाद शेळके ,राजेंद्र कल्हापुरे, गोरक्षनाथ कल्हापूरे , काकासाहेब खळेकर , दिलीप दुधाडे व पंचक्रोशीतील ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## टाकळीभान येथे महाशिवरात्री उत्सव उत्साहात

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री



**टाकळीभान** : श्रीरामपूर तालुक्यातील टाकळीभान येथे सालाबाद प्रमाणे याही वर्षी श्री शंभू महादेव मंदिर येथे महाशिवरात्री उत्सव मोठ्या उत्साहात संपन्न झाला.

येथील महादेव मंदिर हे पंचक्रोशीतील भाविकांचे श्रद्धास्थान असून पहाटे पासूनच शंभू दर्शनासाठी रांगा लागल्या होत्या. पहाटे ५.३० ते सकाळी ८ पर्यंत गंगाजल रुद्र अभिषेक पार पडला. तदनंतर सकाळी ९ ते १० या वेळेमध्ये ह भ प नानासाहेब माने, कु. राज किशोरी माने, चि. प्रयागराज माने यांच्या सुमधुर वाणीतून सुगम संगीत भजनाने भाविकांना मंत्रमुग्ध केले.

तदनंतर १० ते १२ या वेळेमध्ये राष्ट्रीय कीर्तनकार हभप सचिन महाराज ढोले (छ. संभाजीनगर) यांच्या सुस्राव्यवाणीतून कीर्तनाचा आस्वाद भाविकांनी घेतला. यानंतर उपस्थित सर्व भाविकांना खिचडी महाप्रसादाचे वाटप करण्यात आले. सकाळी पत्रकार दिलीप लोखंडे यांकडून राजगिरा लाडूचा प्रसादाचे वाटप करण्यात आले तसेच अ.भा. श्रीकृष्ण गोपाळ उत्कर्ष सामाजिक संघटनेद्वारे भाविकांना खिचडी व केळी वाटप करण्यात आली. सर्व भाविकांना शिस्तीमध्ये व शांततेत प्रसाद वाटप करण्यात आले. संयोजकांनी कार्यक्रमाचे उत्तम रित्या नियोजन केले. त्यास गावातील तरुण युवक मंडळ, महिला मंडळ, वस्तीगृहातील विद्यार्थी यांनी नियोजनासाठी परिश्रम घेऊन साथ दिली.

कार्यक्रमासाठी कारभारी चांडे, प्रकाश नाईक, महादेव यात्रा कमिटी, श्रीराम पायी दिंडी सोहळा समिती, श्री साईबाबा पायी दिंडी सोहळा समिती, ताई प्रतिष्ठान, पत्रकार सेवा संस्था, टाकळीभान व पंचक्रोशीतील भजनी मंडळ व समस्त ग्रामस्थ टाकळीभान यांचे अनमोल सहकार्य लाभले व आयोजकांच्या वतीने सर्व देणगीदारांचे, ज्ञात, अज्ञात हितचिंतकांचे आभार व्यक्त करण्यात आले.

यावेळी पत्रकार दिलीप लोखंडे मित्र मंडळाच्या वतीने महादेव मंदिराच्या प्रांगणामध्ये बेलाच्या झाडाचे वृक्षारोपण करण्यात आले. कार्यक्रम प्रसंगी टाकळीभान पोलीस दूरक्षेत्र कर्मचारी यांनी उपस्थित राहून बंदोबस्त ठेवला.

# महाशिवरात्री निमित्त मानवतेच्या कल्याणासाठी प्रार्थना : बाळासाहेब थोरात

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**संगमनेर** : आपण सरकारच्या माध्यमातून खांडगाव परिसर व मंदिर सुशोभीकरण व सुविधांसाठी सातत्याने मोठा निधी दिला. याचबरोबर ग्रामस्थांनी ही चांगली साथ दिली. त्यामुळे अत्यंत चांगल्या सुविधा दिल्याने खांडगाव हे धार्मिक पर्यटनासाठी मोठे तीर्थस्थळ ठरले असल्याचे प्रतिपादन काँग्रेस पक्षाचे वरिष्ठ नेते बाळासाहेब थोरात यांनी केले असून समस्त मानव जातीच्या कल्याणाकरिता त्यांनी शंभू महादेवाकडे प्रार्थना केली.

खांडगाव येथील खांडेश्वर मंदिरात लोकनेते बाळासाहेब थोरात यांनी विधिवत पूजा केली. यावेळी समवेत देवस्थान ट्रस्टचे अध्यक्ष लहानु भाऊ गुंजाळ, ड.मधुकर गुंजाळ, दूध संघाचे संचालक रमेश गुंजाळ, स्वामी दयानंद गिरी महाराज, सौ.अर्चनाताई बालोडे, कमलताई अरगडे, रावसाहेब गुंजाळ,अशोक गुंजाळ सर, कैलास गोसावी, वसंत गुंजाळ, बाळासाहेब गुंजाळ, लक्ष्मी पतसंस्थेचे चेअरमन संजय गुंजाळ, सोसायटीचे चेअरमन संदीप गुंजाळ, कफारेश्वर देवस्थानचे अध्यक्ष प्रवीण गुंजाळ, भीमराज गुंजाळ, रामनाथ गुंजाळ,बाजीराव गुंजाळ, श्रीरंग गुंजाळ व ग्रामस्थ उपस्थित होते.

यावेळी लोकनेते बाळासाहेब थोरात यांनी कपारेश्वर येथेही दर्शन



घेऊन जनतेला शुभेच्छा दिल्या. यावेळी बोलताना माजी मंत्री बाळासाहेब थोरात म्हणाले की, महाशिवरात्री हा हिंदू धर्मामध्ये शिवभक्तीचा अत्यंत पवित्र दिवस आहे. देशामध्ये मोठ्या उत्साहाने हा सण साजरा होतो. शंकराची पूजा भक्ती भावाने केली जाते. एक प्रसन्न वातावरण आणि आनंदाचे पर्व हे असते. खांडगाव येथील खांडेश्वर मंदिर त्याच प्रमाणे कपारेश्वर मंदिराच्या विकासासाठी आपण सातत्याने निधी दिला.

याचबरोबर गावकऱ्यांनी ही मोठा सहभाग घेत या ठिकाणी अत्यंत सुंदर परिसर हा निर्माण केला. खांडगाव हे धार्मिक पर्यटनाचे केंद्र ठरले आहे. याचबरोबर गोरगरीब नागरिकांच्या मुला मुलींच्या विवाहासाठी अत्यंत चांगली सुविधा या ठिकाणी निर्माण झाली आहे सुशोभीकरणामुळे हा परिसर प्रसन्न व शांत असून अनेक भाविकांची सातत्याने येथे मोठी वर्दळ असते. शिवरात्रीच्या सणानिमित्त राज्यातील जनता, शेतकरी व सर्वसामान्य माणूस व समस्त मानवतेच्या कल्याणासाठी प्रार्थना त्यांनी केली.

तर लहान भाऊ गुंजाळ म्हणाले की, लोकनेते बाळासाहेब थोरात यांची खांडेश्वर महादेवावर मोठी श्रद्धा आहे त्यांनी सातत्याने खांडेश्वर आणि कपालेश्वरच्या विकासासाठी निधी दिला आहे. त्यांच्या मार्गदर्शनाखाली या परिसराचा विकास झाले असल्याचे ते म्हणाले. यावेळी देवस्थानच्या वतीने लोकनेते बाळासाहेब थोरात यांचा सत्कार करण्यात आला. याचबरोबर जवळे बाळेश्वर येथील बाळेश्वर, धांदरफळ बुद्रुक येथील रामेश्वर, कोकणगाव येथील निझरणेश्वर, निमगाव जाळी येथील दूधेश्वर, काशी विश्वेश्वर यांसह गावा गावांमधील महादेव मंदिरांमधून भाविकांनी मोठी गर्दी केली. अत्यंत मोठ्या उत्साहात संगमनेर तालुक्यात सर्वत्र शिवजयंती साजरी करण्यात आली. भाविक भक्तांच्या वतीने अनेक ठिकाणी फराळाचे वाटप करण्यात आले.

# पाणी देण्याची जबाबदारी आम्ही घेतली, ती पूर्ण करू : आमदार अमोल खताळ

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**
**संगमनेर** ' तुम्हाला पाणी देण्याची जबाबदारी आम्ही घेतली आहे आणि ती निश्चितपणे पूर्ण करू. सावरगाव तळ, चंदनापुरी, हिवरगाव पावसा, झोळे आदी गावांना पाण्यापासून वंचित ठेवले जाणार नाही, असा ठाम शब्द अमोल खताळ यांनी दिला. सावरगाव तळ येथे ५ कोटी ७१ लाख रुपयांच्या विविध विकासकामांच्या शुभारंभप्रसंगी ते बोलत होते.

तळेगाव निमोण भागात भोजापूर चारीच्या माध्यमातून आणि साकुर पठार भागात उपसा जलसिंचन योजना व बॅरेज बंधाऱ्यांद्वारे पाण्याचा प्रश्न मार्गी लावला जात आहे. त्याच धर्तीवर या परिसरातील गावांनाही निळवंडे उजव्या कालव्यातून उपसा जलसिंचन योजनेद्वारे पाणी देण्यात येणार असल्याचे आमदार खताळ यांनी स्पष्ट केले.

या प्रसंगी नूतन ग्रामपंचायत इमारत, सभामंडप, व्यायामशाळा साहित्य, ग्रामदैवत म्हसोबा महाराज मंदिराकडे जाणाऱ्या रस्त्याची दुरुस्ती, विविध अंतर्गत रस्ते, जिल्हा परिषद शाळा व प्रवरामाध्यमिक विद्यालय परिसरात सोलर हायमास्ट दिवे, स्मशानभूमी सुशोभीकरण तसेच पिंपळगाव माथा–सावरगाव तळ–चंदनापुरी रस्त्याचे रुंदीकरण व डांबरीकरण अशा कामांचा शुभारंभ करण्यात आला. यावेळी शिवसेना तालुकाप्रमुख रामभाऊ राहाणे, भाजप तालुकाप्रमुख गुलाब भोसले, माजी सरपंच, विद्यमान सरपंच, पदाधिकारी व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. आमदार खताळ म्हणाले की, विधानसभा निवडणुकीत दिलेला पाण्याचा शब्द पूर्ण करण्याची संधी आम्हाला मिळाली आहे. माजी मंत्री स्व. बी. जे. खताळ यांनी सुरू केलेल्या पण अपूर्ण राहिलेल्या योजना पूर्ण केल्या जातील, अशी ग्वाहीही त्यांनी दिली.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सोमनाथ घुले यांनी केले. प्रस्ताविक शरद नेहे यांनी, तर आभार गोरक्ष नेहे यांनी मानले.

# गळनिब येथे एकलव्य जयंतीचे आयोजन निघणार भव्यदिव्य मिरवणुक

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**
**श्रीरामपूर :**
गुरुवर्य एकलव्य यांच्या जयंतीनिमित्त राज्यभरातील आदिवासी समाजामध्ये उत्साहाचे वातावरण आहे.एकलव्य जयंतीनिमित्त प्रवरा परिसरात धार्मिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आल्याची माहिती दत्तात्रय माळी व कैलास माळी यांनी दिली.

तालुक्यातील गळनिब–उक्कलगाव परिसरात एकलव्याची जयंती मोठ्या उत्साहात साजरी केली जाणार आहे.या जयंतीनिमित्त (दि.१७) फेब्रुवारी रोजी प्रतिमा पूजन, सांय.मिरवणूक त्यांनतर भव्य खिचडी महाप्रसादासह तसेच धार्मिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.आदिवासी समाजाचे श्रद्धास्थान एकलव्य यांच्या प्रतिमा पुजनाने कार्यक्रमांची सुरूवात केली जाणार आहे.याप्रसंगी दुपारी चार वाजता एकलव्य समाज प्रबोधन या विषयावर आदिवासी बचाव समितीचे पदाधिकारी प्रमुख मान्यवर मार्गदर्शन करणार आहे.

यात आदिवासी बचाव समितीचे संस्थापक शिवाजी गांगुर्डे, राष्ट्रीय श्रीराम संघाचे सागर बेग, एकलव्य सेनेचे ज्ञानेश्वर आहिरे, आदी प्रमुख मान्यवर कार्यक्रमस्थळी भेटी देणार आहे.याप्रसंगी सरपंच शिवाजी चिंधे, उपसरपंच दत्तात्रय माळी, हनुमंत चिंधे, आण्णासाहेब शिंदे,चांगदेव भागवत, संजय कुदनर, प्रा.एकनाथ ढोणे, बाळासाहेब वडितके, दिलीप बर्डे, मेहबूब आत्तार,आदी पदाधिकारी कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी प्रयत्नशील आहे.

## निधन वार्ता

### जनाबाई कराळे



**सोनई :** नेवासा तालुक्यातील कांगोणी येथील वयोवृद्ध जनाबाई सिताराम कराळे (वय ८५) यांचे वृद्धपकाळाने नुकतेच निधन झाले. त्यांच्या पश्चात तीन मुले, एक मुलगी, सुना, नातवंडे, असा मोठा परिवार आहे. सेवा सोसायटीचे संचालक रामभाऊ कराळे (एस. टी.कंडक्टर) आबासाहेब कराळे, भरत कराळे व जिजाबाई कर्डीले यांच्या त्या मातोश्री तर मुळा बँकेच्या संचालिका पुष्पाताई कराळे यांच्या त्या सासूबाई होत.

### मुरलीधर गडाख



**सोनई :** सोनई– वांबोरी रोड वरील गडाख वस्ती येथील आदर्श शिक्षक पुरस्कार प्राप्त व सेवानिवृत्त शिक्षक मुरलीधर हरिभाऊ गडाख वय ८० यांचे वृद्धपकाळाने नुकतेच निधन झाले. त्यांच्या पश्चात पुतणे, दोन मुले, तीन मुली,सून,भाऊ, नातवंडे असा परिवार आहे.अकोला कृषी विद्यापीठचे कुलगुरू डॉ. शरद गडाख यांचे ते चुलते तर राजेंद्र व व्यवसायिक अमृत गडाख यांचे ते वडील होत.

## पान १ वरुन

### टिपू सुलतान प्रकरण पेटले...

प्रमाणावर रक्तस्त्राव झाला. यावेळी महिला पोलिसांसह काही कारला देखील दगड लागले, या सर्व राड्यानंतर आणि काँग्रेस कार्यकर्त्याचे डोके फुटताच भाजप कार्यकर्त्यांचा काँग्रेस भवनासमोरुन काढता पाय घेतला. त्यावेळी काँग्रेसचे नेते आणि कार्यकर्ते देखील मोठ्या प्रमाणावर आक्रमक झाले.

महिला कॉन्स्टेबलला देखील दगड लागले आहेत, या ठिकाणी वरिष्ठ पोलिस देखील हजर होते, पोलिसांसमोर हे आंदोलन आणि दगडफेक झाली आहे. पुण्याच्या महापौर मंजुषा नागापुरे देखील त्या आंदोलनात होत्या, त्यांनी दगडफेक केली, त्यांना महिलांची काळजी नाही, त्यांना महिलांची सुरक्षा महत्त्वाची नाही, त्यांनी तातडीने राजीनामा दिला पाहिजे, अशी मागणी देखील काँग्रेसच्या कार्यकर्त्यांनी केली आहे. तर पोलिसांनी गोंधळ घालणाऱ्या काही कार्यकर्त्यांना ताब्यात घेतलं आहे. पोलिसांनी काँग्रेसच्या कार्यकर्त्यांशी बोलायला आले मात्र त्यांनी आक्रमक पवित्रा घेतल्याचं चित्र दिसून येत आहे. काँग्रेसने भाजप महापौरांना अटक करावी, त्यांनी महापौर पदाचा राजीनामा द्यावा अशी मागणी केली आहे.

पुण्याने कायमच या देशाला आणि राज्याला एक चांगली राजकीय आणि सामाजिक संस्कृती दिली, मात्र दुर्दैवाने आज यात संस्कृतीला काळिमा फासण्याचे काम पुणे शहर भाजपने केलेला आहे, पुण्याच्या महापौर मंजुषा नागपुरे यांच्या उपस्थितीत हल्ला चढवण्यात आला, आमच्या कार्यकर्त्यांची डोकी फोडण्यात आली, याच्यावर कुठेतरी आज या ठिकाणी पुण्याला काळीमा फासण्याचे काम भाजपच्या लोकांकडून झालेलं आहे, आज काँग्रेस पक्षाच्या कार्यालयावर झालेला हल्ला आणि काँग्रेसच्या कार्यकर्त्यांवर झालेल्या दगडफेकीचा हल्ला, डोके फोडण्यात आली, याला भाजपा जबाबदार आहे, भाजपने अराजकतेची आणि डोके फोडण्याची संस्कृती पुण्यात आणलेली आहे. याला पुणे शहर पोलीस देखील जबाबदार आहेत, असे आमचे म्हणणे आहे. त्याचं कारणही आहे, एक पुण्यातील मुख्य रस्ता दोन तासापासून भाजपाने अडवून ठेवलेला होता, तरीसुद्धा पोलिसांनी त्यांना हुसकवून लावलं नाही, त्यामुळे त्यांची डेरिंग वाढली, त्यानंतर त्यांनी कार्यालयावर हल्ला करण्यासाठी त्यांची मजल गेली, पोलिसांनी वेळीच ते सगळं थांबवलं असतं, तर असं काही झालं नसतं. आजपर्यंत कधीच आम्ही कोणत्याही राजकीय पक्षांनी कुठल्याही कार्यालयावर, दुसऱ्याही पक्षाच्या कार्यालयावर, मोर्चा नेलेला नव्हता कोणत्या नेत्याच्या कार्यालयावर मोर्चा नेला नव्हता, दुर्दैवाने आज सगळ्या गोष्टीला पोलिसांनी खतपाणी घातलं असा आमचा थेट आरोप आहे, असं प्रशांत जगताप यांनी म्हटलं आहे.

फरासखाना पोलिस स्टेशला मांडी घालून बसणार, धीरज घाटे आणि महापौर यांच्यावर गुन्हा दाखल होत नाही तोवर आम्ही उठणार नाही, आमच्या माणसांची डोकी फोडली आहेत, जोपर्यंत त्यांच्यावरती गुन्हा दाखल होत नाही, तोवर आम्ही शांत बसणार नाही, त्यांनी टेम्पो भरून दगडं आणली होती.
– अरविंद शिंदे, काँग्रेसचे शहराध्यक्ष

### घरकुलांना सौर योजनेचा 'लखलखाट'

वाढ केली आहे. राज्याच्या हिस्स्यातून अतिरिक्त अनुदान ५० हजार रु. देण्याचा निर्णय घेतला आहे.

राज्यात ग्रामीण भागातील लाभार्थ्यांना स्वतःचे घर उभारण्यासाठी त्याची मोठी मदत होणार आहे. राज्य सरकारने वाढ केलेल्या ५० हजारांच्या अनुदानातील ३५ हजार रु. बांधकामासाठी तर १५ हजार रु. पंतप्रधान सूर्यघर योजनेंत सौरऊर्जा यंत्रणेसाठी दिले जाणार आहेत. यासह केंद्र सरकार ३० हजार रुपयांचे अनुदान घरकुल लाभार्थ्यास सौर योजनेसाठी देणार आहे तसेच लाभार्थ्यास स्व:तकडील ५ हजार असे एकूण ५० हजार रु. सौर ऊर्जा योजनेसाठी मिळणार आहेत.

पंतप्रधान आवास योजना–ग्रामीण, रमाई, शबरी, यशवंतराव चव्हाण व मोदी आवास योजना आदी योजनांच्या माध्यमातून केंद्र व राज्य शासन ग्रामीण भागात बेघरांना घरकुलास अनुदान देते. नगर जिल्ह्यात पंतप्रधान आवास योजना ग्रामीण टप्पा– २ मध्ये १ लाख २५ हजार घरकुलांना मंजूरी देण्यात आली आहे. यातील १ लाख घरांची कामे सुरू असून सुमारे २८ ते ३० हजार घरकुलांची उभारणी झाली आहे. टप्पा दोनमधील मंजूरी दिलेली सर्व घरकुले सौर योजनेसाठी पात्र असल्याचे 'डीआरडीए'कडून समजले.

### राज्यात गावगाड्यांचा कारभार होणार ठप्प !

असल्याचा आरोप सरपंच परिषदेने केला आहे.तसेच स्थानिक स्वराज्य संस्थांमधून विधान परिषदेवर निवडून जाणाऱ्या सदस्यांच्या निवडणुकीत सरपंचांनाही मतदानाचा अधिकार देण्यात यावा, अशी मागणी करण्यात आली आहे. याशिवाय जिल्हा नियोजन समितीवर सरपंचांना प्रतिनिधी म्हणून संधी देण्यात यावी, जेणेकरून ग्रामीण भागाच्या विकासाशी संबंधित निर्णय प्रक्रियेत त्यांचा थेट सहभाग राहील. निवडणूक प्रक्रियेशी संबंधित तीन अपत्यांचा कायदा रद्द करून त्याबाबत सुधारित निर्णय घेण्यात यावा, ही आणखी एक महत्त्वाची मागणी आहे. हा कायदा ग्रामीण भागात अन्यायकारक ठरत असल्याचा दावा करत सरपंच परिषदेकडून तो तातडीने रद्द करण्याची मागणी करण्यात येत आहे. अनेक सेवा ठप्प होण्याची शक्यता या सर्व मागण्यांसाठी २० फेब्रुवारी रोजी राज्यभरातील जिल्हाधिकारी कार्यालयांसमोर मोर्चे आणि निदर्शनाच्या माध्यमातून आंदोलन करण्यात येणार आहे. या आंदोलनामुळे राज्यातील ग्रामपंचायत स्तरावरील कारभार, विकासकामे आणि नागरिकांशी संबंधित अनेक सेवा ठप्प होण्याची शक्यता असून शासन यावर काय भूमिका घेते, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

# प्रवरेच्या कृषी संघ विद्यापीठ जिल्हास्तरीय क्रीडा स्पर्धेत उपविजेता

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**
**लोणी :** महात्मा फुले कृषी विद्यापीठ, राहुरी अंतर्गत कृषी तंत्रज्ञान शिक्षण आयोजित जिल्हास्तरीय क्रीडा स्पर्धेत लोकनेते पद्मभूषण डॉ बाळासाहेब विखे पाटील प्रवरा ग्रामीण शिक्षण संस्थेच्या, लोणी येथील प्रवरा कृषी शास्त्र संस्थेअंतर्गत असणाऱ्या कृषी तंत्रनिकेतन विद्यालयाचा व्हॉलीबॉल व कबड्डी क्रीडा प्रकारामध्ये अनुक्रमे मुलांचा व मुलींचा संघ उपविजेता ठरलेला आहे.

या स्पर्धेत महात्मा फुले कृषी विद्यापीठ, राहुरी अंतर्गत १० जिल्हातील ८२ कृषी तंत्र व तंत्रनिकेतन विद्यालयातील एकूण ४९७ खेळाडूंनी सहभाग घेतला होता. प्रवरा कृषी शास्त्र संस्थेच्या अंतर्गत असलेल्या कृषी तंत्र निकेतन विद्यालयाचा व्हॉलीबॉल उपविजेता संघात गोल्हार वैष्णवी ,त्रिशा थोरात, तृप्ती गावडे, रविना पाटोळे यांचा तर कबड्डीमध्ये आदित्य भोर, कोल्हे आकाश, ओम काळे ,ओम निर्मळ , दत्ता पायगव्हाणे आदी खेळाडूंचा समावेश होता.

या सर्व यशस्वी खेळाडूंचा संस्थेचे संचालक डॉ. उत्तमराव कदम यांच्या हस्ते सन्मान करण्यात आला.यावेळी कृषी तंत्रनिकेतन महाविद्यालयाचे प्राचार्य प्रा. एस.बी. जोंधळे, प्रा. जे.बी. ब्राह्मणे आदी उपस्थित होते. उपविजेत्या संघाना क्रीडा शिक्षक एस.डी.डेंगळे, प्रा. जी.आर रोहोम यांचे मार्गदर्शन लाभले.



# कायगाव पुलाजवळ आढळला युवकाचा मृतदेह

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**
**गंगापूर:** तालुक्यातील कायगाव येथील पुलाजवळ एका २० वर्षीय युवकाचा मृतदेह आढळल्याची धक्कादायक घटना घडली आहे. मिटमिटा येथील सर्वेस संदीप आवचरमल (वय २०) हा युवक शुक्रवारी (दि. १३ फेब्रुवारी) आपली मोटारसायकल कायगाव येथील पुलावर सोडून बेपत्ता झाला होता.



गंगापूर–कायगाव परिसरातील श्री क्षेत्र रामेश्वर मंदिराजवळ महाशिवरात्रीच्या दिवशी नदीत एक मृतदेह आढळल्याची माहिती मिळताच रुग्णवाहिका चालक अनिकेत मुळक व शुभम वाघमारे तसेच पोलीस कर्मचारी विठ्ठल जाधव, पंकज बिरुटे व अमोल बिरुटे यांनी तात्काळ घटनास्थळी धाव घेतली. मृतदेह बाहेर काढून गंगापूर उपजिल्हा रुग्णालयात दाखल करण्यात आला डॉक्टर हर्षल धाबे यांनी सविच्छेदन केले.या प्रकरणी येथे अकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली असून पुढील तपास पोलीस कर्मचारी विठ्ठल जाधव करीत आहेत. घटनेमुळे परिसरात हळहळ व्यक्त होत आहे.

# संजीवनी इंजिनिअरींगच्या पाच विद्यार्थ्यांची ड्रिझल आयटीमध्ये निवड

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**
**कोपरगांव:** संजीवनी इंजिनिअरींग कॉलेजच्या पाच विद्यार्थ्यांची नामांकित आयटी कंपनी ड्रिझल आयटी सर्विसेस मध्ये नोकरीसाठी निवड झाली असुन विशेष म्हणजे इंटर्नशिप (आंतरवासिता) कालावधीतच त्यांना पगार सुरू झाला आहे. या यशामुळे महाविद्यालयाच्या गुणवत्तापूर्ण प्रशिक्षण पध्दतीची आणि ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांच्या क्षमतेची पुन्हा एकदा प्रचिती आली आहे, अशी माहिती कॉलेजने प्रसिध्दी पत्रकाद्वारे दिली आहे.

महाविद्यालयाच्या ट्रेनिंग अँड प्लेसमेंट विभागाने विद्यार्थ्यांना उद्योगमान्य कौशल्यांचे प्रशिक्षण , मुलाखतींचा सराव, तांत्रिक मार्गदर्शन आणि सॉफ्ट स्किल्स विकास यांची प्रभावी तयारी करून घेतली.




निवड झालेल्या विद्यार्थ्यांमध्ये कॉम्प्युटर इंजिनिअरींगच्या तन्मय राजेंद्र आचारे, रामेश्वर दिलीप भांड, आदित्य संजय लोंढे, प्रियंका वसंत मोहन व इन्फर्मेशन टेक्नॉलॉजीच्या समिक्षा किशोर नरोडे यांचा समावेश आहे.

# रेडिओ किसान दिनानिमित्त डॉ. विठ्ठलदास आसावा यांचा सन्मान

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**
**सोनगाव :** कृषी क्षेत्रातील सातत्यपूर्ण कार्य, आधुनिक तंत्रज्ञानाचा प्रभावी स्वीकार आणि शेतकरी बांधवांना सातत्याने मार्गदर्शन केल्याबद्दल कृषीभूषण डॉ. विठ्ठलदास बालकिसन आसावा यांना 'रेडिओ किसान दिना'निमित्त सन्मानित करण्यात आले. ऑल इंडिया रेडिओ च्या वतीने आयोजित कार्यक्रमात हा सन्मान प्रदान करण्यात आला.

आकाशवाणी अहिल्यानगर केंद्रावर रविवारी झालेल्या शेतकरी सन्मान समारंभात विविध मान्यवरांच्या उपस्थितीत डॉ. आसावा यांना सन्मानपत्र देऊन गौरविण्यात आले. कृषी क्षेत्रात संशोधनाधिष्ठित शेती पद्धतींचा अवलंब, पीक उत्पादनवाढ, मृदा आरोग्य संवर्धन आणि शेतकऱ्यांमध्ये नवतंत्रज्ञानाविषयी जागरूकता निर्माण करण्यासाठी त्यांनी केलेल्या कार्याची दखल घेत हा सन्मान देण्यात आला.



डॉ. आसावा यांनी आकाशवाणीच्या 'किसानवाणी' तसेच 'आमचं शेत, आमचा परिसर' या कृषी विशेष कार्यक्रमांमधून शेतकऱ्यांना वेळोवेळी मार्गदर्शन केले आहे. बदलत्या हवामान परिस्थितीत शाश्वत शेती कशी करावी, पीक व्यवस्थापन, कीड–रोग नियंत्रण, पशुपालनातील सुधारणा आणि बाजारपेठेतील संधी याबाबत त्यांनी सोप्या भाषेत दिलेल्या मार्गदर्शनामुळे अनेक शेकऱ्यांना लाभ झाला आहे. कार्यक्रमाला जिल्हा परिषदेचे कृषी विकास अधिकारी सुधीर शिंदे, सहसंपादक प्रकाश पाटील, ज्येष्ठ पत्रकार सुधीर लंके, महात्मा फुले कृषी विद्यापीठ प्रसारण केंद्रप्रमुख डॉ. सचीन सदाफळ, पशुसंवर्धन उपायुक्त डॉ. उमेश पाटील, दहिगाव केव्हीके प्रमुख शामसुंदर कौशिक, कार्यक्रम अधिकारी सुदाम बटुळे, उपविभागीय कृषी अधिकारी दत्तात्रय डमाळे, पाथर्डीचे तालुका कृषी अधिकारी महादेव जोगदंड आदी उपस्थित होते.

# हनुमंतगावात एकलव्य जयंती उत्साहात

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**
**सोनगाव :** भगवानएकलव्य यांच्या जयंतीनिमित्त हनुमंतगाव येथे शिक्षण, संघटन आणि स्वाभिमानाचा संदेश देणारा भव्य कार्यक्रम उत्साहात पार पडला. एकलव्य आदिवासी सेना महाराष्ट्र राज्य, एकलव्य मित्रमंडळ हनुमंतगाव व पंचक्रोशीतील ग्रामस्थ यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित कार्यक्रमाची सुरुवात प्रतिमापूजनाने झाली.

यावेळी छत्रपती शिवाजी महाराज, भगवान एकलव्य, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, महात्मा ज्योतिबा फुले, सावित्रीबाई फुले व पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर यांच्या प्रतिमांचे पूजन करण्यात आले.पद्मश्री विखे पाटील सहकारी साखर कारखान्याचे संचालक अशोक घोलप यांनी आपल्या मनोगतात एकलव्यांच्या जीवनकार्याचा आढावा घेत शिक्षण हाच खरा परिवर्तनाचा मार्ग असल्याचे सांगितले. प्रदेशाध्यक्ष शिवाजी गांगुर्डे यांनी आपल्या भाषणात गुरु–शिष्य परंपरेचे महत्त्व स्पष्ट करत ज्ञानार्जनाला प्राधान्य देण्याचे आवाहन केले.

CHANGE OF NAME

I HAVE CHANGE MY OLD NAME
RASHID UMARBHAI SHAIKH (NAME AS
PER OLD PASSPORT NO.N5364799)
TO NEW NAME AS
RASHID UMAR SHAIKH VIDE AADHAR
NO.8014 0076 9614

# व्हॅलेंटाईन डेवर शालेय विद्यार्थ्यांनी दिला पर्यावरणाचा संदेश

## 'वनराई पर्यावरण बालोत्सव' थाटात संपन्न

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**
**पुणे :** या वर्षी व्हॅलेंटाईन डे तरुणाई साजरा करत असताना, शालेय विद्यार्थ्यांनी पर्यावरण संवर्धनाचा संदेश देत हा दिवस विशेष केला. पद्मविभूषण डॉ. मोहन धारिया यांच्या १०१ व्या जयंतीनिमित्त आयोजित 'वनराई पर्यावरण बालोत्सव' उत्साहात आणि थाटामाटात पार पडला.

टिळक स्मारक मंदिर येथे झालेल्या आंतरशालेय कार्यक्रमात पथनाट्य आणि लोककला स्पर्धा यांचा समावेश प्रथमच करण्यात आला होता. भारूड, पोवाडा, कीर्तन आणि पर्यावरण विषयक गीते यांमधून विद्यार्थ्यांनी पर्यावरण संवर्धनाचे महत्त्व प्रभावीरीत्या मांडले. विजेत्या संघांनी गावागावांमध्ये जाऊन पर्यावरण जनजागृती करण्याची ग्वाही दिली.

एकूण ७० शाळांनी सहभाग नोंदवला असून ३० शाळा अंतिम फेरीत पोहोचल्या होत्या. शिक्षकांनी रचलेली सादरीकरणे आणि विद्यार्थ्यांच्या सर्जनशीलतेने उपस्थितांना मंत्रमुग्ध केले. या सोहळ्यात 'नाळ' चित्रपटातील राष्ट्रीय चित्रपट पुरस्कार विजेते बालकलाकार श्रीनिवास पोकळे प्रमुख पाहुणे होते.

वनराईचे विश्वस्त रोहिदास मोरे, सागर धारिया, सचिव अमित वाडेकर, अकोला जिल्हाप्रमुख बबनराव कानकिरड, जनसेवा फाउंडेशनचे अध्यक्ष डॉ. विनोद शहा, प्रा. वसंत बंग आदी मान्यवर उपस्थित होते. स्व. डॉ. मोहन धारिया, स्व. अण्णासाहेब बेहरे आणि स्व. तुळसाबाई सातारकर स्मृती पुरस्कारांचे वितरण पार पडले. इंदिरा बेहेरे चॅरिटेबल ट्रस्ट आणि महाराष्ट्र फाउंडेशन, अमेरिका यांचे सहकार्य लाभले.

सागर धारियांनी शिक्षकांना बालकांमध्ये पर्यावरणीय संस्कार रुजविण्यासाठी कृतीशील सहभाग घेण्याचे आवाहन केले, तर अमित वाडेकर यांनी इको क्लबद्वारे शाळांमध्ये निबंध, चित्रकला, वृक्षारोपण, जलसंवर्धन आणि घनकचरा व्यवस्थापन यांसारख्या कार्यक्रमांचा उल्लेख केला.

वनराईच्या उपक्रमांमुळे लहान मुलांमध्ये पर्यावरण संवर्धनाची बीजे रोवली जात आहेत आणि शाश्वत ग्रामीण विकासाचा संदेश पुढील पिढ्यांपर्यंत पोहोचवण्याचे काम सुरू आहे. या सोहळ्यात विद्यार्थ्यांचा उत्साह, सर्जनशीलता आणि सामाजिक बांधिलकी प्रेरणादायक ठरली.






विद्यार्थी 'वनराई पर्यावरण बालोत्सव' मध्ये भारूड, पोवाडा आणि पर्यावरण विषयक सादरीकरण करताना उत्साहात सहभागी झालेले.

## नशिबाची परिक्षा

**रविवार दि. १५ फेब्रुवारी २०२६**

| उदय-अस्त | | सिंगल / जोड |
|---|---|---|
| **मिलनम डे** | | सिंगल ५-१-९ मजबुत |
| १७० २६० ४०० | ८-५ | १४० २३० ६९० |
| | | जोड ८१-२५-६९-३८-५४ |
| **कल्याण** | | सिंगल ९-४-५ मजबुत |
| १२० ६७० १३९ | ३-० | १२७ १९० ११८ |
| | | जोड ३१-८०-४२-७५-०२ |
| **मुंबैम (मेन)** | | सिंगल ४-७-९ मजबुत |
| १४९ २४८ ४४६ | ४-१ | १२८ २९० २२७ |
| | | जोड ४६-८१-०५ ७९-१२ |

सदर शुभांक हे संख्याशास्त्र व ज्योतिष आधारीत आहे, कृपया दुरूपयोग करू नये. मो. ९९७५४७९८२६

## शुभ लाभ

| Date | Mon | Tue | Wed | Thu | Fri |
|---|---|---|---|---|---|
| 10/11/2025 to 14/11/2025 | 356 40 479 | 900 92 237 | 279 89 667 | 350 81 137 | 579 10 280 |
| 17/11/2025 to 21/11/2025 | 156 29 135 | 190 05 799 | 460 03 490 | 233 87 269 | 149 43 256 |
| 24/11/2025 to 28/11/2025 | 335 19 900 | 689 35 690 | 247 38 800 | 120 36 150 | 116 81 678 |
| 01/12/2025 to 05/12/2025 | 688 20 488 | 460 00 145 | 128 17 223 | 168 57 377 | 239 45 177 |
| 08/12/2025 to 12/12/2025 | 239 42 147 | 469 92 138 | 130 43 300 | 889 57 179 | 110 22 480 |
| 15/12/2025 to 19/12/2025 | 120 37 359 | 233 86 169 | 237 27 557 | 378 80 578 | 134 85 500 |
| 22/12/2025 to 26/12/2025 | 220 41 470 | 160 76 466 | 600 67 449 | 680 47 340 | 336 27 368 |
| 29/12/2025 to 02/01/2026 | 259 63 599 | 340 75 348 | 250 71 344 | 136 05 140 | 123 64 699 |
| 05/01/2026 to 09/01/2026 | 477 86 178 | 458 73 580 | 355 34 338 | 239 46 259 | 123 67 188 |
| 12/01/2026 to 16/01/2026 | 490 33 148 | 190 09 126 | 479 08 468 | 116 84 770 | 358 62 147 |
| 26/01/2026 to 30/01/2026 | *** ** *** | 120 30 118 | 679 23 346 | 134 83 247 | 249 52 138 |
| 02/02/2026 to 06/02/2026 | 129 28 170 | 249 55 780 | 570 20 677 | 377 73 247 | 134 87 458 |
| 09/02/2026 to 13/02/2026 | 378 82 778 | 126 93 157 | | | |

* वरील शुभांक किंवा संख्या या ज्योतिषशास्त्र व संख्याशास्त्रावर आधारित आहेत. या शुभांकांचा कोणताही दुरुपयोग करू नये *

# तोतया पोलीस निरीक्षक बनून ५ लाखांची खंडणी

## नगर सायबरची गडचिरोलीत कारवाई

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**अहिल्यानगर** : पोलीस अधिकारी असल्याचे भासवून सामान्य नागरिकांना अटक करण्याची धमकी देत लाखोंची खंडणी उकळण्याचा प्रकार उघडकीस आला आहे. अहिल्यानगर सायबर पोलिसांनी गडचिरोलीच्या नक्षलग्रस्त भागात धाडसी कारवाई करत मुख्य संशयित आरोपीला जेरबंद केले आहे. चंदन दिगूराम सांगळे (वय ३०, रा. आष्टी, ता. चामोर्शी, जि. गडचिरोली) असे अटक करण्यात आलेल्या आरोपीचे नाव असून, तो अभियांत्रिकी शिक्षित असल्याचे समोर आले आहे.

याप्रकरणी अहिल्यानगर सायबर पोलीस ठाण्यात खंडणी, माहिती तंत्रज्ञान कायदा आदी कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. नगरमधील फिर्यादीला आरोपीने स्वतःची ओळख वरिष्ठ पोलीस निरीक्षक राहुल पाटील अशी करून दिली. तुमच्याविरोधात गंभीर तक्रार आली आहे. अटक टाळायची असेल तर ५ लाख रुपये तत्काळ द्या, अशी धमकी देत आरोपीने भीतीचे वातावरण निर्माण केले. कुटुंबीयांनाही अटक करण्याची भाषा वापरून आरोपीने फिर्यादीला मानसिकदृष्ट्या घाबरवण्याचा प्रयत्न केला होता. गुन्ह्याचे गांभीर्य लक्षात घेऊन पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे यांच्या मार्गदर्शनाखाली सायबर पथकाने कॉल डिटेल्स, आयपी लॉग्स व डिजिटल पुराव्यांचे विश्लेषण केले.



तपासादरम्यान आरोपीचा माग गडचिरोली जिल्ह्यात लागला. पोलीस निरीक्षक सागर ढिकले यांच्या नेतृत्वाखालील पथक तात्काळ गडचिरोलीकडे रवाना झाले. आष्टी (ता. चामोर्शी) परिसरात पोलिसांची चाहूल लागताच आरोपीने आपल्या स्विफ्ट कारने पळ काढण्याचा प्रयत्न केला. नक्षलग्रस्त आणि दुर्गम परिसर असूनही पोलिसांनी धाडस दाखवत आरोपीचा पाठलाग केला.

स्थानिक आष्टी पोलीस ठाणे यांच्या पथकाच्या मदतीने आरोपीला अखेर ताब्यात घेण्यात यश आले. या कारवाईदरम्यान आरोपीकडील गुन्ह्यात वापरलेला मोबाईल जप्त करण्यात आला आहे.

### उच्चशिक्षित; राज्यभर गुन्हे

अटक करण्यात आलेला चंदन सांगळे हा बी.ई. (इंजिनिअरिंग) शिक्षित असून आपल्या तांत्रिक ज्ञानाचा गैरवापर करत होता. इंटरनेटच्या माध्यमातून विविध होस्टेल चालक, लॉज मालक व व्यावसायिकांचे संपर्क क्रमांक मिळवून त्यांना लक्ष्य केले जात होते. त्याच्याविरुद्ध यापूर्वी रत्नागिरी तसेच गोंदिया जिल्ह्यांत फसवणुकीचे गुन्हे दाखल असल्याची माहिती तपासात उघड झाली आहे. आरोपीला न्यायालयात हजर केले असता न्यायालयाने तीन दिवसांची पोलीस कोठडी सुनावली आहे.

## द•ख•ल

### तपेश्वर मंदिरात महाशिवरात्रीनिमित्त बेलवृक्ष लागवड

**अहिल्यानगर** : भिंगार येथील तपेश्वर मंदिर परिसरात महाशिवरात्रीनिमित्त हर दिन मॉर्निंग ग्रुपच्या वतीने 'बम बम भोले'च्या गजरात मंदिरासमोरील परिसरात बेलाच्या झाडाची लागवड करून पर्यावरण संवर्धनाचा संदेश देण्यात आला. यानंतर मंदिर परिसरात स्वच्छता अभियान राबवून सार्वजनिक स्वच्छतेचे महत्त्व अधोरेखित करण्यात आले. मंदिर परिसरात स्वच्छता करून प्लास्टिकमुक्तीचा संदेश देण्यात आला. स्वच्छ मंदिर, स्वच्छ परिसर आणि हरित वातावरण या संकल्पनेवर भर देत उपस्थितांना पर्यावरण संवर्धनाचे आवाहन करण्यात आले. महाशिवरात्रीच्या पावन पर्वावर शिवलिंगाची विधीवत पूजा करून या उपक्रमाची सुरुवात करण्यात आली. बेलवृक्ष हे भगवान शिवाला अत्यंत प्रिय मानले जाते. त्यामुळे धार्मिक परंपरेला पर्यावरणाची जोड देत हा उपक्रम राबविण्यात आला. यावेळी दर्शनासाठी आलेल्या भाविकांना खिचडी व फळांचे वाटप करण्यात आले.

### महाशिवरात्रीनिमित्त सिद्धेश्वर मंदिरात भाविकांची मोठी गर्दी




**लिंपणगाव** : येथील ग्रामदैवत सिद्धेश्वर महाराज मंदिर येथे महाशिवरात्रीनिमित्त पंचक्रोशीसह तालुक्यातील भाविकांनी दर्शन व महाभिषेकासाठी मोठी गर्दी केली होती. श्रीगोंदा तालुक्यात धार्मिक क्षेत्रात अग्रेसर असलेले हे देवस्थान नवसाला पावणारे म्हणून तालुका व जिल्ह्यात प्रसिद्ध आहे. महाशिवरात्रीच्या दिवशी पहाटेपासूनच अबालवृद्ध भाविकांनी सिद्धेश्वर महाराजांना महाभिषेक घालण्यासाठी उपस्थिती लावली होती. ग्रामदैवताचा यात्रा उत्सव असल्याने मंदिर परिसरात आकर्षक विद्युत रोषणाई करण्यात आली असून, त्यामुळे उत्सवाचे स्वरूप अधिक खुलले आहे. सध्या मंदिराचा जीर्णोद्धार पुरातत्त्व विभागाच्या अखत्यारीत सुरू असल्याने मंदिराच्या चहूबाजूंनी खोदकाम झाले आहे. यामुळे दर्शनासाठी येणाऱ्या भाविकांना काही अडचणींचा सामना करावा लागत असल्याची नाराजी व्यक्त होत आहे. यात्रेनिमित्त तीन दिवस धार्मिक व सांस्कृतिक कार्यक्रमांचे नियोजन करण्यात आले आहे. कोणताही अनुचित प्रकार घडू नये यासाठी किरण शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला आहे. महाशिवरात्रीच्या धार्मिक विधींसाठी ज्येष्ठ विधीतज्ज्ञ सुधीर कुलकर्णी व गुरव दांपत्य परिश्रम घेत आहेत. भाविकांनी मोठ्या भक्तिभावाने दर्शनाचा लाभ घेतला.

# कर्जतकरांच्या सेवेत वैकुंठ रथ लोकार्पण

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**कर्जत** : कर्जतकरांच्या निकटतेची गरज ओळखून सिद्धिविनायक पतसंस्थेने वैकुंठ रथ आज कर्जतच्या सेवेत दाखल केला. निश्चित मेलेल्या माणसाची अंत्ययात्रा आता सुखदायी होणार आहे. कारण मेलेल्या प्रेताला खांदा कोणी द्यावा याची पण शोधाशोध करावी लागण्याची परिस्थिती धावपळीच्या जीवनात निर्माण झाली आहे.




त्यामुळे हा वैकुंठ रथ कर्जतच्या स्मशानभूमीसारखा लोकांच्या पसंतीस उतरेल असे प्रतिपादन हभप दयानंद महाराज कोरेगावकर यांनी केले. ते कर्जत येथे सिद्धिविनायक पतसंस्थेच्या रौप्य महोत्सवीनिम्मित वैकुंठ रथाच्या लोकार्पण सोहळ्याप्रसंगी बोलत होते. यावेळी सर्वच क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते. मुंबई मंत्रालयातील कर्जतचे भूमिपुत्र आरोग्य सचिव विलास बेद्रे म्हणाले की, कर्जतकरांच्या आठवणीतला वैकुंठ रथाचा सोहळा आज पार पाडला. सिद्धिविनायक पतसंस्थेने दिलेला वैकुंठ रथ कर्जतच्या देखण्या स्मशानभूमीला शोभणारा आहे. सर्वसामान्य नागरिकांची परवड या लोकार्पण सोहळ्याने दूर झाली. मित्र म्हणून नंदकुमार लांगोरे कायम लोकोपयोगी उपक्रम राबवत आहे.

त्याचे उपक्रम निश्चित सर्वसामान्य नागरिकांसाठी हितावह असते. यावेळी कर्जतच्या नगराध्यक्षा रोहिणी घुले, महाराष्ट्र लोकसेवा आयोगाचे खाजगी सचिव गिरीश महाजन, माजी नगराध्यक्ष नामदेव राऊत, सुनील शेलार, बाळासाहेब साळुंके, दादासाहेब सोनमाळी, अनिल गदादे, सचिन पोटरे, सतीश पाटील, काका धांडे, सुरेश खिस्ती, डॉ प्रकाश भंडारी आदींची भाषणे झाली.

# महाशिवरात्री निमित्त वृद्धेश्वरला तीन लाख भाविकांचे दर्शन

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**करंजी** : लाखो भाविकांचे श्रद्धास्थान असलेल्या श्रीक्षेत्र वृद्धेश्वर येथे महाशिवरात्रीनिमित्त यात्रा उत्सवाचे आयोजन करण्यात आले होते.यावेळी लाख भाविकांनी श्री वृद्धेश्वराचे दर्शन घेत हर हर महादेव अशा घोषणा देत वृद्धेश्वर परिसर दणाणून गेला. गेवराई ते वृद्धेश्वर रस्ता गर्दीने फुलून गेला होता.रविवारी पहाटे पासूनच भाविकांनी दर्शनासाठी रांगा केल्या होत्या. संपूर्ण मंदिर परिसरात फुलांनी आकर्षक सजवले होते. सकाळी सहा वाजता आ. मोनिकाताई राजळे, जिल्हा सहकारी बँकेचे संचालक अक्षय कर्डिले, दीपक लांडगे या मान्यवरांच्या हस्ते वृद्धेश्वरच्या स्वयंभू पिंडीची विधिवत महापूजा व मुख्य आरती पार पडली. देवस्थान ट्रस्टच्या वतीने आमदार मोनिकाताई राजळे यांचा सत्कार करण्यात आला. तसेच देणगीदारांचाही यावेळी मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. महाशिवरात्रीनिमित्त वृद्धेश्वर मंदिरावर आकर्षक विद्युत रोषणाई करण्यात आली होती, कुशल भास्कर तसेच दीपक महाराज मित्र परिवाराच्या वतीने भाविकांना मोफत खिचडी वाटप केली. तर घाटशिरस येथील चालक मालक मित्रमंडळाच्या वतीने भाविकांसाठी मोफत चहाची व्यवस्था केली होती.



रविवारी सायंकाळी श्रीक्षेत्र पैठण येथून आणलेल्या गंगाजलने शिवपिंडीस जलस्नान घातले. रात्री पालखी छबिना मिरवणूक काढली जाणार आहे. देवस्थान कमिटीकडून महाशिवरात्रीनिमित्त येणाऱ्या भाविकांच्या सुलभ दर्शनाची त्याचबरोबर निवासस्थानाची व्यवस्था करण्यात आली होती त्यामुळे कमी वेळेत भाविकांना दर्शन होत असल्यामुळे भाविकांनी समाधान व्यक्त केले सकाळी ११ नंतर मात्र लांबच लांब रांगा लागल्याने दर्शनाला वेळ लागत होता. शिवरात्रीनिमित्त राज्यभरातील सुमारे तीन लाख भाविकांनी स्वयंभू वृद्धेश्वराच्या दर्शनाचा लाभ घेतला असल्याचे देवस्थानचे अध्यक्ष गणेश पालवे यांनी सांगितले.

# अपयशाने न खचता स्पर्धेत जो टिकतो तोच खरा विद्यार्थी : गिरीश महाजन



प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**कर्जत** : सध्या शैक्षणिक क्षेत्रात सर्वच ठिकाणी मोठी स्पर्धा असून यात जो शिकतो, निरंतर परिश्रम करतो आणि अवलोकन करीत परीक्षेत सर्वोत्कृष्ट मांडतो. त्यास यश हमखास मिळते. यशाने हुरळून जायचे नाही. आणि अपयशाने खचू न जाता त्यास सामोरे जातो तोच खरा मनुष्य असतो. आयुष्याची जडण-घडणच चढ-उताराने सुरू होती. मात्र त्यास पाठ न दाखवता जो तोंड देतो त्याचा यशाचा आलेख सर्वोत्तम ठिकाणी पहावयास मिळतो असे प्रतिपादन महाराष्ट्र राज्य लोकसेवा आयोगाचे खाजगी सचिव गिरीश महाजन यांनी केले.

ते कर्जत येथे रविशंकर विद्यामंदिराच्या वार्षिक पारितोषिक वितरण समारंभ आणि दहावीच्या विद्यार्थी निरोप समारंभप्रसंगी बोलत होते. या कार्यक्रमासाठी मुंबई मंत्रालयातील आरोग्य विभागाचे उपसचिव विलास बेद्रे, गटविकास अधिकारी अजिंक्य सूर्यवंशी, गटशिक्षणाधिकारी प्रदीप चव्हाण, सेवानिवृत्त उपविभागीय कृषी अधिकारी राजेंद्र सुपेकर, पोलीस निरीक्षक कैलास काळे, कृषी अधिकारी सोन्याबाप्पू धनावटे, संस्थेचे प्रमुख कार्यवाहक नंदकुमार लांगोरे उपस्थित होते.

यावेळी बोलताना उपसचिव विलास बेद्रे म्हणाले की, आयुष्यात प्रत्येक व्यक्ती हा कायम विद्यार्थी असतो. जे सभोवताली चांगले घडते त्यातून अनुभवाची शिदोरी मिळते. परिस्थिती कशी पण असो पण जो त्यावर मात करतो, स्पर्धेत स्वताला झोकून देतो. तो निश्चित यशस्वीच ठरतो. आई-वडील, शाळा, गुरूजन आणि आयुष्याच्या प्रत्येक कठीण प्रसंगात सोबत असणाऱ्या सर्वांचे ऋण कधीच विसरु नका. कारण हीच माणसे जीवनाचे अनमोल साथीदार असतात. खूप जणांच्या आयुष्यात ही माणसे आढळतात. जे आहे त्यात समाधान मानायला शिका.

स्पर्धा असावी पण ती जीवघेणी नसावी. जे मिळाले ते सर्वोत्तम समजून आयुष्य जगा आणि स्वताची प्रगती साधा असे आवाहन उपस्थित विद्यार्थ्यांना केले. कार्यक्रम यशस्वीतेसाठी मुख्याध्यापिका सविता बळे, शबाना शेख, विद्यार्थी प्रतिनिधी यशराज थोरात, अनुष्का गदादे यांच्यासह सर्व शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी विशेष परिश्रम घेतले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सारिका बनकर, संजय मडके यांच्यासह सोहम तापकीर, कार्तिकी देवकाते यांनी पार पाडले. तर आभार संस्थेचे प्रमुख कार्यवाहक नंदकुमार लांगोरे यांनी मांडले.

# स्विकृत नगरसेवकपदी निवड झाल्याने सुनील भंडारी यांचा सन्मान

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**मिरजगाव** : कर्जत तालुक्यामधील ग्रामीण भागातील मिरजगावच्या मातीत जन्मलेल्या आणि व्यवसायानिमित्त साताऱ्यात गेली पंचवीस वर्षांपासून स्थायिक झालेले सुनीलकुमार मोहनलाल भंडारी यांनी सातारा नगरपालिकेच्या निवडणुकीत भाजपा पक्षाचे प्रामाणिकपणे काम केल्याने त्यांना स्वीकृत नगरसेवक पद मिळाले. त्यांच्या या यशाने साताऱ्यामध्ये मिरजगावचे सुपुत्र असलेले भंडारींचा डंका वाजला आहे. सातारा नगरपालिकेच्या स्विकृत नगरसेवकपदी सुनिलकुमार भंडारी यांची निवड झाल्याने समस्त मिरजगाव ग्रामस्थांच्या वतीने त्यांचा नुकताच भव्य नागरी सत्कार करण्यात आला.

येथील जैन स्थानक या ठिकाणी विविध क्षेत्रातील मान्यवरांच्या उपस्थितीत त्यांचा फेटा बांधून व पुष्पहार घालून सत्कार करण्यात आला. सातारा येथे स्थायिक झालेले भंडारी यांना अनेक वेळा संधी उपलब्ध असताना देखील त्यांनी महाराष्ट्र राज्याचे सार्वजनिक बांधकाम विभाग मंत्री ना. छत्रपती शिवेंद्रसिंहराजे भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली त्यांच्या सोबत राहून प्रामाणिकपणे काम केल्याने त्यांच्या या कामाची पावती म्हणून त्यांना स्वीकृत नगरसेवक पदाची माळ त्यांच्या गळ्यात घालण्यात आली.





मिरजगावच्या सुपुत्राला मिळालेला हा बहुमान नक्कीच अभिमानास्पद असून त्यांना मिळालेल्या या पदामुळे मिरजगावकरांच्या शिरपेचात एक मानाचा तुरा रोवला गेला आहे. नागरी सत्कार समारंभ कार्यक्रमात ज्येष्ठ नेते डॉ.आदिनाथ चेडे, जिल्हा बँकेचे संचालक अंबादास पिसाळ, भाजपाचे ज्येष्ठ नेते डॉ.रमेश झरकर, हरिदास केदारी, गंगाधर पांडुळे, जि.प.सदस्य गुलाबराव तनपुरे, माजी उपसभापती प्रशांत बुद्धिवंत, सावता परिषदेचे तालुकाध्यक्ष डॉ.पंढरीनाथ गोरे, मा. सरपंच नितीन खेतमाळस, उपसरपंच लहुजी वतारे, संपत बावडकर, उद्योजक उद्धवराव नेवसे, अतुल राजेजाधव, पोपट कोरडे, दत्तात्रय तुपे आदींसह विविध क्षेत्रातील मान्यवर, जैन समाज बांधव व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी सत्कारमूर्ती भंडारी म्हणाले, जन्मभूमीत आपल्याच गावातील लोकांकडून सत्कार होणे हे लाखमोलाचे भाग्य आहे. यातून केवळ सत्कारमूर्तीलाच प्रेरणा मिळत नसून सर्व समाजासाठी प्रेरणादायी असल्याने मिरजगाव करांकडून माझा झालेला सन्मान हा लाखमोलाचा व अविस्मरणीय आहे.

# लोटस प्री स्कूल शेवगावचे 'इनक्रेडिबल इंडिया'

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**शेवगाव** : खांदाट विद्या साक्षरता प्रसारक मंडळ संचलित लोटस प्री स्कूल, शेवगाव येथील वार्षिक स्नेहसंमेलन मोठ्या उत्साहात व दिमाखात पार पडले. यंदाच्या स्नेहसंमेलनाची मुख्य संकल्पना इनक्रेडिबल इंडिया अशी असून, भारतातील विविध संस्कृती, परंपरा, कला, वेशभूषा व देशभक्तीची भावना यांचे आकर्षक सादरीकरण चिमुकल्या विद्यार्थ्यांनी नृत्य, गीते व अभिनयातून केले. संपूर्ण कार्यक्रम देशभक्तीमय वातावरणात रंगून गेला. कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे म्हणून देवीप्रसाद सोहोनी उपस्थित होते. त्यांनी विद्यार्थ्यांशी प्रेमळ संवाद साधत मनोरंजनाबरोबरच जीवनातील महत्त्वाच्या बाबींवर मार्गदर्शन केले. मोबाईलचा अतिरेकी वापर मुलांच्या आरोग्यास व मानसिक विकासास कसा घातक ठरतो, याची माहिती देत त्यांनी मोबाईलऐवजी खेळ, वाचन, सर्जनशील उपक्रम व मैदानी क्रियाकलापांचे महत्त्व पटवून दिले.

मान्यवर पाहुणे म्हणून राजीव रसाळ सर, रसाळ मॅडम व योगेश साबळे सर यांनी उपस्थित राहून कार्यक्रमाची शोभा वाढवली. कार्यक्रमात विद्यार्थ्यांनी सादर केलेली देशभक्तीपर गीते व विविध राज्यांच्या संस्कृतीवर आधारित नृत्ये विशेष आकर्षण ठरली.

विद्यार्थ्यांचा आत्मविश्वास, आनंद व उत्साह संपूर्ण कार्यक्रमभर दिसून आला. पालकवर्गाचीही मोठ्या प्रमाणावर उपस्थिती लाभली. कार्यक्रमाचे प्रभावी सूत्रसंचालन स्वप्नजा खांदाट व रुचिता बंग यांनी केले. तसेच प्रियांका सोनवणे मॅडम, रोजमीन सय्यद मॅडम, अश्विनी काळे मॅडम, श्रुती शेळके मॅडम, कविता लाटे मॅडम, अश्विनी मुंढे मॅडम, अमृता जोशी मॅडम व शुभांगी पलोड मॅडम यांच्यासह संपूर्ण शिक्षकवर्ग उपस्थित होते. शाळेच्या प्राचार्या वर्षा खांदाट यांनी आपल्या भाषणात वर्षभर विविध सण-समारंभांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांमध्ये संस्कार व संस्कृतीची ओळख करून दिली जाते, तसेच आनंददायी व क्रियाशील शिक्षण पद्धतींचा अवलंब करून कोणताही अनावश्यक ताण न देता शिक्षण दिले जाते, असे स्पष्ट केले.

शाळेचे चेअरमन संतोष खांदाट यांनी विद्यार्थ्यांचे, शिक्षकांचे व पालकांचे कौतुक करत सर्वांना शुभेच्छा दिल्या. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी शाळेच्या सर्व शिक्षकांनी घेतलेल्या मेहनतीमुळे स्नेहसंमेलन अत्यंत शिस्तबद्ध, आकर्षक व यशस्वीरीत्या पार पडले. उपस्थितांनी कार्यक्रमाचे भरभरून कौतुक केले.

# बोगस दिव्यांग प्रमाणपत्रांचा खेळ?

## 'चमच्याच्या' आशीर्वादाने नोकरीचा शॉर्टकट ?

दादा सोनवणे । राष्ट्र सह्याद्री

**श्रीगोंदा** : श्रीगोंदा तालुक्यात पुन्हा एकदा प्रशासनाच्या पारदर्शकतेवर प्रश्नचिन्ह उभे राहिले आहे. दिव्यांग कोट्यातील नोकऱ्यांसाठी काही जणांनी बोगस प्रमाणपत्रांच्या आधारे प्रवेश मिळवल्याची जोरदार चर्चा रंगली आहे. आणि या प्रकरणामागे एका प्रभावशाली राजकीय नेत्याच्या निकटवर्तीयाचा 'आशीर्वाद' असल्याची कुजबुज सध्या तालुक्यात वाऱ्यासारखी पसरत आहे.

श्रीगोंदा तालुक्यातील तसेच तालुक्यात नोकऱ्या मिळविण्यासाठी बोगस दिव्यांग प्रमाणपत्र वापर केल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला असून प्रकरणामागे एका प्रभावशाली राजकीय नेत्याच्या निकटवर्तीयाचा 'आशीर्वाद' असल्याची कुजबुज सध्या तालुक्यात वाऱ्यासारखी पसरत आहे.तो नेत्याचा चमचा काही हजारो आणि लाखो रुपयामध्ये दिव्यांग प्रमाणपत्राची खैरात वाटत असल्याची जोरदार चर्चा आहे त्याचबरोबर आपण सामाजिक कार्यकर्ता तसेच महापुषांच्या प्रतिमा देत सामाजिक प्रचार करून गंडा घालण्याचा प्रकार करत असल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे.

दिव्यांग हक्कांसाठी झगडणाऱ्या खऱ्या लाभार्थ्यांच्या वाट्याला अन्याय आणि बनावट कागदपत्रांच्या जोरावर 'सिस्टम'ला गंडा घालणाऱ्यांच्या हातात संधी हा प्रकार असेल तर तो केवळ गैरव्यवहार नाही, तर सामाजिक गुन्हाच आहे. असेही खुलेआम बोलले जात आहे त्याने दिलेल्या बनावट प्रमाणपत्रावर अनेक जन नोकरीला लागले आहेत मात्र ते प्रशासनाच्या चौकशीत अडकले आहे त्यामध्ये दिव्यांग प्रमाणपत्रांच्या वैद्यकीय पडताळणी प्रक्रियेवर प्रश्न,अचानक वाढलेली प्रमाणपत्रांची संख्या,संबंधित उमेदवारांचे राजकीय संपर्क,मूळ दिव्यांग उमेदवारांना डावलल्याची तक्रारी निर्माण झाल्या आहेत त्यामुळे स्थानिक पातळीवर काही संघटनांनी याची लेखी तक्रार देण्याची तयारी सुरू केली आहे.

आरक्षण हे हक्कासाठी आहे, शॉर्टकटसाठी नाही, असा संतप्त सूर ऐकू येतो.दिव्यांग कोटा हा सहानुभूतीचा विषय नाही, तो संवैधानिक अधिकार आहे. त्यात जर राजकीय 'बॅकडोअर एन्ट्री' सुरू असेल, तर हा प्रकार थांबवणं अत्यावश्यक आहे.

### प्रशासन मौन का?

आरोग्य विभाग, जिल्हा शल्यचिकित्सक कार्यालय आणि निवड प्रक्रिया पाहणाऱ्या यंत्रणांनी या आरोपांवर अद्याप अधिकृत भूमिका स्पष्ट केलेली नाही. मात्र जर आरोपात तथ्य असेल, तर संबंधितांवर कठोर कारवाई अपेक्षित आहे.

# राहुरीच्या खंडेराया यात्रा कमिटीच्या अध्यक्षपदी विलास वराळे

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**राहुरी** : राहुरीचे ग्रामदैवत मार्तंड देवस्थान ट्रस्ट (श्री खंडेराया देवस्थान यात्रा) कमिटीच्या अध्यक्षपदी विलास वराळे यांची, तर उपाध्यक्षपदी तुषार पवार व गौरव तोडमल यांची एकमताने निवड करण्यात आली. यात्रा कमिटीची बैठक रविवार (दि.१५) रोजी शनिमंदिर येथे ट्रस्टचे अध्यक्ष रावसाहेब तनपुरे यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित करण्यात आली होती. या बैठकीच्या अध्यक्षस्थानी पत्रकार सुनील भुजाडी होते. श्री खंडेराया यात्रौत्सव रविवार ५ एप्रिल ते गुरुवार ९ एप्रिल या कालावधीत होत आहे. कमिटीच्या खजिनदार अमोल तनपुरे, उपखजिनदार दीपक साळवे, सचिव आकाश येवले, उपसचिव अमोल उंडे, यांची निवड करण्यात आली, तर हंगामा कमिटीच्या अध्यक्षपदी नयन शिंगी उपाध्यक्ष नितीन तनपुरे, उपाध्यक्ष राजेंद्र वाडेकर, सदस्य पदी रावसाहेब डावखर, राजेंद्र शेळके, यांची







तर बैलगाडा शर्यत अध्यक्ष सुनील पवार, उपाध्यक्ष नानासाहेब शिंदे, सदस्य अजय काळे, हरिभाऊ उंडे, वेदांत तनपुरे यांची एकमताने निवड करण्यात आली. यावेळी बैठकीस दिनकर पवार, नयन शिंगी,सुभाष वराळे,दत्तात्रय येवले, सदाशिव शेळके, चंद्रकांत उंडे, शिवाजी वराळे,विठ्ठल तमनर, अशोक उंडे, अशोक शेटे, हरिभाऊ उंडे, राजेंद्र वराळे, अक्षय वराळे, दादासाहेब तोडमल, दादू साळवे, विशाल बागडे, सोन्याबापू जगधने, रावसाहेब हरिश्चन्द्रे, महेश कासार आदिसह सभासद व गावकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## द • ख • ल

# आळंदी देवस्थानवर नगराध्यक्षाची निवड करावी



**आळंदी :** तीर्थक्षेत्र विकास कामांना गती देण्यासाठी संत ज्ञानेश्वर महाराज संस्थान कमिटी वर नगराध्यक्षांची पदसिद्ध सदस्य म्हणून नियुक्ती करण्याचा महत्त्वपूर्ण ठराव नगरपरिषद सभागृहाने एकमताने मंजूर केला. या निर्णयामुळे संस्थान व नगरपरिषद यांच्यातील समन्वय अधिक दृढ होणार असल्याचे मानले जात आहे.

आळंदी येथील संत ज्ञानेश्वर महाराज समाधी मंदिर हे राज्यातील प्रमुख तीर्थक्षेत्रांपैकी एक असून दरवर्षी लाखो भाविक येथे दर्शनासाठी येतात. तीर्थक्षेत्र विकास योजनेअंतर्गत शहरात भक्तनिवास, इंद्रायणी नदी घाट विकास, पायाभूत सुविधा उभारणी यांसारखी कामे सुरू आहेत. शासनाकडून प्राप्त होणारा निधी भाविक व नागरिकांच्या सोयीसाठी वापरण्यात येत आहे.

लोकनियुक्त प्रतिनिधी म्हणून नगराध्यक्षांचे संस्थान कमिटीवर प्रतिनिधित्व असणे आवश्यक असल्याची भूमिका सभागृहात मांडण्यात आली. या नियुक्तीमुळे विकासकामांना गती मिळून तीर्थक्षेत्राचा सर्वांगीण विकास साधता येईल, असा विश्वास व्यक्त करण्यात आला. सभागृहाने सदर ठरावास सर्वानुमते मंजुरी दिली.

# खैरेनगरमध्ये चोरट्यांकडून पती-पत्नीस बेदम मारहाण

**कवठे येमाई :** शिरूर तालुक्यातील खैरेनगर येथे रात्रीच्या सुमारास सशस्त्र चोरट्यांनी पती-पत्नीस बेदम मारहाण करत सोन्याचे दागिने व रोख रक्कम चोरुन नेल्याची घटना घडली आहे. या प्रकरणी शिक्रापूर पोलीस ठाण्यात ज्ञात चोरट्यांवर गुन्हा दाखल करण्यात आला असून परिसरात एकच खळबळ उडाली आहे.

खैरेनगर येथील बाळू खैरे हे रात्रीच्या वेळी कुटुंबियांसह घरात झोपलेले होते. रात्री साडेबारा वाजण्याच्या सुमारास चार अज्ञात सशस्त्र चोरट्यांनी घराचा दरवाजा तोडून घरात आले. त्यावेळी त्यांच्या हातात कोयते व काठ्या होत्या.त्यांनी बाळू व त्यांची पत्नी जमुनाबाई हिला हाताने मारहाण करत दमदाटी केली.जमुनाबाई यांना कोयत्याचा धाक दाखवून दमदाटी करत अंगावरील सर्व दागिने काढून घेतले. एकाने घरातील कपाट उघडून कपाटातील दहा हजार रुपये काढून घेऊन गेले.मात्र जाताना बाहेर आले आणि आरडाओरडा केला तर बघा अशी धमकी देऊन दरवाजाची कडी लावून चौघेजण पळून गेले.काही वेळाने बाळू खैरे यांनी घराबाहेर येऊन शेजारील नागरिकांना घडलेला प्रकार सांगितला असता नागरिकांनी पोलिसांना माहिती दिली.दरम्यान सदर चोरट्यांनी गावातील सुनील खैरे यांच्या घरी देखील चोरी केल्याचे समोर आले.तर सदर घटनेत चोरट्यांनी तब्बल चार ते पाच तोळे सोन्याचे तसेच काही चांदीचे दागिने व वीस हजार रुपये रोख रक्कम चोरी केली असून घडलेल्या प्रकाराबाबत बाळू धोंडीबा खैरे यांनी शिक्रापूर पोलीस स्टेशन येथे फिर्याद दिल्याने पोलिसांनी चार अज्ञात चोरट्यांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# ध्यासच्या संकुलात मातृ-पितृ पूजनातून संस्कारांची जपणूक

**आळंदी :** ध्यास फौंडेशन संचलित महर्षी वाल्मिकी बालक मंदिर, महर्षी वाल्मिकी विद्यावर्धिनी तसेच डॉ. माधवराव सानप विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय येथे शनिवारी 'मातृ-पितृ उत्सव' आणि शहीदांना आदरांजली कार्यक्रम भावनिक व उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला. कार्यक्रमाच्या प्रारंभी पुलवामा हल्यातील शहीद जवानांना श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. त्यानंतर संतश्रेष्ठ माऊलींच्या प्रतिमेचे पूजन करून कार्यक्रमास सुरुवात झाली. या वेळी संस्थेच्या संचालिका अक्षता कुलकर्णी प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होत्या. शिक्षक-पालक संघाचे प्रतिनिधी, पालकवर्ग आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. स्वागत समारंभानंतर संचालिका कुलकर्णी यांनी प्रस्तावनेत भारतीय संस्कृतीतील मातृ-पितृ पूजनाची परंपरा अधोरेखित करत राष्ट्ररक्षणासाठी बलिदान देणाऱ्या जवानांविषयी कृतज्ञता व्यक्त केली. पुढील वर्षी 'माता-पिता मेळावा' आयोजित करण्याचा संकल्पही त्यांनी व्यक्त केला.

# सौर ऊर्जा ही महाराष्ट्राच्या आर्थिक प्रगतीची मास्टर की : मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

**पुणे :** सौर ऊर्जा ही केवळ पर्यावरणपूरक पर्याय नसून महाराष्ट्राच्या आर्थिक प्रगतीची, ऊर्जा सुरक्षिततेची आणि आत्मनिर्भर भारताच्या संकल्पपूर्तीसाठी 'मास्टर की' ठरत असल्याचा ठाम संदेश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिला. पुण्यात आयोजित सातव्या 'मास्मा रिन्युएबल एनर्जी एक्स्पो २०२६'चे ऑनलाईन उद्घाटन त्यांच्या हस्ते झाले. त्यांचा संदेश ऑडिओ-व्हिडिओ स्वरूपात प्रदर्शनस्थळी प्रसारित करण्यात आला.

मुख्यमंत्र्यांनी आपल्या संदेशात महाराष्ट्र सोलर मॅन्युफॅक्चरर्स असोसिएशनच्या गेल्या २५ वर्षांतील सातत्यपूर्ण कार्याचे कौतुक केले. सौर पॅनल उत्पादक, इन्व्हर्टर निर्माते, स्टार्टअप्स, संशोधन संस्था आणि ईपीसी कंपन्यांना एकत्र आणून उद्योगविश्वासाठी सक्षम व्यासपीठ उभारल्याबद्दल त्यांनी मास्माचे अभिनंदन केले. 'मेक इन इंडिया, मेक फॉर इंडिया' या दृष्टिकोनाला या संघटनेमुळे बळ मिळाल्याचे त्यांनी नमूद केले.राज्यात एशियातील सर्वात मोठा विकेंद्रित सौर ऊर्जा कार्यक्रम राबवला जात असून यावर्षाअखेर १६ गिगाव्हेट सौर ऊर्जा उपलब्ध करण्याचे उद्दिष्ट असल्याची माहिती त्यांनी दिली. स्वच्छ आणि शाश्वत ऊर्जा व्यवस्थेकडे महाराष्ट्राने टाकलेले पाऊल जागतिक पर्यावरणीय उद्दिष्टांनाही पूरक ठरणारे असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.शेतकऱ्यांना दिवसा अखंड वीज, उद्योगांना परवडणाऱ्या दरात वीज आणि एमएसएमई क्षेत्राला ऊर्जा खर्चात बचत यासाठी सौर ऊर्जेचा विस्तार हा विकासाचा मुलाधार ठरत असल्याचे त्यांनी अधोरेखित केले.

# महाशिवरात्री निमित्त जेजुरीच्या खंडोबा गडावर ''त्रिलोक दर्शन''

## जेजुरी गडावर महाशिवरात्रीनिमित्त भाविकांची अलोट गर्दी

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**जेजुरी :** अवघ्या महाराष्ट्राचे कुलदैवत मानल्या जाणाऱ्या श्री क्षेत्र जेजुरी येथील खंडोबा गडावर महाशिवरात्री निमित्त भाविकांची अलोट गर्दी उसळली होती. पहाटेपासूनच हजारो भाविकांनी गडावर हजेरी लावत भगवान खंडोबांचे दर्शन घेतले.

महाशिवरात्रीच्या औचित्याने मंदिराच्या शिखर भागातील स्वर्गलोक शिवलिंग, मुख्य गाभाऱ्यातील स्वयंभू भूलोक शिवलिंग तसेच मंदिराच्या तळघरातील पाताळलोकी शिवलिंगाचे दर्शन घेण्यासाठी भाविकांनी मोठ्या प्रमाणावर गर्दी केली. विशेष म्हणजे शिखर भागातील

### वर्षातून एकदाच होणाऱ्या त्रिशिवलिंग दर्शनासाठी लांबच लांब रांगा

आणि तळघरातील शिवलिंग वर्षातून केवळ एकदाच, महाशिवरात्री दिवशीच दर्शनासाठी खुले केले जाते. त्यामुळे या दुर्मिळ दर्शनाचा लाभ घेण्यासाठी भाविकांनी लांबच लांब रांगा लावल्या होत्या.

भाविकांची वाढती संख्या आणि उन्हाचा तडाखा लक्षात घेता श्री मार्तंड देवस्थान जेजुरी यांच्या वतीने मंडप उभारून सुलभ दर्शनाची व्यवस्था करण्यात आली होती. तसेच फराळ आणि पिण्याच्या पाण्याचीही सोय करण्यात आली असल्याची माहिती देवसंस्थेचे प्रमुख विश्वस्त मंगेश घोणे यांनी दिली.

दरम्यान, गर्दीच्या पार्श्वभूमीवर कायदा व सुव्यवस्था अबाधित राहावी यासाठी जेजुरी पोलीस स्टेशन यांच्या वतीने सहाय्यक पोलीस निरीक्षक दिपक वाकचौरे यांच्या मार्गदर्शनाखाली चोख पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला होता.

महाशिवरात्रीच्या निमित्ताने जेजुरी गडावर भक्तीमय वातावरण अनुभवायला मिळाले. यळकोट यळकोट जय मल्हारच्या जयघोषात संपूर्ण परिसर दुमदुमून गेला होता.



# माहूर विद्यालयात खाऊ गल्ली व बाल आनंद बाजाराचा उत्साह

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**नाझरे सुपे :** श्री शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळ, सासवड संचलित माहूर माध्यमिक विद्यालय, माहूर (ता. पुरंदर, जि. पुणे) येथे जिजामाता सप्ताहानिमित्त विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले. विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाच्या दृष्टीने 'खाऊ गल्ली' व 'बाल आनंद बाजार' या उपक्रमांना उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

खाऊ गल्लीमध्ये विद्यार्थ्यांनी स्वतः विविध खाद्यपदार्थ तयार करून विक्रीसाठी आणले होते. यामध्ये ओली भेळ, आप्पे, पाणीपुरी, व्हेज बिर्याणी, नॉनव्हेज बिर्याणी, वडापाव, सामोसे, भाजलेले शेंगदाणे, मेथी पराठे, चटणी, चाट, व्हेज मंचुरियन आदी पदार्थांचा समावेश होता. विद्यार्थ्यांनी ग्राहकांशी संवाद साधत विक्री कौशल्याचे उत्कृष्ट प्रदर्शन केले.

तसेच 'बाल आनंद बाजार' उपक्रमात शेवगा, कोबी, फ्लॉवर, कांदे, कढीपत्ता, कोथिंबीर, पुदिना, नारळ, वाल, घेवडा यांसारख्या भाजीपाल्याची विक्री करण्यात आली. भाजी घ्या, ताजी भाजी घ्या! अशा घोषणा देत विद्यार्थ्यांनी विद्यालयाचा परिसर अक्षरशः मंडईसारखा गजबजून टाकला. या उपक्रमातून विद्यार्थ्यांना व्यावहारिक ज्ञानाबरोबरच पैशांचे नियोजन, व्यवहारकौशल्य




व दैनंदिन जीवनातील आर्थिक शिस्त यांचे महत्त्व समजले.

शैक्षणिक गुणवत्ता विकास कार्यक्रमांतर्गत शनिवार, दि. १७ जानेवारी २०२६ रोजी आयोजित या आठवडे बाजार व खाऊ गल्ली उपक्रमातून सुमारे १२,७४० रुपयांची उलाढाल झाली.

जिजामाता सप्ताहाची सांगता भजन कार्यक्रमाने करण्यात आली. श्रीराम भजनी मंडळाचे सदस्य मोहन आबा जगताप, संजय धोंडीराम जगताप, जयहिंद जगताप व बाळासो गोळे यांनी विद्यार्थ्यांसह भजनाचा आनंद घेतला.

या सर्व उपक्रमांचे यशस्वी आयोजन मुख्याध्यापक हनुमंत पवार यांच्या मार्गदर्शनाखाली रामचंद्र जगताप, महेंद्र भोसले, रामप्रभू पेटकर, इंद्रभान पठारे, विकास राऊत, स्नेहलता टिळेकर, लता गायकवाड, मंगल जगताप, रामभाऊ कुंभार, श्रीकांत गव्हाणे आदी शिक्षकवृंदांनी केले.

# डिंभेच्या उजव्या कालव्याला पाणी सोडण्याची मागणी

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**



**लोणी धामणी :** कुकडी प्रकल्पांतर्गत येणाऱ्या डिंभे धरण (हुतात्मा बाबू गेणू जलाशय) येथून उजव्या कालव्याला तात्काळ पाणी सोडावे, अशी मागणी जारकरवाडीचे उपसरपंच सचिन टाव्हरे व माजी उपसरपंच शरद भोजने यांनी जलसंपदा विभागाकडे केली आहे.

सध्या वातावरणातील उष्णतेचा कडाका वाढू लागला असून आंबेगाव तालुक्याच्या पूर्व भागात तसेच शिरूर तालुक्याच्या पश्चिम भागातील शेती पिके पाण्याअभावी सुकू लागली आहेत. यावर्षी पावसाचे प्रमाण कमी झाल्याने या परिसरातील जमिनीतील पाणीपातळी लक्षणीयरीत्या घटली आहे. परिणामी विहिरी, कुपनलिका, तलाव तसेच ओढे-नाल्यांतील पाणीसाठा झपाट्याने कमी होत असून शेतकऱ्यांना तीव्र पाणीटंचाईचा सामना करावा लागत आहे.

आंबेगावच्या पूर्व भागासह शिरूर तालुक्याच्या पश्चिम भागाला डिंभे धरणाच्या उजव्या कालव्यातून पाणीपुरवठा केला जातो. या कालव्यामुळे येथील शेती बागायती झाली आहे. मात्र, सध्या शेतामध्ये उभी असलेली पिके पाण्याअभावी धोक्यात आली असून त्यांना तातडीने पाण्याची गरज आहे. शेती पिके सुकू लागल्याने उजव्या कालव्याचे आवर्तन लवकरात लवकर सोडावे, अन्यथा मोठे नुकसान होण्याची शक्यता आहे, अशी मागणी उपसरपंच सचिन टाव्हरे व माजी उपसरपंच शरद भोजने यांनी केली आहे. जलसंपदा विभागाने परिस्थितीची तात्काळ दखल घेऊन शेतकऱ्यांना दिलासा द्यावा, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.

# महाशिवरात्रि निमित्त ५० किलो खिचडीचे वाटप

## धार्मिक संदीप,दिपक रुणवाल व बंधूंचा १४ व्या वर्षी ही अव्याहत उपक्रम सुरु

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**कवठे येमाई :** – शिरूर तालुक्यातील कवठे येमाई गावठाणातील ऐतिहासिक जागृत देवस्थान असलेल्या श्री महादेव मंदिरात महाशिवरात्रि उत्सव विविध धार्मिक उपक्रमांनी साजरा करण्यात येत असून सकाळपासूनच भाविकांची दर्शनासाठी मोठी गर्दी झालेली पाहावयास मिळाली. दरम्यान काही वर्ष या गावात राहून व्यवसाय करणारे व सध्या शिरूर येथे वास्तव्यास असणारे संदीप रुणवाल व कुटुंबीयांनी मागील १४ वर्षांपासून त्यांनी गावठाणातील महादेव दर्शनासाठी आलेल्या सर्व भाविक भक्तांना सुरु केलेली खिचडी प्रसाद वाटप परंपरा आज १४ व्या वर्षी ही जपली आहे. याच बरोबर भाविक भक्तांना भक्तांना त्यांच्याकडून केळी वाटप ही करण्यात येत असून त्यांनी सुरु ठेवलेल्या या आगळ्या वेगळ्या उपक्रमाचे जेष्ठ सामाजिक कार्यकर्ते मिठूलाल बाफणा,नवनिर्वाचित





पंचायत समिती सदस्या कांचनताई राजेश सांडभोर,लक्ष्मण नाना मुखेकर,रामदास माळवदे,तंटामुक्त समितीचे अध्यक्ष पांडुरंग सांडभोर,ग्रामपंचायत सदस्य प्रवीणकुमार बाफणा व ग्रामस्थांनी कौतुक केले आहे. तर जोपर्यंत प्रभू महादेव यांच्या कृपा आशीर्वादाने खिचडी वाटप उपक्रमक सुरु ठेवता येईल तो पर्यंत विनाखंड हा सेवाभावी उपक्रम सुरूच ठेवणार असल्याचे दिपक रुणवाल यांनी सांगितले. श्रावणातील सोमवारी व नित्य ही भाविक श्रद्धेने दर्शनासाठी या महादेवाचे दर्शन घेण्यासाठी येथे असतात. महाशिवरात्र उत्सवानिमित्ताने ग्रामस्थांनी विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन केले असून सकाळी पूजा पाठ, अभिषेक, दिवसभर खिचडी वाटपाचा कार्यक्रम, संध्याकाळी दीपमाळ प्रज्वलन,भजन आयोजित करण्यात आल्याची माहिती पुजारी सुरेश शिंदे (गुरव) यांनी दिली.भाविकांनी महादेवाच्या दर्शनाचा,खिचडीचा प्रसादाचा लाभ घ्यावा असे आवाहन ही त्यांनी केले आहे.

# विद्यार्थ्यांनी संगणक शिक्षण घेऊन संधीचे सोने करावे – संतोष करवाडे

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**माळशिरस :–** सध्याच्या शैक्षणिक प्रणालीमध्ये संगणक शिक्षण ही अत्यावश्यक बाब बनली असून ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांनी आधुनिक तंत्रज्ञान आत्मसात करून उपलब्ध संधींचे सोने करावे, असे आवाहन दर्शना इंडस्ट्रीजचे मुख्य वित्त अधिकारी संतोष करवाडे यांनी केले.

सासवड येथील श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्था यांच्या कमलाबाई माणिकशेठ मुथा प्रशालेत नव्याने सुरू करण्यात आलेल्या संगणक कक्षाच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. या कार्यक्रमाला स्व. एकनाथ जगताप प्रतिष्ठानचे अध्यक्ष संतोष जगताप, सचिव हेमंत ताकवले, दर्शना इंडस्ट्रीजचे प्रवीण बांदल, सुयश इन्फोटेकचे गणेश, राजेश कडव



तसेच संगणक प्रशिक्षक साक्षी मेमाणे आदी मान्यवर उपस्थित होते.

दर्शना इंडस्ट्रीजच्या सीएसआर निधीतून व स्व. एकनाथ जगताप प्रतिष्ठानच्या सहकार्याने सुमारे ३० संगणकांनी सुसज्ज असा अद्ययावत संगणक कक्ष उभारण्यात आला असून मान्यवरांच्या हस्ते त्याचे उद्घाटन करण्यात आले.

प्रशालेच्या मुख्याध्यापिका संगीता काळभोर यांनी प्रमुख पाहुण्यांचे स्वागत करत शाळेच्या शैक्षणिक व सर्वांगीण प्रगतीचा आढावा घेतला. याच कार्यक्रमाच्या अनुषंगाने इयत्ता दहावीच्या विद्यार्थ्यांना परीक्षेसाठी उपयुक्त साहित्याचे वितरण करण्यात आले.

यावेळी संतोष जगताप, प्रवीण बांदल आणि हेमंत ताकवले यांनी मनोगते व्यक्त केली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन उपशिक्षक बाळगोंडा पाटील यांनी केले, तर संतोष सोनवणे यांनी आभार प्रदर्शन केले.

# भुलेश्वरी दोन लाख भाविकांनी घेतले शिवलिंगाचे दर्शन

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**माळशिरस (ता. पुरंदर तालुका) :** पुरंदरच्या पूर्व भागातील जागृत देवस्थान श्री क्षेत्र भुलेश्वर मंदिर येथे महाशिवरात्री निमित्त दिवसभरात पुरंदरसह राज्याच्या विविध भागांतून आलेल्या दोन लाखांहून अधिक भाविकांनी शिवलिंगाचे दर्शन घेतले. मंदिर परिसर 'हर हर महादेव'च्या जयघोषाने दुमदुमून गेला.

पहाटे तीन वाजता शिवलिंगाला दही, दूध व पंचामृताने अभिषेक करून विधीवत पूजा करण्यात आली. त्यानंतर फुलांची आकर्षक सजावट करून शिवलिंगावर पोशाख चढविण्यात आला. सकाळी पाच वाजता पंचायत समिती सदस्य माऊली यादव व माळशिरसच्या सरपंच आरती यादव यांच्या हस्ते महाआरती करण्यात आली.



श्री क्षेत्र भुलेश्वर येथे महाशिवरात्री निमीत्त केलेली आकर्षक पुजा

सकाळच्या सत्रात पुणे जिल्हा बँकेचे अध्यक्ष दिगंबर दुर्गाडे, जिल्हा परिषद सदस्य अजय इंगळे, प्राजक्ता दुर्गाडे, निरा मार्केट कमेटीच्या संचालिका शाहाजान रफीकभाई शेख यांनी दर्शन घेतले. दुपारी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षचे पार्थ पवार, जालिंदर कामठे, बारामतीचे नगराध्यक्ष सचिन सातव तसेच जिल्हा परिषद सदस्य करण खलाटे यांनीही शिवलिंगाचे दर्शन घेतले.

पहाटेपासूनच मंदिराभोवती दर्शनासाठी भाविकांची लांबलचक रांग लागली होती. आज भीमाशंकर मंदिर बंद असल्याने भुलेश्वर येथे भाविकांची गर्दी अधिक वाढली. मंदिरासमोर माळशिरस ग्रामपंचायतीच्या वतीने पहाटे भक्तिगीतांचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला.

दुपारी उन्हाचा त्रास होऊ नये म्हणून ग्रामस्थांच्या वतीने मंदिर परिसरात सावलीसाठी मंडप उभारण्यात आले होते. दिवसभर थंडगार फिल्टर पाण्याची व्यवस्था करण्यात आली. भुलेश्वर देवस्थानतर्फे दर्शनबारीचे योग्य नियोजन करण्यात आले होते. वन उद्यानाबाहेर वाहनांची व्यवस्था केल्यामुळे वाहतूक कोंडी झाली नाही. जेजुरी पोलीस स्टेशन यांच्या वतीने चोख पोलीस बंदोबस्त ठेवण्यात आला होता. दिवसभर भाविकांसाठी महाप्रसादाची व्यवस्था करण्यात आली. माळशिरस प्राथमिक आरोग्य विभागाने आरोग्य सेवा उपलब्ध करून दिली. तसेच वीज वितरण कंपनीने दिवसभर अखंडित वीजपुरवठा सुरळीत ठेवला.

# श्री क्षेत्र भीमाशंकर येथे जिल्हाधिकारी हस्ते शासकीय पुजा

## भीमाशंकर महोत्सव आयोजन करण्याचा जिल्हाधिकाऱ्यांचा मानस

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**पुणे :** जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी यांनी आज खेड तालुक्यातील श्री क्षेत्र भीमाशंकर मंदिरात विधिवत शासकीय पूजा करुन ज्योतिर्लिंगाचे दर्शन घेतले. येत्या काळात परिसरातील नागरिकांचे आर्थिक सक्षमीकरण करण्याच्यादृष्टीने येत्या काळात 'भीमाशंकर महोत्सव' आयोजन करण्याचा मानस त्यांनी व्यक्त केला.

यावेळी उप विभागीय अधिकारी अनिल दौंडे, मंदिर समितीचे पदाधिकारी, स्थानिक प्रशासनातील अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. श्री. डुडी म्हणाले, देशातील १२ ज्योतिर्लिंगापैकी एक असलेल्या भीमाशंकर मंदिराच्या दर्शनासाठी मोठ्याप्रमाणात भाविक



येत असतात. आगामी काळात नाशिक येथे कुंभमेळा होणार असून त्याचा विचार करता मंदिराच्या विकासासोबतच परिसरातील रस्ते,पाणी पुरवठा, सांडपाणी शुद्धीकरण प्रकल्प 'एसटीपी' ची कामे करण्यात येत असून ती लवकरच पूर्ण होतील, अशा विश्वास श्री. डुडी यांनी व्यक्त केला.

ते पुढे म्हणाले मंदिर परिसरातील विकासकामाकरिता ९ जानेवारी ते ९ एप्रिल २०२६ या कालावधीत भविकांची सुरक्षितता विचारात घेता मंदिर बंद ठेवण्यात आले आहे, कामाची पाहणी केली असता दर्जेदार पद्धतीने विकासकामे होत असून ९ एप्रिलपर्यंत मुख्य मंदिराचे काम पूर्ण होईल व त्यानंतर मंदिर भाविकांना दर्शनासाठी खुले करण्यात येणार आहे, जरी मंदिर बंद असले तरी श्री भीमाशंकराची दैनंदिन नियमित पूजा होत आहे, त्यामुळे भाविकांनी सहकार्य करावे,असे आवाहन श्री. डुडी यांनी केले.

# श्री रामलिंग महाराज मंदिर येथे पालखी सोहळा उत्साहात

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**शिरूर :** शिरूर नगरीचे आराध्यदैवत श्री रामलिंग महाराज यांच्या पालखी सोहळ्याचा उत्सव हजारो भाविकांच्या उपस्थितीत मोठ्या उत्साहात आणि भक्तिमय वातावरणात पार पडला. सर्वत्र भगव्या पताका व झेंडे, तसेच शहरात ठिकठिकाणी उभारण्यात आलेल्या आकर्षक स्वागत कमानींमुळे संपूर्ण शहर भक्तिरसात न्हाऊन निघाले होते.

ढोल-ताशांच्या गजरात तसेच राज्यातील प्रसिद्ध ब्रास बॅण्डच्या मराठी, हिंदी भक्तिगीते, भावगीते आणि देशभक्तीपर गीतांच्या सुरेल धूनांनी वातावरण भारावून गेले. ॐ नमः शिवाय, हर हर महादेव आणि रामलिंग महाराज की जय अशा जयघोषांनी परिसर दुमदुमून गेला. सर्वधर्मीय नागरिकांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवत एकात्मतेचा संदेश दिला.

शिरूर येथील रामलिंग महाराजांची यात्रा दरवर्षी महाशिवरात्रीला भरते. यात्रेचे तीन दिवस विविध धार्मिक आणि पारंपरिक कार्यक्रमांनी गाजतात. मुख्य यात्रा महाशिवरात्रीच्या दिवशी रामलिंग मंदिर येथे पार पडते. आदल्या दिवशी पालखी सोहळा आयोजित




केला जातो, तर महाशिवरात्रीच्या दुसऱ्या दिवशी पारंपरिक बैलगाडा शर्यतीने यात्रेचा समारोप होतो. काल दुपारी शिवसेवा मंदिर येथून पालखी सोहळ्याला सुरुवात झाली. यावेळी प्रसिद्ध उद्योजक व रामलिंग देवस्थान ट्रस्टचे अध्यक्ष प्रकाश धारिवाल, शिरूरच्या कन्या व पुण्याच्या महापौर मंजुषा नागपुरे, नगराध्यक्षा ऐश्वर्या पाचर्णे, पोलिस निरीक्षक संदेश केंजळे, भाजपचे नेते धर्मेंद्र खांडरे, रामलिंग देवस्थानचे ट्रस्टी पोपटराव दसगुडे, शिवसेवा मंडळाचे ट्रस्टी मनसुख गुगळे, बलदेवसिंग परदेशी यांच्यासह नगरसेवक, नगरसेविका आणि अनेक मान्यवर उपस्थित होते.

दखल

## झरेकाठीच्या शिव आश्रमात भक्तीचा जनसागर

**झरेकाठी** : संगमनेर तालुक्यातील आणि शिर्डी विधानसभा मतदारसंघातील झरेकाठी येथील प्रसिद्ध शिवआश्रमात महाशिवरात्रीचा उत्सव अत्यंत उत्साहात, चैतन्यमयी आणि भक्तीमय वातावरणात साजरा करण्यात आला. निसर्गाच्या कुशीत वसलेल्या या आश्रमात यंदा दर्शनासाठी भाविकांची मोठी मांदियाळी पाहायला मिळाली. महाराष्ट्र, कर्नाटक आणि पंजाब या राज्यांसह अहिल्यानगर जिल्ह्यातून सुमारे २५ ते ३० हजार भाविकांनी शिवदर्शनाचा लाभ घेतला. यावेळी 'हर हर महादेव'च्या जयघोषाने संपूर्ण मंदिर परिसर आणि झरेकाठी नगरी दुमदुमून गेली होती.

शिवआश्रमात महाशिवरात्री उत्सवाची परंपरा गेल्या २६ वर्षांपासून अविरत सुरू आहे. या परंपरेने यंदा रौप्य महोत्सवी टप्पा यशस्वीपणे ओलांडला असून, आश्रमाचे प्रमुख महंत ओम साई नागभूषण महाराज यांच्या मार्गदर्शनाखाली हा सोहळा मोठ्या दिमाखात पार पडला. नागभूषण महाराजांनी सर्व भाविकांना आशीर्वाद देत या मंगल समयी महाप्रसादाचा लाभ घेण्याचे आवाहन केले.

## ज्ञानज्योती मातृ मंदिरामध्ये मातृ पितृ गुरुपूजन सोहळा उत्साहात



**कोल्हार** : पाश्चात्य संस्कृतीचे अनुकरण करून व्हॅलेंटाईन डे साजरा करण्यापेक्षा भारतीय संस्कृतीची जपणूक व मुलांवर सुसंस्कार व्हावेत व आई वडिलांचे महत्व मुलांच्या मनावर बिंबवण्याच्या उद्देशाने कोल्हार येथील ज्ञानज्योती मातृ मंदिर विद्यालयात मातृ-पितृ व गुरुजनांचे पूजन करून अनोखा व्हॅलेंटाईन डे साजरा करण्यात आला. यावेळी विद्यालयातील बालकांनी आपल्या आई-वडिलांची व गुरुजनांची पाद्य पूजा करीत आशीर्वाद घेतले. ज्ञानज्योती मातृ मंदिराच्या संचालिका स्नेहल शिरसाट यांच्या संकल्पनेतून हा स्तुत्य उपक्रम विद्यालयात राबवण्यात आला. यावेळी बोलताना स्नेहल शिरसाठ म्हणाल्या की आई वडील हेच खरे आपले चालते बोलते दैवत आहे. यावेळी बालकांनी माता-पिता व गुरुजनांचा नेहमीच आदर करण्याची शपथ देण्यात आली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन दीपा दीदी यांनी केले. व्हॅलेंटाईन डे च्या दिवशी राबवलेल्या या स्तुत्य उपक्रमाबद्दल उपस्थित पालकांनी ज्ञानज्योती मातृ मंदिराच्या संचालिका स्नेहल शिरसाट यांचे कौतुक केले.

## प्राचार्य डॉ.जरे यांचा सेवापूर्ती सोहळा



**लिंपणगाव** : रयत शिक्षण संस्था संचलित महाराजा जिवाजीराव शिंदे महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. महादेव जरे यांच्या सेवापूर्ती निमित्त कृतज्ञता व गौरव समारंभ मोठ्या उत्साहात पार पडला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी माजी मंत्री बबनराव पाचपुते होते. प्राचार्य जरे यांनी महाविद्यालयाच्या सर्वांगीण विकासात मोलाची भर घातली असून, सेवेनंतरच्या आयुष्यात त्यांनी पर्यटन व लेखन करावे, अशा शुभेच्छा त्यांनी दिल्या.

आष्टीपाटोदाशिरूर विधानसभा मतदारसंघाचे आमदार सुरेश धस यांची विशेष उपस्थिती होती. डॉ. जरे यांचे व्यक्तिमत्त्व सामाजिक बांधिलकी जपणारे असून अत्यंत प्रतिकूल परिस्थितीतून त्यांची जडणघडण झाली आहे. ऊसतोड कामगाराचा मुलगा प्राचार्य पदापर्यंत पोहोचतो, हा अभिमानास्पद प्रवास असल्याचे त्यांनी नमूद केले.

# मल्टिस्टेट फसवणूक विरोधात गुंतवणूकदारांचा संताप

## शहरात फ्लेक्सबोर्ड लावून निषेध

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**पाथर्डी** : शहरातील फसवणूक झालेल्या गुंतवणूकदारांनी शहरात ठिकठिकाणी फ्लेक्सबोर्ड लावून आपला संताप व्यक्त केला आहे. बीड जिल्ह्यात साईराम मल्टिस्टेट आर्थिक घोटाळ्याने खळबळ उडवलेली असतानाच, 'भगवान बाबा' मल्टिस्टेटच्या कथित घोटाळ्याची रक्कम सुमारे १०० कोटी रुपयांच्या घरात असल्याचा प्राथमिक अंदाज व्यक्त केला जात आहे. या प्रकरणात फरार संचालक मयुर वैद्य आणि नितीन तुपे यांनी मिळून पाथर्डीकरांना साडेचार कोटी रुपयांचा गंडा घातल्याचा आरोप गुंतवणूकदारांकडून केला जात आहे.

अहिल्यानगर जिल्ह्यातील शेवगाव, श्रीरामपूर, पाथर्डी तसेच शेवगाव तालुक्यातील बालमटाकळी व बोधेगाव येथे 'भगवान बाबा' मल्टिस्टेटच्या शाखा कार्यरत होत्या. या शाखांमधून ठेवीदारांची कोट्यवधी रुपयांची फसवणूक झाल्याची चर्चा जिल्हाभर सुरू आहे. आर्थिक गुन्हे शाखा कडून या संशयास्पद व्यवहारांची सखोल चौकशी करून चझखऊ आणि इणऊ्ड कायद्यांतर्गत कारवाई करण्यात यावी, अशी मागणी गुंतवणूकदारांकडून होत आहे.

फरार आरोपींनी मल्टिस्टेट संस्थेच्या माध्यम ातून हेराफेरी करून नातेवाईकांना नियमबाह्य पद्धतीने कोट्यवधींचे कर्जवाटप केल्याचा संशय व्यक्त केला जात आहे. ठेवीदारांचे पैसे सुरक्षित करण्याऐवजी मल्टिस्टेट संस्थांनी एकमेकांच्या माध्यमातून फसवणुकीचा आर्थिक खेळ खेळला का, असा सवाल उपस्थित केला जात आहे. स्थानिक गुन्हे शाखा (एलसीबी) व आर्थिक गुन्हे शाखा (ईओडब्ल्यू) या तपास यंत्रणा या मोठ्या आर्थिक साखळीचा पर्दाफाश कधी करणार, याकडे संपूर्ण अहिल्यानगर जिल्ह्याचे लक्ष लागले आहे. फसवणूकग्रस्त गुंतवणूकदारांना न्याय मिळणार का, हा प्रश्न सध्या ऐरणीवर आहे.






# नशेचा बाजार आणि देहविक्रीचा सुळसुळाट

## प्रशासन झोपेत की संगनमतात?



**नागरिकांचे प्रशासनाला थेट प्रश्न**

स्थानिक पोलिसांना आधी माहिती नव्हती का?जर माहिती होती तर कारवाई उशिरा का?या रॅकेटमागे मोठे मासे कोण? असे अनेक प्रश्न विनाउत्तरीतच आहेत

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**श्रीगोंदा** : तालुक्यात नशेचा काळाबाजार आणि देहविक्रीचा धंदा अक्षरशः तेजीत असल्याची धक्कादायक स्थिती समोर येत आहे. गावोगावी अवैध दारू, एमडीसारखी घातक ड्रग्ज आणि लॉजमध्ये सुरू असलेले संशयास्पद व्यवहार हे सगळं उघड्यावर चालू आहे. हे कोणाच्या आशीर्वादाने? सुरू आहे असा प्रश्न उपस्थित केला जात आहे

श्रीगोंद्याच्या मातीने सहकार, शिक्षण आणि सामाजिक चळवळी पाहिल्या आहेत. आता हीच भूमी नशा आणि देहविक्रीच्या सावटाखाली का यावी? असा प्रश्न उपस्थित होत असताना श्रीगोंदा तालुक्यातील काष्टी परिसरातील एका लॉजवर नुकत्याच टाकलेल्या छाप्यात काही महिलांची सुटका करण्यात आली. अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंधक कक्षाने ही कारवाई केली असली तरी स्थानिक नागरिकांचा आरोप सरळ आहे तक्रारी आधीच दिल्या होत्या, पण हालचाल का झाली नाही? जबरदस्तीने देहविक्री करवणे आणि मानवी तस्करी हे गंभीर गुन्हे आहेत. पण कागदावरचे कायदे आणि प्रत्यक्ष अंमलबजावणी यामध्ये जमीन-अस्मानाचा फरक दिसतोय.दरम्यान, निमगाव-खलू टोल नाक्यावर गोवा राज्यातून येणाऱ्या लाखो रुपयांच्या अवैध मद्याचा साठा जप्त झाला. तसेच जामखेड परिसरात एमडी ड्रग्ज जप्तीची कारवाई झाली. ही प्रकरणं वेगवेगळी नाहीत; हा एक संगठित साखळी व्यवसाय असल्याची चर्चा जोरात आहे.यासाठी नागरिकांनी पुढाकार घेतला नाही तर उद्या आपल्या घराच्या दारातच हा बाजार उघडलेला दिसेल. प्रशासनाने तात्काळ व्यापक मोहीम राबवून या साखळीचा मुळापासून बंदोबस्त करणे गरजेचे आहे.नाहीतर यामुळे भविष्यात सामाजिक परिणाम गंभीर होऊ शकतात त्यामुळे तरुणाई नशेच्या विळख्यात,कुटुंब व्यवस्थेवर घाला,गुन्हेगारीत वाढ,महिलांचे शोषण आणि मानवी तस्करीचा धोका निर्माण होण्याची शक्यता नाकारता येत नाही

## भाऊसाहेब रजपूत हत्या प्रकरण

# अन्यायाविरोधात निर्णायक बैठक

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**श्रीगोंदा** : तालुक्यातील कोकणगाव येथे दिनांक १६ जानेवारी २०२६ रोजी झालेल्या भाऊसाहेब रजपूत यांच्या निर्घृण हत्येने संपूर्ण परिसर हादरला आहे. ट्रॉसिटी अंतर्गत गुन्हा दाखल होऊनही महिना उलटून मुख्य आरोपी मोकाट असल्याचा आरोप होत आहे. त्यामुळे पोलीस यंत्रणेच्या भूमिकेबद्दल संशय, संताप आणि अस्वस्थता व्यक्त केली जात आहे.

श्रीगोंदा तालुक्यातील कोकणगाव येथील भाऊसाहेब रजपूत यांचा निर्घुण हत्या करण्यात आलेल्या घटनेला तब्बल एक महिना होऊनही यातील मुख्य आरोपीला अटक करण्यात आलेली नाही आरोपी मोकाट फिरत असून रजपूत कुटुंबीय दहशतीखाली आहेत त्याच्या घरावर दगडफ`क केली जात असून यामध्ये परिसरातील राजकीय शक्ती त्यास सामील असल्याची शक्यात कुटुंबातील सदृश्याकडून व्यक्त केली जात आहे तसेच यामध्ये काही पोलीसही आरोपीला सहकार्य करत असल्याचा आरोप करण्यात येत आहे तसेच ट्रॉसिटी अंतर्गत गुन्हा दाखल होऊनही महिना उलटून मुख्य आरोपी मोकाट असल्याचा आरोप होत आहे. त्यामुळे पोलीस यंत्रणेच्या भूमिकेबद्दल संशय, संताप आणि अस्वस्थता व्यक्त केली जात आहे.

याचा पार्शभूमीवर होणाऱ्या अन्यायाच्या विरोधात या प्रकरणात पुढील आंदोलनाची दिशा ठरवण्यासाठी आणि न्यायासाठी एकत्रित लढा उभारण्यासाठी महत्त्वाची बैठक सोमवार, १६ फेब्रुवारी २०२६ रोजी सकाळी ११ वाजता डॉ. बाबासाहेब आंबेडकर सांस्कृतिक भवन, सिद्धार्थ नगर, श्रीगोंदा या ठिकाणी आयोजित करण्यात आली आहे.यासाठी अहिल्यानगर जिल्ह्यातील सर्व आंबेडकरी व पुरोगामी कार्यकर्त्यांना उपस्थित राहणार असल्याची माहिती मिळत आहे.

या बैठकीत मागण्या या मागण्या करण्यात येणार आहेत त्यामध्ये मुख्य आरोपींना तात्काळ अटक करावी. संशयितांना सोडून देणाऱ्या संबंधित पोलिसांव र कारवाई करावी.गुन्हेगारांवर कडक कलमे लावून कठोर कारवाई करावी.

समाज कल्याण विभागाकडून तात्काळ आर्थिक मदत द्यावी.पीडित कुटुंबाला पोलीस संरक्षण द्यावे.पीडितांना धमकी देणाऱ्या अधिकाऱ्यांची चौकशी करावी.ही मागणी केवळ भावनिक नाही; ती कायदेशीर आणि नैतिक दोन्ही स्तरांवर ठाम आहे.

या प्रकरणात पुढील आंदोलनाची दिशा ठरवण्यासाठी आणि न्यायासाठी एकत्रित लढा उभारण्यासाठी महत्त्वाची बैठक आयोजित करण्यात आली आहे. न्यायासाठीची लढाई ही केवळ एका कुटुंबाची नसते; ती समाजाच्या सन्म ानाची असते.उठा, संघटित व्हा आणि संघर्ष करा हा विचार आजही तितकाच जिवंत आहे.यातून समोर आले आहे.

## कुकाण्यातील आमरण उपोषणाचा ७ वा दिवस

# रेल्वे मार्गाचा प्रश्न संसदेत मांडू : खा. वाकचौरे



**भेंडा** : बेलापूर-परळी रेल्वे मार्गासाठी केंद्रीय रेल्वे मंत्री व रेल्वे बोर्डाकडे पाठपुरावा सुरूच आहे.९मार्च रोजी सुरू होणाऱ्या संसदीय अधिवेशनात हा प्रश्न प्रकर्षाने मांडू अशी ग्वाही शिर्डी लोकसभा मतदारसंघाचे खासदार भाऊसाहेब वाकचौरे यांनी दिली. नेवासा शेवगाव-गेवराई मार्गे बेलापूर(श्रीरामपूर) ते परळी रेल्वे मार्गासाठी बेलापूर-परळी रेल्वे कृती समितीच्या वतीने रितेश विजयकुमार भंडारी,रज्जाक निजामशा इनामदार व सुरेश वसंतराव नरवणे यांनी सोमवार पासून दि.९ पासून कुकाणा येथे ग्रामपंचायत स्टेजवर आमरण उपोषण सुरू केले आहे. उपोषणाच्या ७ व्या दिवशी खासदार भाऊसाहेब वाकचौरे यांनी उपोषणकर्त्यांची भेट घेतली,त्यावेळी ते बोलत होते. माजी आ.बाळासाहेब मुरकुटे, भाऊसाहेब फुलारी, बाळासाहेब कचरे,अरुण गरड, अण्णासाहेब गव्हाणे, प्रकाश देशमुख आदी यावेळी उपस्थित होते.

## दगडवाडीत दुसरा बिबट्या जेरबंद

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**करंजी** : करंजी ता. पाथर्डी येथे घाटाच्या पायथ्याशी दगडवाडी शिवारात दुसरा बिबट्या वन विभागाने लावलेल्या पिंजऱ्यात अडकला.

गर्भागिरी डोंगर परिसरामध्ये अनेक बिबट्यांचा वावर असून दोन बिबटे गेल्या काही दिवसापासून दगडवाडी व करंजी घाट परिसरामध्ये फिरताना अनेकांना आढळले. त्यांनी तातडीने वनपरिक्षेत्र अधिकाऱ्यांना कळविल्यानंतर पिंजरा लावण्यात आला.

यावेळी दिलीप सोपान शिंदे या शेतकऱ्याच्या शेतामध्ये एक पिंजरा लावला असता त्यामध्ये पक्षाच्या शोधार्थ आलेला बिबट्या जेरबंद झाला. हा बिबट्या पाहण्यासाठी दगडवाडी ग्रामस्थांनी मोठी गर्दी केली होती. यावेळी वन विभागाचे कर्मचारी शिरसाठ एमबी व कराळे एस एम घटनास्थळी आले व ते पिंजरा घेऊन गेले.यावेळी दिलीप सोपान शिंदे, सरपंच सुभाष शिंदे , मिनिनाथ



शिंदे, सतिश शिंदे,अजिंक्य शिंदे यांनी वनविभागाच्या कर्मचाऱ्यांना मदत केली.

भट्टीवाडी, घोरदरा तसेच दगडवाडी गाव परिसरामध्ये सातत्याने बिबट्यांचे वास्तव्य होते. दोन बिबटे पकडले गेले असले तरीही त्यांची पिल्ले असल्याचे ग्रामस्थांचे म्हणणे आहे त्यामुळे या पिंजऱ्यामध्ये हे पिंजरे काही दिवस ठेवावे अशी मागणी दगडवाडी ग्रामस्थांकडून करण्यात येत आहे.

# वांबोरी परिसरात बिबट्याचा वाढता धुमाकूळ

## वन खात्याच्या कारभारावर शेतकऱ्यांचा रोष

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री



**राहुरी** : तालुक्यातील वांबोरी गाव व परिसरात बिबट्याचा संचार मोठ्या प्रम ाणात वाढलेला असून शेतकरी व ग्रामस्थांम ध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. अनेक वेळा बिबट्या दिसल्याच्या घटना समोर येत असताना वन खात्याची कामगिरी मात्र अत्यंत फोल ठरली असल्याचा आरोप शेतकऱ्यांकडून केला जात आहे.

मागील दोन वर्षांच्या कालावधीत वन खात्याने वांबोरी व परिसरात पिंजरे लावून नेमके किती बिबटे पकडले. याची कोणतीही स्पष्ट माहिती ग्रामस्थांना देण्यात आलेली नाही. फक्त पिंजरे आणून ठेवणे एवढ्यावरच वन खात्याचे काम मर्यादित राहिल्याचा आरोप केला जात आहे. पिंजरे योग्य ठिकाणी कसे लावायचे, कोणत्या भागात जास्त धोका असतो, कोणती खबरदारी घ्यायची, भक्ष कशा पद्धतीने ठेवायचे याबाबत शेतकऱ्यांना कोणतेही मार्गदर्शन केले जात नसल्याने धोका कायम असल्याचे ग्रामस्थांचे म्हणणे आहे.

दरम्यान बिबट्याच्या हल्ल्यात पाळीव प्राणी मारले गेलेल्या अनेक घटनांमध्ये संबंधित शेतकऱ्यांना नुकसान भरपाई मि ळाली का नाही, किती मिळाली, याबाबतही कोणतीही पारदर्शक माहिती दिली जात नसल्याचा गंभीर आरोप शेतकऱ्यांनी केला आहे. पंचनामा, अर्ज प्रक्रिया आणि पाठपुरावा याबाबत शेतकरी पूर्णपणे अंधारात असल्याने अनेकांना नुकसान सहन करावे लागत आहे.

वन खात्याने ही बाब केवळ औपचारिकता म्हणून न पाहता जबाबदारीने काम करत शेतकरी व ग्रामस्थांमध्ये योग्य जनजागृती करावी, पिंजरे योग्य पद्धतीने व योग्य ठिकाणी लावावेत तसेच नुकसान भरपाई बाबत पारदर्शक माहिती जाहीर करावी, अशी ठाम मागणी वांबोरी येथील अशोक पटारे यांच्यासह परिसरातील शेतकऱ्यांकडून होत आहे.

# 'शाखा विस्तार पॅटर्न'

## अवघ्या दोन दिवसांत ५४ शाखांचे विक्रमी उदघाटन

जनतेचा शिवसेनेवर असलेला विश्वास या ५४ शाखांच्या रूपाने दिसून येत आहे. प्रत्येक गावात शिवसैनिक आता सक्षमपणे उभा असून, लोकांच्या अडीअडचणीत धावून जाण्यासाठी ही यंत्रणा सदैव तत्पर राहील.

**– हर्षदा काकडे, शिवसेना नेत्या तथा माजी जिल्हा परिषद सदस्या,शेवगाव.**

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**शेवगाव** : अहिल्यांनगर जिल्ह्यातील शेवगाव तालुक्यात शिवसेना पक्षाने (एकनाथ शिंदे गट) संघटनात्मक बांधणीचा एक नवा आणि ऐतिहासिक अध्याय लिहिला आहे.'शाखा तिथे शिवसैनिक आणि गाव तिथे शिवसेना' या संकल्पनेला मूर्त रूप देत, तालुक्याच्या इतिहासात पहिल्यांदाच अवघ्या दोन दिवसांच्या कालावधीत ५४ नवीन शाखांचे उद्घाटन करण्यात आले. या महामोहिमेमुळे शेवगावच्या ग्रामीण भागात शिवसेनेची पकड आता अधिक घट्ट झाली असून, राजकीय वर्तुळात या 'शाखा धडाक्याची' मोठी चर्चा असुन एकाच वेळी इतक्या मोठ्या प्रमाणावर झालेला हा विस्तार तालुक्याच्या राजकीय इतिहासातील एक मैलाचा दगड मानला जात आहे.

**गाव तिथे भगवा** : ५४ गावांत शिवसैनिकांचा जल्लोष, तालुक्यातील सालवडगाव, खरडगाव, आखेगाव, मुर्शतपूर, वाडगाव, थाटे, ठाकूर निमगाव, शिंदे वस्ती, हसनापूर, कोळगाव, मंगरूळ बुद्रुक, मंगरूळ खुर्द, अंतरवाली बुद्रुक, अंतरवाली खुर्द, सुळेपिंपळगाव, चेडे चांदगाव, ठाकूर पिंपळगाव, अधोडी, राणेगाव (दोन शाखा), दिवटे, लाडजळगाव, चापडगाव, सोने सांगवी, वरखेड, राक्षी, वरूर बुद्रुक, वरूर खुर्द, भगूर, सुलतानपूर खुर्द, शहाजापूर, अमरापूर, आव्हाणे खुर्द, आव्हाणे बुद्रुक, बऱ्हाणपूर, दिंडेवाडी, चव्हाणवाडी, वडुले खुर्द, वडुले बुद्रुक, वाघोली, निंबेनांदूर, ढोरजळगाव ने, ढोरजळगाव शे, आपेगाव, आखतवाडे,



मळेगाव, सामनगाव, जोहरापूर, हिंगणगाव ने, खामगाव, भातकुडगाव आणि भायगाव अशा एकूण ५४ ठिकाणी भगवा फडकवण्यात आला.

**नेत्यांचा झंझावाती दौरा** : उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, खासदार डॉ.श्रीकांत शिंदे, शिवसेनेचे महासचिव संजय मोरे यांच्या म ार्गदर्शनाखाली आणि ड.शिवाजीराव काकडे, मा.जि.प.सदस्या हर्षदा काकडे यांच्या नियोजनातून ही मोहीम पार पडली. यावेळी शिवसेनेचे प्रवक्ते संजीव भोर, जिल्हाध्यक्ष बाबुशेठ टायरवाले, उप जिल्हाप्रमुख दिलीप भागवत, उपजिल्हा प्रमुख अंकुश चितळे, ज्येष्ठनेते एकनाथ कुसळकर, जगन्नाथ गावडे, पृथ्वीसिंह काकडे, वैभव पूरनाळे, मारुती आव्हाड, लक्ष्मण गवळी, रामजी पोटफोडे, भाऊसाहेब सातपुते, अशोक ढाकणे, राजेंद्र फलके, नागेश पूरनाळे, मुनवर शेख, रामकिसन घनवट, भारत भालेराव, सुनील दारकुंडे, विश्वास ढाकणे, भिवसेन गिरमकर, शेषराव टेकाळे, अमोल टेकाळे, रामराव ढाकणे, प्रमोद तांबे, शिवसेनेचे अरुण मुंडे, आशुतोष डहाळे, साईनाथ आधाट, रोहित काथवटे यांसह अनेक मान्यवर उपस्थित होते. गावोगावी फटाक्यांची आतिषबाजी आणि ढोल-ताशांच्या गजरात या शाखांचे स्वागत करण्यात आले.

**शाखा म्हणजे 'लोकहिताचे केंद्र'** : याप्रसंगी बोलताना हर्षदा काकडे यांनी सांगितले की, या शाखा केवळ कार्यालये नसून सामान्य जनतेचे प्रश्न सोडवण्यासाठीची हक्काची व्यासपीठे आहेत. 'शासन आपल्या दारी' या योजनेचा लाभ थेट शेवटच्या माणसापर्यंत पोहोचवण्याचे काम या शाखांमार्फत होईल. शिवसेनेचे प्रवक्ते भोर व जिल्हाध्यक्ष टायरवाले यांनी या मोहिमेचे कौतुक करताना सांगितले की, शेवगावातून सुरू झालेला हा पॅटर्न आता संपूर्ण जिल्ह्यासाठी आदर्श ठरेल. इथला प्रत्येक शाखाप्रमुख आता गावाचा 'विकासदूत' म्हणून काम करेल.

दैनिक
# राष्ट्र सह्याद्री

सोमवार, दि.१६ फेब्रुवारी २०२६ । अहिल्यानगर । पान नं. ८

# भेसळीचे दूध जप्त

## २०० लिटर दुधात १५० लिटर केमिकलचे मिश्रण । दोन महिन्यांपासून सुरू होता गोरखधंदा



### आरोग्यास गंभीर धोका

तज्ज्ञांच्या मते पॅराफिन ऑइल खाण्यायोग्य नसून त्याच्या सेवनामुळे पोटदुखी, उलट्या, जुलाब, तसेच दीर्घकाळात कॅन्सरचा धोका वाढू शकतो. हे खनिज तेल शरीरात साचल्यास यकृत व किडनीवर ताण येऊन ते निकामी होण्याची शक्यता असते. लहान मुलांसाठी हा धोका अधिक असल्याचे डॉक्टरांनी सांगितले.

**तालुका प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**जामखेड :** अन्न-औषध प्रशासनाने भेसळीच्या संशयावरून मोठी कारवाई करत ६ ड्रममधील सुमारे ३५० लिटर दूध ताब्यात घेतले. गेल्या दोन महिन्यांपासून येथील रामदास नवनाथ उबाळे यांच्या शेतवस्तीवरील घरात दूध भेसळीचा प्रकार सुरू असल्याची माहिती मिळाल्यानंतर ही कारवाई करण्यात आली.

कारवाईदरम्यान एका वाहनामध्ये २०० लिटर क्षमतेचे १० प्लास्टिक ड्रम आढळले. त्यापैकी चार ड्रम रिकामे होते, तर उर्वरित ड्रममध्ये दुधातील फॅट कृत्रिमरीत्या वाढवण्यासाठी पॅराफिन ऑइलपासून तयार केलेले द्रवण आढळून आले. अन्न-औषध प्रशासनाचे निरीक्षक यांनी सांगितले की, २०० लिटर दुधामध्ये तब्बल १५० लिटर लिक्विड केमिकल मिसळले जात होते. या प्रकारामुळे नागरिकांच्या आरोग्याशी गंभीर खेळ सुरू असल्याचे स्पष्ट झाले.

अधिकाऱ्यांनी दूध व पावडरचे नमुने ताब्यात घेऊन प्रयोगशाळेत तपासणीसाठी पाठवण्याची प्रक्रिया सुरू केली आहे. अहवाल आल्यानंतर पुढील कायदेशीर कारवाई करण्यात येणार आहे. ताब्यात घेतलेल्या पावडरची किंमत सुमारे ८० हजार रुपये, लिक्विड केमिकलची किंमत अंदाजे २.४० लाख रुपये असल्याचे सांगण्यात आले.

दोन महिन्यांपासून सुरू होता प्रकार

स्थानिक नागरिकांच्या माहितीवरून अन्न-औषध प्रशासनाने गुप्त चौकशी केली असता, गेल्या दोन महिन्यांपासून या ठिकाणी भेसळीचे दूध तयार करून ते विक्रीसाठी पाठवले जात असल्याचे उघड झाले. कारवाईच्या वेळी काहीजण ड्रम वाहनातून उतरवत असल्याचेही आढळले.

श्री गणेश कारखाना गळीत हंगामाची सांगता

## एक लाखाहून अधिक उसाची विल्हेवाट : थोरात



**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**कोपरगाव :** श्री गणेश सहकारी साखर कारखान्याच्या कार्यक्षेत्रातून एक लाखाहून अधिक उसाची विल्हेवाट झाली. हे गणेश परिसराच्या दृष्टीने योग्य नाही. गणेश चांगला चालला तर या परिसराची अर्थव्यवस्था चांगली राहील. या भागातील शेतकऱ्यांनी गणेशला च ऊस द्यावा, गणेश कारखाना या परिसराचे हक्काचे साधन आहे, त्याला सभासद, शेतकरी यांनी जपावे, असे प्रतिपादन माजी महसूल मंत्री बाळासाहेब थोरात यांनी केले.

श्री गणेश सहकारी साखर कारखान्याच्या सन २०२५- २६ या गळीत हंगामाची सांगता माजी मंत्री थोरात यांच्या अध्यक्षतेखाली व संजीवनीचे अध्यक्ष विवेक कोल्हे यांच्या हस्ते झाली. त्याप्रसंगी थोरात बोलत होते. याप्रसंगी गणेश कारखान्याचे चेअरमन सुधीर लहारे व्हा. चेअरमन विजय दंडवते, माजी चेअरमन ड. नारायणराव कार्ले, कारखान्याचे अधिकारी, कामगार मोठ्या संख्येने उपस्थित होते.

प्रारंभी गणेश कारखान्याचे संचालक नानासाहेब काशिनाथ नळे व त्यांच्या पत्नी सुनीता, संचालक बाळासाहेब पुंडलिक चोळके व त्यांच्या पत्नी संगीता या उभयतांच्या हस्ते सत्यनारायणाची महापूजा करण्यात आली. आपल्या भाषणात माजी मंत्री बाळासाहेब थोरात पुढे म्हणाले, गणेश कारखानाच्या वाटचालीत संकट आणि अडथळ्याची मालिका सुरू आहे, रोज वाटेत काटे टाकण्याचे काम चालूच आहे, साडेतीन लाख टनऊस गाळपास होता. उसाची पळवा पळवी झाली. गणेश या परिसराची कामधेनू आहे. अशाने या परिसराची अर्थव्यवस्था खिळखिळी होईल. वास्तविक गणेश चांगला चालण्यासाठी या भागातील सभासद शेतकरी यांनी आपला ऊस गणेशलाच दिला पाहिजे. गणेश वरच लक्ष केंद्रित केले पाहिजे. खरे तर कोल्हे व आम्ही गणेशला समर्थ करण्याचेच काम करत आहोत. कारखाना पुढे कसा जाईल याचाच विचार आम्ही करतो. गणेश कारखान्याची गाळप क्षमता आपण वाढवू, मोलाचे रूपांतरण कुठे करायचे ते ठरवू, काही कारखान्यांनी त्यांच्या गाळप क्षमता वाढवल्या आहेत. विवेक कोल्हे यांनी गणेशला चांगली मदत केली आहे. विवेक कोल्हे म्हणाले, गणेश कारखान्याचे या गाळप हंगामात साडेतीन लाख मॅट्रिक टन ऊस गाळपाची उद्दिष्ट होते. परंतु उसाची कार्यक्षेत्रातून होणारी विल्हेवाट, तसेच कारखान्यातील तांत्रिक अडचणी यामुळे कारखाना ९० दिवस चालला. आणि त्यातून दोन लाख मेट्रिक टन ऊस गाळप करू शकला. गणेशच्या कार्यक्षेत्रातून विखे कारखान्याने ८० हजार टन, कोळपेवाडी कारखान्याने ४०००० टन ऊस नेला. तसेच इतर कारखान्याने ३५ हजार टन ही ऊस नेला अशी दीड ते १ लाख ६० हजार मेट्रिक टन उसाची विल्हेवाट झाली. कुणीही येऊन आक्रमण करावे अशी अफगाणिस्तानची अवस्था असते, तसे उसाच्या बाबतीत गणेशची अवस्था झाली आहे. गणेश कारखान्यात आधुनिकीकरण केल्याने अनेक चांगले फायदे झाले. गणेश कारखान्याच्या कार्यक्षेत्रात पुढील हंगामासाठी २ लाख ६० हजार मेट्रिक टन ते ३ लाख मेट्रिक टन ऊस उपलब्ध होईल. जर पुढील हंगामात इतर कारखान्यांनी गणेशच्या कार्यक्षेत्रात उसाची विल्हेवाट लावली तर आम्हीही त्या कारखान्याच्या कार्यक्षेत्रात टोळ्या टाकू असा इशारा विवेक कोल्हे यांनी दिला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कारखान्याचे सेक्रेटरी नितीन भोसले यांनी केले. तर आभार संचालक आलेश कापसे यांनी मानले.

## पोलीस भरतीसाठी निघालेल्या तरुणाचा भीषण अपघातात मृत्यू

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**



**प्रवरानगर :** निर्मळ पिंपरी येथील मनमिळाऊ व कर्तबगार तरुण साईकिरण भागवत शेलार (वय १९) याचा रस्ते अपघातात दुर्दैवी मृत्यू झाल्याची घटना समोर आली आहे. या हृदयद्रावक घटनेमुळे शेलार कुटुंबीयांसह संपूर्ण निर्मळ पिंपरी पंचक्रोशीत व लोणी परिसरात शोककळा पसरली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, साईकिरण शेलार हा पुणे येथे पोलीस भरती प्रक्रियेसाठी जात असताना त्याच्या वाहनाचा भीषण अपघात झाला. अपघात इतका गंभीर होता की त्यात साई किरण शेलार याला गंभीर दुखापत झाली. स्थानिकांच्या मदतीने त्याला तातडीने जवळच्या रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले; मात्र उपचार सुरू होण्यापूर्वीच त्याची प्राणज्योत मालवली.

साईकिरण शेलार हा स्वभावाने अत्यंत शांत, संयमी आणि मदतीला धावून जाणारा युवक म्हणून ओळखला जात होता. गावातील विविध सामाजिक उपक्रमांमध्ये त्याचा सक्रिय सहभाग असे. पोलीस दलात भरती होऊन कुटुंबाचे व गावाचे नाव उज्ज्वल करण्याचे त्याचे स्वप्न होते. मात्र नियतीने त्याच्यावर काळाचा घाला घातल्याने गावकऱ्यांना मोठा धक्का बसला आहे. एक हसतमुख, कष्टाळू आणि उमदा तरुण आमच्यातून निघून गेला, अशा शब्दांत ग्रामस्थांनी आपल्या भावना व्यक्त केल्या.

साई किरण हा घरातील कर्ता तरुण होता. त्याच्या जाण्याने रोलार कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला असून परिसरातून शोकसंवेदना व्यक्त केल्या जात आहेत. त्याच्या पश्चात आई-वडील, भाऊ-बहीण असा परिवार आहे.

आज निर्मळ पिंपरी येथे शोकाकुल वातावरणात त्याच्यावर अंत्यसंस्कार करण्यात आले. या वेळी गावातील नागरिक, विविध सामाजिक संघटनांचे पदाधिकारी व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. सर्वांच्या डोळ्यांत अश्रू तरळले होते आणि 'साई'च्या आठवणींनी वातावरण भारावून गेले होते.

## जेऊर येथे कत्तलीसाठी जनावरे आणून चारा-पाण्याविना ठेवली डांबून

**अहिल्यानगर –** कत्तल करण्यासाठी डांबुन ठेवलेले ६ गोवंशीय जनावरांची स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने सुटका करत आरोपींकडून १,३०,००० रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त केला आहे. ही कारवाई अहिल्यानगर तालुक्यातील जेऊर येथे करण्यात आली. जिल्हा पोलिस अधीक्षक सोमनाथ घार्गे यांच्या आदेशानुसार स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक किरणकुमार कबाडी यांच्या नेतृत्वाखाली स्थानिक गुन्हे शाखेतील पोउपनि महादेव गुट्टे, पोलीस अंमलदार अतुल लोटके, गणेश धोत्रे, शाहिद शेख, सुनिल पवार, चालक भगवान धुळे यांचे पथक तयार करुन सदर पथकास एम.आय.डी.सी. पोलीस स्टेशन हद्दीत गोवंशीय जनावरांची कत्तल करणारे इसमांची माहिती काढुन कारवाई करणेबाबत सुचना व मार्गदर्शन करुन पथकास रवाना केले. सदर पथक दिनांक १४/०२/२०२६ रोजी रात्री एम.आय.डी.सी. पोलीस स्टेशन हद्दीत कत्तलखान्याची माहिती काढत असतांना पथकास गुप्त बातमीदारामार्फत अहिल्यानगर ते संभाजीनगर रोडलगत जेऊर गावात पार्थ ढाब्याच्या पुर्व बाजुस शेतात पत्र्याच्या खोलीमध्ये एक इसम गोवंशीय जातीची जणावरे कत्तल करणे कामी घेवुन येवुन त्यांना निर्दयतेने डांबुन ठेवुन असल्याची माहिती प्राप्त झाली.सदर माहितीप्रमाणे पथकाने तात्काळ सदर ठिकाणी जाऊन पाहिले असता पत्र्याच्या खोलीमध्ये एक इसम हा शासनाने विक्री व कत्तल करण्यास प्रतिबंध केलेले गोवंशीय जातीचे जनावरे कत्तल करणे कामी घेवुन येवुन त्यांना चारा पाण्याची कुठलीही सोई सुविधा न करत निर्दयतेने डांबुन ठेवल्याचे दिसुन आले.

## चौदा वर्षांखालील मुलांवर सोशल मीडिया वापरास निर्बंध येणार !

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**अहिल्यानगर :** स्मार्टफोन आणि सोशल मीडियाच्या बेजबाबदार वापरामुळे बाल लैंगिक शोषण, छेडछाड व पाठलागासारख्या गुन्ह्यांमध्ये वाढ होत असल्याने १४ वर्षांखालील मुला-मुलींच्या सोशल मीडियाच्या अनिर्बंध वापरावर निर्बंध आणण्याचा शासनाचा विचार असल्याचे महाराष्ट्राच्या अतिरिक्त पोलिस महासंचालक अस्वती दोर्जे यांनी सांगितले.




स्नेहालय आणि राष्ट्रीय महिला आयोग यांच्या सहयोगाने आयोजित 'महिलांची छेडछाड आणि पाठलाग' या विषयावरील दोन दिवसीय राज्यस्तरीय कार्यशाळेतील 'पाठलाग गुन्ह्यांचे बदलते स्वरूप, कायदेशीर प्रक्रिया आणि आव्हाने' या चर्चासत्रात त्या बोलत होत्या. यावेळी तेलंगणाचे अतिरिक्त पोलिस महासंचालक महेश भागवत आणि पुण्याच्या ज्येष्ठ वकील शिरीन मर्चंट यांनीही आपले अनुभव मांडले. सत्राचे संचालन स्नेहाधार महिला हेल्पलाईनचे संचालक श्याम आसावा यांनी केले.

महेश भागवत यांनी सांगितले की, सोशल मीडियावरील फसव्या प्रोफाइल्स, अनोळखी मैत्री आणि प्रत्यक्ष भेटी यामुळे छेडछाड व पाठलागाचे प्रकार वाढत आहेत. अनोळखी व्यक्तींच्या विनंत्या स्वीकारू नयेत, सोशल मीडियावर ओळख झालेल्यांची भेट एकटे जाऊन घेऊ नये, सार्वजनिक ठिकाणी छुप्या कॅमेऱ्यांपासून सावध राहावे, तसेच ब्लॅकमेलिंगसारखी घटना घडल्यास तात्काळ पोलिसांकडे तक्रार करावी, असे त्यांनी आवाहन केले. देशातील कोणत्याही पोलिस ठाण्यात तक्रार नोंदवता येते, असेही त्यांनी स्पष्ट केले.

ॲड. शिरीन मर्चंट यांनी लिंगभेदविरहित आणि परिणामकारक कायद्याची गरज अधोरेखित करत पोलिस ठाण्यांत संवेदनशील महिला अधिकारी असाव्यात, अशी मागणी केली. अनेकदा छेडछाड-पाठलागाचे गुन्हे अदखलपात्र ठरवले जात असल्याने पीडितांचे समुपदेशन व योग्य मार्गदर्शन आवश्यक असल्याचे त्यांनी नमूद केले. शिक्षण संस्थांमध्ये केवळ 'विशाखा समिती'चा फलक न लावता प्रत्यक्ष कार्यरत व्यवस्था उभी राहणे गरजेचे असल्याचेही त्यांनी सांगितले.

## प्राध्यापकावर पोक्सोसह गंभीर गुन्हे

### विद्यार्थिनींना गुण कमी करण्याची धमकी

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**बारामती :** श्रीरामपूर शहरात एका वर्ग शिक्षकाने केलेल्या अत्याचाराची घटना ताजी असतानाच बारामती तालुक्यातील माळेगाव शहरातील एका महाविद्यालयात अशीच घटना समोर आली आहे. येथील प्राध्यापकावर अल्पवयीन विद्यार्थिनींना अश्लील संदेश पाठवून लैंगिक छळ केल्याप्रकरणी पोक्सो कायद्यासह विविध गंभीर कलमांखाली गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या घटनेमुळे बारामती तालुका परिसरात खळबळ उडाली असून पालकवर्गात तीव्र संताप व्यक्त होत आहे.

शिक्षकी पेशाला काळिमा फासणाऱ्या आरोपीचे नाव नितीन शंकर तावरे (वय ४२, रा. सांगवी, ता. बारामती) असे आहे. त्यांच्या विरोधात संदीप रमेश शहा यांनी फिर्याद दिली आहे.

फिर्यादीत नमूद केल्यानुसार, आरोपी प्राध्यापकाने डिप्लोमा इंजिनिअरिंगच्या प्रथम वर्षात शिकणाऱ्या अल्पवयीन विद्यार्थिनींना त्यांच्या इच्छेविरुद्ध व्हॉट्सपवर अश्लील भाषेतील संदेश पाठवले. संदेशांना उत्तर न दिल्यास अंतर्गत गुण (३० मार्क) कमी करण्याची धमकी दिल्याचेही तक्रारीत म्हटले आहे.

याशिवाय वर्गात शिकवताना विद्यार्थिनींच्या जवळ जाणे, स्पर्श करण्याचा प्रयत्न करणे, बेंचवर हात ठेवून शरीराला स्पर्श होईल असे वर्तन करणे, विरोध केल्यास वर्गात लक्ष्य करून अपमान करणे, अशा गंभीर स्वरूपाच्या तक्रारी नोंदवण्यात आल्या आहेत. ही कृत्ये २२ जानेवारी ते १२ फेब्रुवारी २०२६ या कालावधीत घडल्याचे फिर्यादीत नमूद आहे.

## 'एमडी' (मेफेड्रॉन) ड्रग्ज पकडले; दोघांविरोधात गुन्हा

**तालुका प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**जामखेड :** मोठ्या शहरातील ड्रग्ज लोन आता ग्रामिण भागापर्यंत पोहचल्याचे पहायला मिळत आहे. नागरिकांच्या जीवितास धोका निर्माण करणारे रॅकेट जामखेड तालूक्यात सक्रिय असल्याचा पर्दाफाश झाला आहे. जामखेड शहराजवळील जामखेड कर्जत रोडवर एका फर्निचरच्या दुकानासमोर मोटारसायकल वरुन विक्री करण्यासाठी घेऊन जात असताना एक जणाकडुन ६.१७ मिली ग्रॅम वजनाचे सव्वा लाख रुपये कीमतीचे मॅफेड्रॉन ड्रग्ज स्थानिक गुन्हे अन्वेषण विभागाच्या पथकाने जामखेड पोलीसांच्या मदतीने जप्त केले आहे. या प्रकरणी दोन जणांविरोधात जामखेड पोलीस स्टेशनला गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याप्रकरणी आरोपी मंगेश हिरामन पवार, वय ३० वर्षे रा. कान्होपात्रा नगर, जामखेड व मकसुद बागवान (पुर्ण नाव माहित नाही) रा. करमाळा जिल्हा. सोलापुर आशा दोन जणांविरोधात जामखेड पोलीस स्टेशनला गुन्हा दाखल करण्यात आला आहे. मोठ्या शहरातील ड्रग्ज चे लोन आता ग्रामिण भागापर्यंत पोहचल्याचे वरील घटनेवरून पहायला मिळत आहे. कारण जामखेड सारख्या ग्रामिण भागात ड्रग्ज विक्री होत असल्याचे या घटनेवरून समोर येत आहे.




स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाला मिळालेल्या गुप्त माहिती नुसार शनिवार दि १४ फेब्रुवारी २०२६ रोजी सकाळी आरोपी मंगेश हिरामन पवार वय ३० वर्षे रा. कान्होपात्रा नगर, जामखेड हा जामखेड शहराजवळील जामखेड कर्जत रोडवरील एका फर्निचरच्या दुकानासमोरुन पाठीमागे नंबर प्लेट नसलेल्या व समोरच्या बाजूला मोटारसायकल क्र. एम. एच १६, डी. ई १७१३ असा क्रमांक आसलेल्या मोटारसायकल वरुन चालला होता. यावेळी पोलिसांनी त्यास आडवुन त्याची तपासणी केली असता त्याच्या जवळ ६.१७ मिली ग्रॅम वजनाचे १ लाख २३ हजार ४०० रुपये किमतीचा एका पांढऱ्या रंगाच्या छोट्या प्लास्टिक पाऊच मध्ये असलेला मॅफेड्रॉन नावाचा अमली पदार्थ आढळून आला. याची आंतरराष्ट्रीय बाजारात २० हजार रुपये प्रति ग्रॅम प्रमाणे किंमत आहे. सदर आरोपीकडुन १ लाख रुपये कीमतीची मोटारसायकल व १ लाख २३ हजार ४०० रु किमतीचे ड्रग्ज असा एकुण २ लाख २३ हजार ४०० रुपये कीमतीचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे.

या प्रकरणी स्थानिक गुन्हे शाखेचे पो. हे.कॉ. र्हदय गौतम घोडके यांनी दिलेल्या फिर्यादी वरून वरील दोन जणांविरोधात जामखेड पोलीस स्टेशनला गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ही कारवाई पोलिस अधिक्षक सोमनाथ घार्गे व उपविभागीय पोलीस अधिकारी प्रविणचंद लोखंडे यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक किरणकुमार कबाडी व जामखेड पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक दशरथ चौधरी यांच्यासह पोलीस उपनिरीक्षक समीर अभंग, राहुल द्वारके, गणेश लबडे, संतोष खैरे, पोलीस नाईक शामसुंदर जाधव, भिमराज खडसे, पोलीस कॉ. भाऊसाहेब काळे, अमोल कोतकर, सुनील मालकर, चालक अरुण मोरे, महादेव मिसाळ यांच्या पथकाने केली आहे. पुढील तपास पोलीस निरीक्षक दशरथ चौधरी हे करीत आहेत.

# संबंधित शिक्षक व संस्था चालकांविरुद्ध कारवाई करा

## आ.ओगले यांचे मुख्यमंत्र्यांना पत्र; महिला आयोगाने घेतली दखल

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**श्रीरामपूर :** येथील प्रतिष्ठित शिक्षण संस्थेच्या ७५ वर्षांचा इतिहास असलेल्या मराठी शाळेतील एका शिक्षकाने लहान मुलींसोबत केलेल्या कथित गैरकृत्यामुळे शहरात संतापाची लाट उसळली आहे. या प्रकरणाची गंभीर दखल घेत आ. हेमंत ओगले यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना पत्र लिहून संबंधित शिक्षक सचिन महाजन गोणारकर संस्थेच्या जबाबदार पदाधिकाऱ्यांवरही कठोर कारवाई करण्याची मागणी केली आहे.

आ. ओगले यांनी दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, सदर शिक्षकाविरुद्ध यापूर्वीही अशाच स्वरूपाच्या तक्रारी संस्थेकडे आल्या होत्या. मात्र, संस्थाचालकांनी त्याकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष केल्यामुळेच पुन्हा असा निंदनीय प्रकार घडला आहे. हा प्रकार मानवतेला काळिमा फासणारा असून, या प्रकरणी केवळ शिक्षकच नव्हे, तर त्याला पाठीशी घालणाऱ्या व्यवस्थापनावरही गुन्हा दाखल करावा, अशी मागणी त्यांनी केली आहे. या पत्राच्या प्रती शिक्षणमंत्री दादासाहेब भुसे, महिला आयोगाच्या अध्यक्ष रूपाली चाकणकर आणि जिल्हा प्रशासनालाही पाठवण्यात आल्या आहेत.

रिपाइंचे जिल्हा कार्याध्यक्ष सुभाष त्रिभुवन यांनी केलेल्या तक्रारीनंतर राज्य महिला आयोगाच्या अध्यक्ष रूपाली चाकणकर यांनी या प्रकरणाची तातडीने दखल घेतली आहे.

आयोगाने जिल्हा पोलिस प्रमुख सोमनाथ वाकचौरे यांना पत्र पाठवून या प्रकरणात पोक्सो अंतर्गत गुन्हा दाखल करून उच्चस्तरीय चौकशी करण्याचे आदेश दिले आहेत, तसेच त्रिभुवन यांच्या नेतृत्वाखालील शिष्टमंडळाने श्रीरामपूर बार कौन्सिलचे अध्यक्ष संदीप चोरमल यांची भेट घेतली. आरोपी शिक्षकाचे वकीलपत्र कोणत्याही वकिलाने स्वीकारू नये, अशी मागणी निवेदनाद्वारे करण्यात आली. यावेळी ड. विजय पटारे, ॲड. डी. एम. त्रिभुवन उपस्थित होते.